म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे
विषय : नाटक
दा. क्र. : २०५९८
IRBK-0120597
IRBK-0120597

नाट्य नाटक

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
वा. क्र. २०५८८ नों. दि. ................
वि. ...नाटक... क्र. २१११८

# चाकरमानी

वाचनालय
नाटक
२०५९०
२।११।५८

सुंदर तळाशिलकर

IRBK-0120597
IRBK-0120597

मॅजेस्टिक

मॅजेस्टिक बुक स्टॉल, मुंबई ४.

पहिली आवृत्ती :
फेब्रुवारी १९८४

© सौ. रोहिणी सुंदर तळाशिलकर

डीआर् एम् : ६९२/१९८२
दि. २०–७–१९८२

प्रकाशक :
अशोक केशव कोठावळे,
मॅजेस्टिक बुक स्टॉल,
गिरगाव नाका, मुंबई ४.

मुद्रक :
अ. के. कोठावळे,
ॐ मुद्रणालय,
२५० अ, शनिवार पेठ, पुणे ३०.

मुखपृष्ठ : कमल शेडगे

मूल्य १५ रुपये

हौशी नाट्य–संस्थांना किंवा मंडळींना या नाटकाचा प्रयोग करायचा असेल, तर त्यांनी प्रयोगापूर्वी आगाऊ परवानगी घेणे आवश्यक आहे.

चित्रपट, भाषांतर, रूपांतर यांचे सर्व हक्क सौ. रोहिणी सुंदर तळाशिलकर, २१२।एफ् २, 'जंबोदर्शन', दर्यासारंग कान्होजी आंग्रे मार्ग, कोलडोंगरी, अंधेरी (पूर्व), मुंबई ४०० ०६९ यांच्या स्वाधीन आहेत.

*भाई ( कै. रमेश रणदिवे ),*

माझं पहिलंवहिलं छापील नाटक तुझ्या हाती देऊन तुझ्या तोंडून कौतुकाचे शब्द ऐकायचे, त्या वेळीच नेमका तू आमच्यांत नाहीस.

मित्रा, तुझी खूप खूप आठवण येते !

सुंदर

या नाटकाचा पहिला प्रयोग 'भद्रकाली प्रॉडक्शन्स्' मुंबई या संस्थेच्या वतीने गुरुवार, दिनांक २९ जुलै १९८२ रोजी सायंकाळी ७-३० वाजता रवींद्र नाट्य मंदिर, प्रभादेवी, मुंबई येथे सादर करण्यात आला.

दिग्दर्शक : रमेश रणदिवे

नेपथ्य : रघुवीर तळाशिलकर

संगीत : यशवंत देव

## कलावंत (प्रवेशानुक्रमे)

लक्षा : लीलाधर कांबळी

सोनक्याचा : अरुण कांबळी

गावकरी : दत्तराज सावंत

: वसंत कोचरेकर

भिक्या : सुंदर तळाशिलकर

हरी : उल्हास सावंत

धेनग्या : अशोक वांदेकर

पाट्या : मंगेश कांबळी

सीताराम : मच्छिंद्र कांबळी

भोटमामा : कमलाकर स्वार

येनूमावशी : विमल जोशी

डिच्या : राजा मयेकर

सखू : संजीवनी जाधव

अनसूया : नीलप्रभा

दादा भट : रमेश रणदिवे

प्रकाश-योजना : जयवंत देसाई, लीलाधर कांबळी

रंगभूषा : वर्दम मेकअप् सर्व्हिस

ध्वनि–संकलन : श्याम सुर्वे

सूत्रधार : बाळ कोचरेकर

निर्माता : मच्छिंद्र कांबळी

# मालवणी.... चाकरमानी

मालवणी भाषा....खरं म्हणजे ही मराठी भाषेची एक बोली आहे. ती कोकणातील ज्या भागात बोलली जाते, तो परिसर रत्नागिरीतील राजापूर-पासून सुरू होतो आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यावरून थेट गोव्याच्या हद्दीपर्यंत पोहोचतो. गोव्यातील पेडणे, धारगळ, मांद्रे, मालपे, पार्से आणि मापुशा-पर्यंत थोड्या-अधिक फरकाने ही भाषा बोलली जाते. भाषेत दर पाच-दहा मैलांवर फरक पडत असतो. तसा याही भाषेच्या बाबतीत पडतो. परंतु विशेषतः मालवणच्या परिसरात जी भाषा बोलली जाते, तिला अस्सल मालवणी भाषा म्हणायला हरकत नाही.

या भाषेला एक विशेष प्रकारचं नादमाधुर्य आहे. ऐकायला ही गोड वाटते. समजायलाही तशी कठीण नाही. गोव्यात बोलल्या जाणाऱ्या 'कोकणी'शी ही भाषा बरीचशी जवळची आहे. काही शब्द वगळता— उदाहरणार्थ, 'व्होवरी' म्हणजे खोली, 'भुतूर' म्हणजे आत, 'वायच्' म्हणजे थोडं, 'लोटा' म्हणजे ओटा, 'घोव' म्हणजे नवरा.... मराठी-तीलच शब्द वापरून ही भाषा बोलली जाते.

श्री. सुर्वे या गृहस्थांनी, काही वर्षांपूर्वी, या भाषेत गाणी रचून त्यांच्या रेकॉर्डस् बाजारात आणल्या. त्या गाण्यांना अमाप प्रसिद्धी मिळाली. त्या काळी ही गाणी मालवणी बोलणाऱ्या लहान-थोर मंडळींच्या तोंडी सारखी घोळवली जायची. त्यांतील काही गाणी मी नमुन्यादाखल देत आहे :

पाच तरी रुपाये पाठव, रे
झिला, घरादाराची आठव, रे ॥

चल, चेडवा, पडावात्सुन, आगपोटीत जपान्
तुजो घोव रवता शिसिटाचे चाळीत ॥

मराठी नाट्येतिहासाचा प्रचंड कालखंड विचारात घेता आजवर ही भाषा मराठी नाटकांमध्ये सामान्यतः विनोदासाठीच वापरली गेली; या भाषेत संपूर्ण

नाटक लिहिण्याचा प्रयोग कुणी केला नव्हता.

या भाषेचा वापर आजवर अनेक नाटककारांनी आपल्या विनोदी पात्रांच्या तोंडी केलेला आहे. ‘ लव्हटलेव ’ या गाजलेल्या नाटकात श्री. कदम यांनी ‘ पिटा ’ या पात्राच्या तोंडी ही भाषा देऊन लोकांना खूप हसवलं.

शाहीर साबळे यांच्या, ‘ आंधळं दळतंय् ’ या वगनाट्यातला, राजा मयेकरांचा मालवणी बोलणारा पोलिस लोकांचं खूप मनोरंजन करतो.

बऱ्याच वर्षांपूर्वी श्री. आबासाहेब आचरेकर या कामगार रंगभूमीवरील एका नाटककारानं ‘ गाववाले हसतील ’ ह्या नावाचं संपूर्ण मालवणी नाटक लिहून लोकांसमोर आणलं. पण त्याचे प्रयोग कामगार विभागापुरतेच मर्यादित राहिले. त्याची आवश्यक ती दखल मराठी रंगभूमीने घेतली नाही.

त्यानंतर ‘वस्त्रहरण’, ‘धुमशान’, ही दोन निखळ मालवणी नाटकं आली. दोन्हीही नाटकं धंदेवाईकरीत्या यशस्वी झाली. या नाटकांच्या प्रयोगांच्या संख्येवरून, लोकांनी या भाषेतील नाटकांना किती प्रतिसाद दिला, याची कल्पना येईल.या दोन नाटकांमुळे प्रादेशिक बोलीभाषेतील नाटकेही रंगभूमीवर यशस्वी होतात आणि ती उत्तम धंदाही करू शकतात, हे नव्याने सिद्ध झाले.

पूर्वी ही भाषा बोलताना, सुशिक्षित मालवणी माणूस विचकायचा. आपल्या तोंडची मालवणी भाषा ऐकून, आपल्याला कुणी तरी अशिक्षित, अडाणी म्हणेल, याची त्याला धास्ती वाटायची. एखादा गावाकडील माणूस, त्याच्याबरोबर मालवणी बोलायला लागला, तर हा मात्र त्याच्याशी, अस्खलित मराठीतच बोलायचा. या सुशिक्षित मंडळींचं अनुकरण करीत, ज्यांचं जेमतेम शिक्षण झालंय्, ज्यांना शुद्ध मराठी नीटसं बोलता येत नाही, अशी माणसं देखील, समोरच्या मालवणी माणसाबरोबर, अट्टहासानं मराठीतूनच बोलण्याचा प्रयत्न करायची आणि मग मराठीची आणि मालवणी भाषेची एकाच वेळी कत्तल व्हायची.

अलिकडच्या काळात मात्र मालवणी नाटकं लोकप्रिय होऊन धूमधडाक्यात चालू लागल्यापासून, मालवणी भाषक सुशिक्षित मंडळीही, घरात किंवा बाहेरही, आपल्या बोलण्यात, मालवणी भाषेचा सर्रास, बिनधास्तपणे

वापर करू लागलींयत. मुंबईत भरलेल्या सभा-संमेलनांत देखील सुशिक्षित मंडळी व्यासपीठावरून चक्क मालवणीतून भाषणं करू लागली आहेत, ही फार आनंदाची गोष्ट आहे.

मालवणी नाटकावर प्रेम करणाऱ्या पुण्याकडील एका सद्गृहस्थानं तर म्हणूनच टाकलं,

' अहो, आमच्या मित्रमंडळींत, तोडकीमोडकी का होईना....मालवणी बोलण्याची अलीकडे फॅशन होऊन बसली आहे. '

जी भाषा बोलताना खुद्द मालवणी माणसांना लाज वाटायची, त्या भाषेच इतका गौरव झाल्यावर, कुठल्या मालवणी माणसाचं मन आनंदानं भरून येणार नाही ?

खरं तर मी मूळचा नट. परंतु मला अधून मधून कथात्मक स्वरूपाचं काहीतरी सुचे. मी नाट्य-व्यवसायातच असल्यामुळं हे जे काही सुचे, ते नाट्यरूपानंच डोक्यात गरगरत राही. त्याला शब्दरूप मिळालेलं नव्हतं.

१९६३ साली, माझे परम स्नेही कै. बाळ राणे यांच्या प्रेरणेनं मी माझं पहिलं मराठी नाटक लिहिलं. आणि श्री. बाळ राणे, हरीश साटम, हाईम पेणकर आणि शांताराम शिंगोटे या माझ्या मित्रमंडळींच्या सहकार्यानं ते लोकांसमोर आणलं. या नाटकाचं नाव : ' सोनी. '

त्यानंतर बराच काळ मी फक्त नाटकांतच कामं करीत राहिलो. जुळा गोंधळ, काचेचा चंद्र, नटसम्राट वगैरे नाटकांत मी भूमिका केल्या.

मी पुन्हा काही तरी लिहावं, आणि तेही मालवणी भाषेत, असा आग्रह विमल जोशींचा !

त्यांनी मला बोलीभाषेचं महत्त्व पटवून दिलं. तिच्यातील नाट्यपूर्णता आणि स्वभावगत गतिमानता मला समजावून सांगितली आणि माझ्याकडून रेडिओसाठी पहिली मालवणी श्रुतिका लिहवून घेतली. तिचं नाव होतं : ' आये, मी वचन देतंय. '

त्या नंतर ' अंदाजपंचे ', ' चाकरमानी ', ' शल्ली पाळी ', 'चेडू माज पांगळा ', ' झील म्हना न्हयं आपलो ', ' उबो रव खळ्यात' वगैरे रेडिओ-श्रुतिका लिहिल्या आणि त्या रेडिओवर सादरही झाल्या. श्रोत्यांकडून

त्या साऱ्यांचं खूप कौतुक झालं.

हे कौतुक हेच प्रोत्साहन समजून आपण आता तीन अंकी मालवणी नाटक लिहावं, असं मला राहून राहून वाटू लागलं.

'चाकरमानी' या माझ्या रेडिओ–श्रुतिकेत मच्छिंद्र कांबळी यानं एक भूमिका केली होती. या श्रुतिकेचा जो अंतःप्रवाह होता, तो त्याला खूप आवडला होता. या कथासूत्रावर तीन अंकी नाटक लिहिलं जावं, असं त्याला तीव्रतेनं वाटलं असावं, म्हणूनच त्यानं या श्रुतिकेच्या हस्तलिखिताची एक प्रत आपल्याकडे ठेवून घेतली होती.

बऱ्याच दिवसांनंतर मच्छिंद्रनं, भद्रकाली प्रॉडक्शन्स् या संस्थेची स्थापना केली आणि त्या संस्थेचं पहिलं नाटक मी लिहावं, अर्थात चाकरमानीच्या कथासूत्रावर, आणि 'चाकरमानी' हे नाव देऊनच, असं त्यानं मला सुचविलं.

....आणि अनेक दिवस माझ्या मनात घोळत असलेलं तीन अंकी मालवणी नाटक 'चाकरमानी'च्या रूपानं मूर्त स्वरूप घेऊ लागलं.

'चाकरमानी' म्हणजे खेडेगावातला माणूस शहरात येऊन मानाची चाकरी करणारा... गावच्या लोकांच्या दृष्टीनं तो चाकरमानी! या नाटकाचा नायक, चाकरमानी, मालवणमधल्याच खेडेगावांत आढळतो, असं नाही. भारतातील कुठल्याही खेडेगावात, इतकंच काय, जगाच्या पाठीवर– जिथं, खेडेगावातली माणसं पोटापाण्याच्या उद्योगासाठी शहराकडे धाव घेताहेत, तिथं नोकरी धरून विश्रांतीसाठी सुट्टी घेऊन आपल्या गावी येताहेत, तिथं तिथं तुम्हांला हा 'चाकरमानी' सापडेल, कमी–अधिक फरकात... पण सापडेल. त्याचा चेहरा वेगळा असेल, पेहराव वेगळा असेल, भाषा वेगळी असेल.... पण वृत्ती हीच!

हा 'चाकरमानी' मला मालवणच्या परिसरात दिसला, तेव्हा त्या मातीतील अनेक माणसं त्याच्या आजूबाजूला होती. त्या माणसांचे स्वभाव, त्यांच्यांतील बेदरकारपणा, लोचटपणा, रिकामटेकडेपणा, आळस, अंधविश्वास आणि सच्चेपणा, या चाकरमान्याच्या अस्तित्वाला फुलवतील, त्याच्या

स्वभावातली वैशिष्ट्यं ठळक बनवतील आणि त्यातून त्याची शोकांतिका निर्माण करतील, याची मला खात्री पटली आणि या नाटकाचं नवीन कथानक...जे श्रुतिकेहून बरंच वेगळं आहे....जन्माला आलं.

'चाकरमानी' या नाटकाचं कथानक जिथं घडतं, तो परिसर मी मालवणातल्या खेडेगावचाच निवडला. कारण त्या परिसरात मी जन्माला आलो. मालवणी भाषा बोलता बोलता लहानाचा मोठा झालो. तिथल्या माणसांत मी वावरलो. त्यांचे गुणदोष, सवयी, स्वभाव, सुखदुःखं मी अगदी जवळून निरखली. आणि विशेष म्हणजे, माझ्या कथानकाचा जो नायक चाकरमानी, त्याला अनेक रूपांत मी तिथंच पाहत आलो आहे.

हा 'चाकरमानी' रंगभूमीवर येण्यासाठी अनेक माणसांनी मदतीचे हात पुढे केले :

मच्छिंद्र कांबळी याने आपल्या 'भद्रकाली प्रॉडक्शन्स्' या नव्याने सुरू केलेल्या नाट्य-संस्थेतर्फे मोठ्या थाटामाटात चाकरमान्याला रंगभूमीवर आणलं...

रमेश रणदिवे, लीलाधर कांबळी आणि खुद्द मच्छिंद्र यांनी मूळ नाटकाच्या हस्तलिखितात प्रयोगदृष्ट्या महत्त्वाचे असे काही योग्य बदल सुचवून त्याची रंगत आणखीन वाढवली....

रघुवीर तळाशिलकरनं मोठ्या मेहनतीनं सेट उभा करून कोकणाचं जिवंत दर्शन प्रेक्षकांना घडवलं....

श्री. यशवन्त देव यांनी या नाटकाच्या नांदीला श्रवणसमृद्ध चाल लावली आणि पोषक असं पार्श्वसंगीत दिलं...

स्व. वसंतराव देशपांडे आणि सौ. आशा खाडिलकर यांनी हीच नांदी आपल्या देवदत्त सुरांनी नटविली....

या नाटकात काम करणारा नटसंच, सहकारी, होळीच्या दृश्यानं प्रेक्षकांना मंत्रमुग्ध करणारे श्री. शशिकांत पाताडे...

—आणि 'मॅजेस्टिक बुक स्टॉल'चे श्री. अशोक केशव कोठावळे, यांनी दाखविलेलं अगत्य....

मी या सर्वांचा मनःपूर्वक ऋणी आहे.

—सुंदर तळाशिलकर

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
वा. क्र.............. नों. दि ..............
दि. .............. क्र. ..............

# अंक पहिला

## प्रवेश पहिला

[ स्थळ : कोकणातील एका खेडेगावातील चहाचं हॉटेल. हॉटेलचं नाव आहे, 'लक्सूमन याचे मुंबै फॅसन चहाचे हाटेल.' हॉटेल-पासून हाकेच्या अंतरावर एस्. टी. स्टँड आहे. हॉटेल झावळांनी शिवलेलं आहे. गिऱ्हाइकांना बसण्यासाठी अंगणात दोन बाकडीं ठेवलेली आहेत. हॉटेलात सात–आठ बरण्या आहेत. बरण्यांत खटखटे लाडू, शेव, बिस्किटं वगैरे पदार्थ ठेवलेले आहेत. झावळांच्या भिंतींवर दोन–तीन जुनी कॅलेंडरं लटकताहेत. मालकाला बसण्यासाठी एक जुनी खुर्ची मोडक्या काऊंटरशेजारी ठेवलेली आहे.

हॉटेलच्या मालकाचं नाव आहे लक्ष्मण आणि त्याच्या नोकराचं नाव आहे सोनक्याचा.

वेळ सकाळची. दोघे–तिघे गावकरी चहाची वाट बघत बाकड्यावर बसून गप्पा मारताहेत. हॉटेलचा मालक काऊंटरशेजारी उभा आहे.]

**लक्षा** : सोनक्याच्या, मेल्या, झाला, की नाय ? गिरायका वाट बगतंत.

**सोनक्याचा** : (आतून) झाला, झाला. (बाहेर येत) ही घेवा. (तो चहानं भरलेली दोन ग्लासं लक्ष्मणच्या हाती देतो. लक्ष्मण दोन्ही भरलेली ग्लासं हॉटेलच्या समोर असलेल्या पिंपळाच्या झाडाच्या मुळात ओततो. वळतो.)

**लक्षा** : बसा हां. चाय हाडतंयू. सोनक्याच्या, हेंका सादा चाय दी.

[ गावकरी चहा पीत असताना भिक्या वस्त विडी ओढीत प्रवेश करतो. येऊन पिंपळाच्या पारावर बसतो. इतक्यात त्याला कावळ्याचा आवाज ऐकू येतो. तो उठून उभा राहतो. ]

भिक्या : काव काव, सोन्याची पाव, चाकरमानी यैत, तर ऊट. ऊट ! कावळो उटलो. चाकरमानी येतलो. चाकरमानी येतलो.

[ पुन्हा आपल्या जागी येऊन बसतो. ]

लक्ष्या : सोनक्याच्या, मेल्या, भिको इलो. आनी भिक्याचो कावळो देकूल इलो.

सोनक्याचा : दोघांचा कूळ याकच.

[ हरी आणि ज्ञानदेव येतात. हरीच्या खांद्यावर नांगर आहे. ज्ञानदेवाच्या हातात पिशवी आहे. ]

भिक्या : हरग्या, मेल्या, सकाळी सकाळीच नांगर खांद्यावर मारून जातस खंय ? पावस नाय, पानी नाय....

हरी : अरे, पाउस आता नसलो, तरी तो येतलो. तयारी करूची लागता.

भिक्या : तुजी तयारी बाकी जबरी हां ! गिम पाउस तुजी तयारी.

हरी : तेच्याशिवाय फळ कसा मिळात ?

भिक्या : तुजी सगळी फळां किती, रे ?

हरी : मोजून सांगा ?

भिक्या : तुका मेजूक् येता ? मेल्या, साळा बांदल्यापासून ती मोडासर यका यत्तेत बसकन् मारून होतंस. वेचो पाडो येन्याआदी तुजा शिक्षान बन.

हरी : भिक्या, तू शिकान् ळय न्याल पडलंस, तो म्हायत आसंस. आमका सांगा नुको.

भिक्या : माज्या शिक्षानाच्या....

लक्ष्या : मेल्यांनू, सकाळी सकाळीच भांडतास खेका ?

हरी : अरे, ह्यो भिको माका सांगता, मिया, साळा बांदल्यापासून ती मोडासर यका यत्तेत होतंय्, म्हनान्. आनी ह्यो ?

लक्ष्या : अरे, तेचा पन तुज्यासारख्याच. तुमच्यांत मिया वाय्च उजवो होतंय् .

भिक्या : उजवो, म्हंजे काय, लक्ष्या ? तुजो गनीत इशय पक्को होतो....

लक्षा : म्हनान् मी हाटेल काडलंय्. या मेल्या भिक्याचे सगळेच इशय कच्चे, म्हनान् अशे फाके मारता हा.

[ सर्वजण हसतात. भिक्या खजील होतो. ]

हरी : आय्‌क्....आय्‌क् ...

भिक्या : आयूकलंय्

[ दोघे गावकरी निघून जातात. भिक्या आपल्या जागेवरून उठतो. सोनक्यान्यावर तापतो. ]

भिक्या : सोनक्याच्या, ही गलासा कोन उचलतंलो ?

सोनक्याचा : माज्यावर कित्या तापतंस ?

[ तो ग्लास उचलून घेऊन जातो. ]

भिक्या : हरग्या, नांगर घेव्‌न्, रे, खंय ?

हरी : इशय बदलू नुको. शिवा सुताराकडे जातंय्. जगाल भरूची आसा. थंयसून जमल्यास मालवनाक् जाव्‌चा आसा.

भिक्या : कित्या, रे ?

हरी : घराची काटी मोडली हा. ह्यो ज्ञानदेव घर फिरव्‌क् वर चडलो, तर, मेलो, वरसून काटयें मोडान् जो खाली घसारलो, तो वाशाक् पाय अडकान् वागळासारको लोंबत रवलो. माका वाटला, जीव जाता हेचो तोंडातसून. पन नाय, पलाटलो.

भिक्या : तेका पलटाची सवय आसा.

ज्ञानदेव : तुया वगी रव हां, भिक्या. हरग्या, ती काटी आदी बदल. किड्याली हा. मिया म्हनान् सावारलंय्. दुसरो बिसरो मोडान् पडलो असतो.

भिक्या : तुयां मोडलंस, तरी पडाचंस नाय. तुया हरग्याचो घेडो. तुया पडलंस, की हरगो मोडलो.

ज्ञानदेव : तुका मदी बोलाक्‌च होया, भिक्या !

भिक्या : तू आदी सरळ बस. आनी व्हयता कानातला बॉट भायर काड.

ज्ञानदेव : आनी काय करू ?

भिक्या : काय करू नुको. नशीब आमचा, कानातच बॉट घालतंस !
ज्ञानदेव : भिक्या, जेची तेची तू टवाळी करतंस.

[ ज्ञानदेव भिक्याला मारायला उठतो. हरी त्याला हाताला धरून बाकड्यावर बसवतो. ]

हरी : तू बस, बगू. अरे, संतांनी म्हतल्यानी आसा, निंदकाचे घर, असावे शेजारी.
भिक्या : कोणी म्हतल्यान् हा ह्या, हरग्या ?
हरी : ( रागाने ) तुज्या बापाशीन्.
भिक्या : माजो बापूस, बॉ, बुवा नाय होतो. आता म्हतल्यानंच आसात, तर ता तुज्या बापाशीन्.
ज्ञानदेव : कोनाच्यात् बापाशीन् म्हनानेत, तुका आयकाचा आसात, तर तू आयक्. नाय तर सोडून दी.
भिक्या : म्हंजे ह्या बरा, सगळा आमी आयकाचा, तुया कान बन करून मोकळो ! कान खोलून टाक, मेल्या. असला कानात पडला, तर तुज्यात सुदारना होयत.
ज्ञानदेव : आनी तुज्यात ?
लक्ष्मा : तेच्यात काय पन सुदारना होवची नाय. हरगो, बग, कसो सुदरत चल्लो हा. हाली म्हारूती म्हाराजांच्या मटात जाता.
भिक्या : हरगो कोनच्याव् मटात गेलो, तरी हरगो ह्यो हरगोच रवतंलो.
लक्ष्मा : आनी भिको ह्यो भिकोच रवतंलो. थांबा, मेल्यांनू ! तो, बगा, पाटो येता हा. एकटोच.

[ वीस-बावीस वर्षांचा एक तरुण, चेहऱ्यावरून त्रस्त दिसणारा, हॉटेलच्या दिशेनं येतो. ]

सोनक्याचा : होय, रे, होय. भावाशीची वाट बगून, पुळणीत सुकान् , शेळकुंडासारखो खडखडीत होवून् येता हा. ( सर्वजण खो खो हसतात. पाट्या दचकून तिथेच थांबतो. ) काय, पाट्या, टकलेर टरंग नाय तो ?
पाट्या : तुज्यासाटी इष्टी स्टँडवर ठेवलय्. जा, उचलून घेवून् ये. लय जड आसा.

चोरयेचा खावृन् माजलंल्य रेड्याशियाव उचलाचो नाय.

[ सर्वंजण पुन्हा हसतात. सोनक्याचा खजील होतो. ]

लक्षा : काय झाला, रे, पाऱ्या ?

पाट्या : इष्टी इली....भावस नाय.

लक्षा : असा कसा ?

पाट्या : ता माज्या भावाशीक् मुंबैक् जावृन् इचारून ये. अच्या कच्या !

[ पाऱ्या तिरीमिरीत निघून जातो. ]

भिक्या : लक्षा, मेल्या, तुया तेच्या भानगडीत गेल्लंस खेका ? वोवाळून टाकलंलो पोर तो. आता एक इडी दी बगू.

लक्षा : भिक्या, आता सगळा म्हाग झाला. इडी–काडी देकूल म्हाग झाली.

भिक्या : तरी वडूची कोनी सोडल्यान् हा ?

लक्षा : सवताच्या कमायची वडूक् हरकत नाय.

भिक्या : लक्षा, असा घालून पाडून बोला नुको हां एका इड्येसाटी. अरे, एक च्याकरमानी येवनेत. इड्येच्या बंडलांत जाळतंय् तुका ! ( सोनक्याचा जळतं कोलीत घेऊन येतो. भिक्या त्यावर विडी पेटवतो. ) तुका काय वाटला, भिको उलागलो ? लक्षा, आता इष्टी सुटले हत गावात यौक. तिऱ्याक् लागानेत, की भिक्याची कालर ताट.

लक्षा : अरे, मेल्या शितलो पाटकार यौंचो आसा.

भिक्या : हरग्या, मेलया, डिच्या न्हावयाक् सांगान् ठेवूक् होया.

हरी : काय ?

भिक्या : वस्तऱ्याक् धार काडून ठेवूक्. च्याकरमानी इलो, की खरडाव्.

लक्षा : हरग्या, टॉल टकलेक् बान. नायतर टरंग टाळयेर घसटात.

भिक्या : अरे, मागच्या येळेक् तो कृष्णा भेरो इलो, तेवा टरंग उचलताना ह्या हरग्याच्या टाळयेचा चकान गेल्लंला.

हरी : अरे, तेचो टरंग खालसून फुटलंलो.

लक्षा : ( भिक्याला ) आनी तुज्या, मेल्या, तेनी मुंबैक् जाताना हातात काडून दिल्यान्.... रुपयाची नोट.

भिक्या : अरे, मेल्यांनू , चाकरमानी कोरो आसासर, तेची धुलाय करन्यात मजा. आता शितलो पाटकार इलो....

लक्षा : आता खंयसून येतंलो ? तेचो भावस...

हरी : अरे, तो बगा, चाकरमानी इलो !

[ चाकरमानी सीताराम पाटकर प्रवेश करतो. त्याच्या एका खांद्यावर चटई, दुसऱ्यावर ट्रँझिस्टर लोंबकळतोय्. हातात बॅग, छत्री, कांद्या-बटाट्यांनी भरलेली बादली, एअर-बॅग. त्याचा पेहेराव म्हणजे शर्ट, पँट, पायांत बूट, डोळ्यांना काळा चश्मा. बोटांत चार आंगठ्या. त्याला पाहताच भिक्या, हरी, ज्ञानदेव वगैरे मंडळी धावत पुढे जातात. त्याचं सामान घेतात. हरी त्याची बॅग डोक्यावर घेतो. ज्ञानदेव चटई, बादली वगैरे सामान उचलतो. ]

भिक्या : चला.... चला.... चाकरमान्यांनू , लक्षाच्या हटलात वाय्च इसरांती घेवा.

[ ते सर्वजण चाकरमान्याला लक्षाच्या हॉटेलात आणतात. ]

भिक्या : हरग्या, बॅग खाली ठेव आनी आपल्या कामाक् जा बगू.

[ हरी बॅग खाली ठेवतो. ]

सीताराम : थांब, थांब, हे दोन रुपये घे, हरी.

हरी : माका खेका ? मिया आपलो, तुमका जड व्हैत, म्हनान् उचललंय्. पन, चाकारमान्यांनू , हाली मुंबैक् देकूल म्हागाय लय वाडली, असा, बुवा, आयकलंय् आमी.

सीताराम : मग हे पाच रुपये घे.

हरी : पैशे खेका ? अहो, मानसाकुडे काय पैसो अदीक आसा ?

भिक्या : हरग्या, आता जा, बगू. तुजा तुका गावला ना ?

हरी : पन टरंग....

भिक्या : तेंचो भावस यैत आनी घेव्न् जायत. तुया जा आपल्या कामाक्. नांगर भरूचो आसा ना ? (हरी निघून जातो. ) आनी, घेनग्या, हयती

चटय खाली ठेव, बगू

[ ज्ञानदेव चटई खाली ठेवतो. तिथेच उभा राहतो. ]

**सीताराम** : तुला दोन रुपये घे.

**ज्ञानदेव** : आमका काय हरग्यासारख्या बोलाक् येता ? नाय तर आमीव् फुडारी झालं आसतंव् .

**सीताराम** : बरं, हे पाच रुपये घे.

**ज्ञानदेव** : बरा, च्याकरमान्यांनू , येतंय्.

[ तो जाऊ लागतो. भिक्या त्याला अडवतो. ]

**भिक्या** : घेनग्या, पाम्याक् सांग, तेचो भावस इलो हा.

**ज्ञानदेव** : बरा, सांगतंय्.

[ ज्ञानदेव निघून जातो. ]

**सीताराम** : ( लक्षाकडे वळून ) काय, लक्ष्या ? कसं काय चल्लंय् तुजं ?

**लक्षा** : ( आश्चर्याने ) लक्ष्या !

**सीताराम** : आजून हाटेल समाळतो हायस ना ?

**लक्षा** : आता दुसरा काय समाळन्यासारख्या आसा ? हाटेल आनी गिरायका !

**भिक्या** : अहो, बसा, च्याकरमान्यांनू. उबे कित्या ?

**सीताराम** : अरे, लय येळ बसलोय् इष्टीत. बसून बसून पाय देकूल भेऱ्याले हायत.

**लक्षा** : मग उबेच रवा.

**भिक्या** : च्याकरमानी बाकी खंयपन वळकाचे, नाय, लक्षा ? मेल्या, उटान् दिसतंत.

**सीताराम** : मग बसू ?

**भिक्या** : बसा.

**लक्षा** : अरे, तेंची इस्तारी मोडात.

**सीताराम** : टेरेलिनची पँट हाय, लक्ष्या, तेची इस्तारी मोडत नाय.

[ बसण्याचा प्रयत्न करतो. ]

भिक्या : थांबा, थांबा.... पाटलंन मळात.... रे, सोनक्याच्या ! मेल्या, बाकड्यार फडको मार. चाकरमान्यांची पाटलंन मळात. ( सोनक्याचा धावत येतो. बाकड्यावर फडका मारतो. ) आता बसा. ( सीताराम बसतो. )

लक्ष्या : काय मग, चाकरमान्यांनू , आमच्या भयनीचो झील दिसलल्लो ?

सीताराम : हा....हा....तो इस्वनात ? मागच्या हफ्त्यात गमला होता सांडावता भायकळ्याच्या विरीजवर. मी इचारलं, खंय जातोस, म्हनून. घाईत होता. गप्पनी गेला. हाली मुंबैत काय, रे.... कोनाला कोन भेटत नाय. परतेक जन आपल्या कामात असतो. पन, लक्षुमन, तो रवायला कुटे हाय ?

लक्ष्या : लालबागेक्– चाळीच्या गिरनीजवळ.

सीताराम : अस्सं.... अस्सं. मी पन तिथंच रवायला हाय. कडजोडीतल्या चाळीत. तळाला. शेड्यावरची संडासाजवळची खोली माजी. माजी, म्हंजे झिलग्यांची. आमचं तिथं भजन हाय. मी तिथला फेमस बुवा.

भिक्या : बुवा ? म्हंजे येताना दाडीबिडी शाप करून इलास, की काय ? ह्या आपला बरा ! मुंबैत बुवा, गावात चाकरमानी.

सीताराम : अरे, बुवा–म्हंजे भजनात गातो मी. भीक मागत नाय. ' अलक निरंजन ! माई, भिक्षा वाडो ! ' हेतला बुवा नाय मी....गातो.... अभंग, गौळणी...

भिक्या : अस्सा....अस्सा....पन ता जावनेत, चाकरमान्यांनू , तुमका येळ कसो लागलो ?

सीताराम : येळ म्हंजे ? मी नेमीच्या इष्टीनं नाय आलो. फेशल इष्टीनं आलो.

भिक्या : बगलंस, लक्षुमना, चाकरमानी म्हतले, की ते फेशल इष्टीनंच येतंले. तुका माका सादी इष्टी चलात. हेंका कशी चलात ? हेंची पाटलंन बग. आंगडा बग. रुबाब बग. मेल्या, कलेक्टर देकूल उब्यानी सलाम मारीत हेंका.

सीताराम : अरे, मुंबैत तसं न्हावं लागतं. देस, तसा वेस. लक्ष्या, जरा पानी

घे, रे, तांब्योभर. वास घेतो.

भिक्या : वास ?

सीताराम : अरे, वास, म्हंजे तो वास नाय....तोंडावर पानी....म्हंजे फिरेश होतो.

भिक्या : हां....हां....

[ सोनक्याचा भरलेला तांब्या आणून देतो. ]

भिक्या : चाकरमान्यांनू, तुमची मुंबै म्हंजे मुंबैच आसा.

सीताराम : तू कोन ? भिक्या काय, रे ?

भिक्या : होय.

सीताराम : तांब्या घे. ( भिक्याच्या हाती तांब्या देतो. भिक्या सीतारामाच्या हातावर पाणी ओततो. सीताराम तोंडावर पाणी मारतो. ) बराच येळ बोलतो हायेस. पन मला फामच न्हायला नाय. तुज्यात काय पन बदल झाला नाय हां, भिक्या. हायेस, तसा हायेस. काम कुटं करतोस ?

भिक्या : आता गावात काम कुटं करनार ? आसतंव् आपले अशे बसान्.

सीताराम : हे बरं नाय, भिक्या. मानसानं कसं हरहम्मेशा काम केलं पायजे. तरच पैसा गावनार.

भिक्या : चाकरमान्यांनू, हंय कामव् गावना नाय, आनी पैसोव् गावना नाय.

सीताराम : अरे, हिंडायला पायजे. सगळं गावते. गावत नाय कशाला ?

लक्षा : सकाळपासून सांजेपर्यंत ह्यो खांद्यार ट्वॉल टाकून गावभर हिंडत आसता. पन कामच गावना नाय तेका.

सीताराम : अरे, असं काय रस्त्यावर पडलेलं असतं काय काम ? कोनाला तरी इचारलं पायजे. कोनाला तरी दादा–मामा केलं पायजे. मामावरून बरी आठवन झाली. अरे, तो भोटमामा हाय का आजून ?

लक्षा : हळू बोला. आयकल्यान्, तर फिरान यैत–बैलासारखो.

भिक्या : ता लोकांचा जावनेत. तुमी चाय घेवा, बगू. लक्ष्या, मेल्या, बोलत काय रवलंस ? चाकरमानी जागरनाचे हत. एक कडक, फेसल चाय बनवून दी बगू तेंका. तरतरी येवनेत. आनी चार खटखटे लाडू

फोड्डक् दी. म्हंजे डोळे पैंगाचे नाय. चाकरमान्यांनू, खरा सांगा!

सीताराम : म्हंजे आतापर्यंत खोटं सांगत होतास ?

भिक्या : ह्यो मुंबैचो जोक ना ? अहो, गावातली बोलाची ही पद्धत हा. तर काय सांगा होतंय् मी ?....लक्षा, काय सांगा होतंय्, रे, मी ?

लक्षा : मेल्या, खरा सांगा होतंस.

भिक्या : हां....हां....खरा सांगा होतंय्. तर, चाकरमान्यांनू, खरा सांगाचा, म्हंजे तुमी शंभर वर्सां जगतालास.

सीताराम : ते कसं ? तुला जोतिस वगैरे कळतं, की काय ?

भिक्या : अहो, जोतिस खेका कळाक् होया ? आताच तुमची आटव काडललंव् आनी समूर बगतंय्, तर तुमी देवासारखे उबे. चाकरमान्यांका बगला, की बरा वाटता. नाय, लक्षा ? मेल्या, बोलता बोलता येळ कदी जाता, कळनाच नाय. लक्षा, बेगीन. एकच फेसल हां.

सीताराम : एकच कशाला ? तू फेसल चाय खात नायस ?

भिक्या : मिया ? अहो, मिया फेसल चायच काय, खटखटे लाडू देकूल खातंय्. कुड्याचे इडये देकूल वडतंय्. पन ते मिळाक् होये ना.

सीताराम : अरे, असा काय करतोस ? मानसानं लाजू न्हये. लक्षुमन, याला देकूल एक फेसल चाय दे.

भिक्या : माका सादी चलात.

सीताराम : अरे, सादी कसली खातोस ? मी मुंबैसून आलो हाय ना. फेसल खा. खटखटे लाडू खानार ?

भिक्या : आता दिलास, तर नको म्हनाची आमची हिंमत आसा ? अहो, आमी चाकरमान्यांच्या आज्ञेत वागनारी मानसा.

सीताराम : लक्ष्या, खटखटे लाडू घेऊन ये.

[ लक्षा बशीतून चार खटखटे लाडू घेऊन येतो. ]

भिक्या : ह्या काय, मेल्या ? दोन मानसां आनी चार लाडू खेका ?

सीताराम : आता हानले हायेत, तर असू दे.

भिक्या : तुमी घेवा, वगू, लाडू.

सीताराम : मी खात नाय.

भिक्या : किऱ्या ?

सीताराम : माज्या फेमिली डॉक्टरनं सांगितला.

भिक्या : काय ?

सीताराम : माज्या डायबिटीसला मधूमेव हाय, म्हनून. गोड खायचा नाय– चायशिवाय.

भिक्या : अस्सा....मग चाय खातंलास ना ?

सीताराम : चाय खायलाच पायजे.

भिक्या : सोनक्याच्या....(सोनक्याचा दोन चहा घेऊन धावत येतो.) घेवा, बगू, चाकरमान्यांनू ! (सीताराम आणि भिक्या चहा पितात.) लक्ष्या, मेल्या, चाकरमान्यांचा मन म्हंजे न्हयच्या पानयासारख्या आसा. तुमच्यासारखे कानांत बोटा घालून हुंगनत नाय ते. तेंचो हात नेमी वर. तेनी एकदा सांगल्यानी, की आयकाकूच होया. थंय अपील नाय. चाकरमान्यांका बगून चाय बाकी मुंबय फॅसन केलंस. फस-कलास कार्यकरम झालो. आता यॅक खुटान् दी, बगू.

सीताराम : खुटान् कशाला वडतोस ?

भिक्या : अहो, इडये म्हाग झाले. तुमका आपला काय वाटना नाय. बंड-लाच्या बंडला तुमी इकत घेवूक् शकतास. आमचा तसा नाय. एक इडी आमी इजवून इजवून तीनदा वडतलंव्. ती देकूल वटाक् चटको लागासर.

सीताराम : विड्या पायजेत काय ?

भिक्या : आता दिलास, तर नाय म्हनाची आमची हिंमत आसा ?

सीताराम : लक्ष्मन, एक इडीचं बंडल दे ह्याला.

भिक्या : (आश्चर्याने) बंडल ? आता बाकी कमालच करून टाकलास तुमी, चाकरमान्यांनू ! आमी आपले पुरानातला आयकव्. कर्न असो उदार होतो. कर्न तसो उदार होतो. खरा सांगा ? आमका खोटाच वाटा ता. पन आता पटाक् लागला. कर्न गेलो; पन मागे तुमका ठेवून् गेलो. बरा, आता रजा किती दिवसांची हाडलास ?

सीताराम : अरे, शिगम्यासाठी दोन म्हयन्यांची रजा घेवून् आलो.

भिक्या : आन्खीन वाडवंतलास ?

सीताराम : बगू या !

भिक्या : हारशेत, की काय ? ( स्वतः जोराने हसतो. )

सीताराम : काय झालं ?

भिक्या : मिया देकूल जोक केलंय्. बरा इतको खर्च करून गावात इलास, ते चार दीस इसरांती घेवा. मुंबैक् काय जळली मिळता हा ती ? सकाळी उटल्यापासून जा काम, ता राती निजासर. निजताना देकूल काम. असा लोकां म्हंतंत हा. आमी, बुवा, तुमची मुंबै, की काय, ती ह्या मितीपर्यंत वगूक् नाय.

सीताराम : येतोस, तर चल. तिकीट लावून न्हेतो.

भिक्या : नुको, बाबांनू. आमका तुमची मुंबै नुको. आमचो आपलो गाव आसा, तो बरो. हंय आमी कोनाचे गुलाम नाय. कदीव उटा, कदीव झोपा, कदीव न्हावा, कदीव जेवा, कदीव लावा... मुशेरी. पन आमचा जळला नेमीचाच. तुमचो सांजे काय बेत आसा मा ?

सीताराम : कसला ?

भिक्या : अहो, तलाग चिरडू या.

सीताराम : तलगानं माजं भागनार नाय. मला वाकड्या आरूचा कोंबा पायजे.

भिक्या : तेचो पन बंदोबस्त करू या.

सीताराम : पन आज नुको. इष्टीचा तरास खूप झालाय्. नंतर बगू. घाबरू नुकोस. आता दिवसाला कोंबा मारावा लागनार. बरं, आता येळ होतोय् मला. इष्टीच्या तरासानं अगदी हरमाळायला झाला हाय. लक्षुमन, तुजे पैशे किती झाले ?

लक्षा : आता... तुमी चार खटखटे लाडू... दोन फेसल चाय. येक इडयेचा बंडल भिक्याक्.... आनी हरी, ज्ञानदेव....

सीताराम : अरे, हिशेब कसला करतोस ? हे घे. भिक्या, हे पैशे दे लक्ष्याला.

[ सीतारामजवळून पैसे घेऊन भिक्या ते लक्ष्मणच्या हाती देतो. ]

भिक्या : घे.... तुका काय वाटला ? भिक्याजवळ पैसे नायत, म्हनान् चाकरमान्यांजवळ देकूल पैशे नायत ? अरे, मेल्या, तेनी खिसो उघडो केल्यानी, तर तुजे डोळे लाक होतील.

सीताराम : अरे, असतात आमच्याजवळ पैशे. अरे, सोसायटी असते आमची मुंबैत.

[ लक्ष्मण उरलेले पैसे भिक्याजवळ देतो. ]

भिक्या : चाकरमान्यांनू, हे रवलंले पैशे.

सीताराम : तुज्याजवळ ठेव.

भिक्या : अहो, माका कित्या होये ? बरा.... आता घे म्हंतास, तर नुको म्हनाची आमची हिंमत आसा ? पन, चाकरमान्यांनू, तुमका पाच-धा रुपये म्हंजे फिसगंतेत वाटनंत नाय ना ?

सीताराम : अरे, आमी कमावतो पैशे.

भिक्या : कमवा, कमवा. तुमच्या जिवावर तर आमच्यासारखे जगतंत.

[ इतक्यात सीतारामचा भाऊ पाट्या धावत येतो. ]

पाट्या : बाबी, अरे, घेनग्यान् सांगल्यान् माका, तू इलंस, म्हनान्. केदूळ तुजी वाट बगीत रवलंलंय् इष्टी टँडवर. शेवटी कंटाळान् आताच घराक् गेल्लंलंय् .

भिक्या : बरा झाला, तू इलंस, तो. नाय तर माका घेवून येवूचो लागलो आसतो बोज्या.

सीताराम : अरे, केदा वाडलास भेरड्या माडासारखा ! बोज्या उचल, बगू.

[ पाट्या धावत जाऊन बोज्याला हात घालतो. भिक्या बोज्या उचलायला मदत करतो. ]

भिक्या : समाळून हां, पाट्या, भूतूर काय नाजूक सामायन आसात चाकरन्यांचा, तर फुटात.

पाट्या : तेवडा माका कळता. ही काय माजी पयलीच येळ नाय आसा.

भिक्या : ता माकात्र् म्हायत आसा. तुका हमाली करूची सवय आसा.

पाट्या : काय म्हतलंस ?

सीताराम : बाबल्या, तोंडाला तोंड देऊ नकोस. चल, बगू.

[ डोकीवर सामान घेऊन पाट्या पुढे निघतो. ]

भिक्या : बरा, चाकरमान्यांनू, समाळून जावा. गावात नयीन नयीन कुडना झाली हत, गडगे झाले हत. लोकानी जंयटंय आकाडे घातल्यानी आसत. पाय मुरगाळात. समाळून....

[ इतक्यात ‘ रे, भोटमामा ’ अशी पाट्याची जोरदार आरोळी ऐकू येते. त्या बरोबर पन्नास–पंचावन्न वर्षांचा एक म्हातारा .... रागाने पेटलेला.... सीतारामच्या रोखाने धावत येतो. ]

मामा : कोन, रे, मायझंयो, माका भोटमामा म्हंता ?

सीताराम : मामा, अरे, मला कशाला गाळी घालतोस ?

मामा : तुया माका भोटमामा म्हतलंस ?

सीताराम : नाय.

मामा : मग तुका गाळी लागाचे नाय. तो मायझंयो पाटो....

सीताराम : अरे, माजा भाव तो. त्याची आई आणि माजी आई सेम टु सेम हाय. म्हंजे तुजे गाळी मला देकूल लागनार.

मामा : मग तेका आकरेंक्. नायतर मायझंयाक् फाडून टाकीन !

सीताराम : तू वगी राहा. मी बगतो तेला.

[ सीताराम आत निघून जातो. दुसऱ्या बाजूने पाट्याचा आवाज : ]

पाट्या : रे, भोटमामा !

मामा : बग....बग.... मायझंयो ! अरे, समूर ये. भिमान् जशे दुर्योधनाचे दोन तुकडे करून टाकल्यान्, तशे तुजे दोन तुकडे करून उगावतेक् मावळतेक् फेकून दैन !

पाट्या : भोटमामा, तुजा महाभारत कच्चा आसा. तू नपास, भोटमामा, नपास !

मामा : अरे, तुजो बापूस नपास ! तुजी आवस नपास ! आजो नपास ! खापरपंजो नपास ! अरे, फुडे ये !

पाट्या : भोटमामा ! हंयसूनच सांगतंय्. भीमान् जरासंधाचे दोन तुकडे केल्लंल्यान्.

मामा : अरे, मी तुजे करतंय्. हाताक् गाव. बायकोच्या नथीतून तीर

मारू नुको.

पाट्या : भोटमामा, तीर इलो, तुजो पंजो समाळ.

मामा : मी माजा सगळा समाळतंय्. तू तुका समाळ! (पाट्याच्या दिशेने तो तीरासारखा जात असता त्याला समोर भिक्या दिसतो.) तू....तू माका भोटमामा म्हना होतंस?

भिक्या : मी? अरे, माज्या सख्ख्या मामाक् मी कदी मामा म्हनाक् नाय, तर तुका गावमामाक् मी भोटमामा कित्या म्हनान्?

लक्षा : मामा, घाड्या, तो तुका नाय म्हनाचो भोटमामा. चाय खा, ये.

मामा : अरे, माका तुमची चाय नुको. तुमी मानसाक् चिडवून चिडवून मॅट करशाल.

भिक्या : अरे, पन, मामा, आपन चिडता कामा न्हये. ह्या कानान् आयकायचा आनी ह्या कानान् सोडून द्यायचा.

मामा : तुज्यासारखी माका सवय नाय कोनाचाच आयकान् घेव्ची. मनाच्या इरुद कोन काय बोल्ला....

पाट्या : रे, भोटमामा!

मामा : तुज्या आवशीचो घोव्! ह्या मिनीपर्यंत कोनाचो वसावळो नाय. अजून सवताच्या पायावर उभो हंय. मी कित्या कोनाचा आयकान् घेन? यका यकाक् जितो गाडीन डुरक्यात! तेवा कळात, मामाचा वशेद.

पाट्या : भोटमामा, तुजा वशेद दी माका.

मामा : यतंय्.. यतंय्...

[पिसाळलेल्या मामाला भिक्या आणि लक्षा धरण्याचा प्रयत्न करीत असतानाच सीताराम पुन्हा येतो....तो मामाला धरून बाकड्यावर बसवतो.]

सीताराम : मामा, शांत हो...वायूच शांत हो.

मामा : अरे, तेचो कुळक्षा करून टाकीन. यॅक गाराना घालीन, तर!

सीताराम : तुजी पावर मला म्हायत हाय. येडा हाय....

मामा : कोन?

सीताराम : तो पाऱ्या....तू चाय खानार?

मामा : नाय.

सीताराम : असं काय करतोस? मी मुंबैसून आलो हाय. हे पाच रुपये घे खर्चाला.

मामा : भीक?

सीताराम : नाय, भक्षीस.

मामा : तुज्या भावाशीन् माजी कळ काडल्यान्, म्हनान् माका भक्षीस देतंस? तुज्या भावाशीक् असा भक्षीस देतंलंय्!

सीताराम : अरे, तो येडा हाय. गावठी हाय. ह्या लोकांच्या संगतीला लागून तो बिगाडला हाय. तेला जाताना मुंबैला घेऊन जानार हाय....घे वगू.

मामा : अरे, मी भिकारी नाय.

सीताराम : भिक्या, हेला घरी पोचव. हे पाच रुपये तुला घे.

[ सीताराम भिक्याच्या हातात पाचची नोट देऊन निघून जातो. ]

भिक्या : चल, मामा, मी तुका पोचवतंय्.

मामा : तू यकटो काय माका पोचवतलंस? मी माज्या पायान् जायन्.

[ घाडीमामा पिरपिरत निघून जातो. भिक्या पाच रुपयांच्या नोटेकडे बघत राहतो. ]

भिक्या : लक्षा, मेल्या, ही बगलंस पाच रुपयांची नोट? काय मायझंयाक् बकात इला ह्या शितल्या पाटकाराक्. मायझंयो, नुसतो पेवता हा. पैसो पेरता हा. काय साल्याचा बोलना!....काय साल्याचा वागना! अरे, माज्या हातात तेनी तांबयो दिल्यान्!

लक्षा : थंयच माका वायट वाटला.

भिक्या : वाटतंलाच. तुया माजो दोसदार. आनी, मेल्या, माका भिको म्हंता? या भिकाजी वस्ताक् ह्यो शितलो पाटकार भिको म्हंता? माज्या पाळन्याक्च झोप काडलंल्यान् की नाय साल्यान्? इस्तारीचे कपडे घातल्यानी, की साल्यांचे हात आभाळाक् टेकतंत. अरे, कोनाकन्, मेल्या, अरे म्हंतंत?

लक्षा : अरे, माका देकूल तेनी फाटकन् लक्ष्या म्हतल्यान्!

भिक्या : थंयच्च माजा टाळक्या कामातून गेल्लंला. पन वगी रवलंय्.
लक्षा : आनी, मेल्या, हेचो बोज्या उचलूक् आता दुसरी मानसा होयी.
भिक्या : आता तूच काय ता वग.

[ इतक्यात सीताराम पाटकरची आई येनूमावशी डोकीवर पाटी, हातांत दोन दळणाऱ्या पिशव्या, घामानं न्हाऊन निघालेली....हॉटेलच्या रोखानं येते. ]

लक्षा : अरे, मेल्या, येनूमावशी !

[ भिक्या धावत जाऊन तिच्या हातांतील दोन्ही पिशव्या घेतो. सोनक्याच्या जवळ देतो. येनूमावशी पाटी हॉटेलच्या बाकड्यावर उतरते. पदरानं घाम पुसते. ]

भिक्या : येनूमावशे, तुका म्हायत नाय काय, गे ?
येनू : काय ?
भिक्या : गे, तुजो झील शिताराम मुंबैसूत चाकरमानी बनान् इलो हा.
येनू : काय, म्हंतंस काय ? मघासच्या इष्टीनं नाय इलो. आता एकदम कसो इलो ? मेल्या, भिकल्या, माजी भगल करू नुको हां. काय, ता सरळ सांग.
भिक्या : गे, हेच्या परास आनखीन सरळ कसा सांगतलंय् ?
येनू : माका कसा नाय कळला ?
भिक्या : गे, चकयेच्या आवाजान् कान भेऱ्याले तुजे. हंय केदी मोटी बोंब ! चाकरमानी इलो....चाकरमानी इलो !
येनू : लक्षा, ह्यो काय सांगता, ता खरा आसा, रे ?
लक्षा : होय, शिताराम इलो.
येनू : ( आनंदून ) माज्यान् ?
भिक्या : तुज्यान्.
येनू : मिया मेलंय्, तर तुमका, रे, काय, मेल्यांनू ! पोचवून मोकळे होशाल आनी चाय-लाडू खावूक् बसशाल...पन ह्या खरा सांगतास ?....
भिक्या : आता तो तुका सांगता, ता पटना नाय. मी तुका सांगतंय्, ता पटना

नाय. तूच घराकडे जा आनी बग....वाडयात पाय ठेवल्याबरोबर आख्खो वाडो कोसाळतंलो.... चाकरमान्याची आवस इली....चाकरमान्याची आवस इली.

येनू : होय, रे, होय. मेल्यांनू, खरा आसात.

भिक्या : खरा आसात ? हे बघ पाच रुपये. तुज्या झिलान् जित्या मानसाक् पोचवूक् माका पाच रुपये दिल्यान्. आता उद्या सकाळी तू मेलंस....

येनू : आग, रे, लागनेत तुज्या तोंडाक्. मेल्यांनू, माज्या मरनाक् कित्या तानेलास ? रे, लक्षा, माका गलासभर पानी दी, रे. गळो सुकलो.

सोनक्याचा : ह्या घे.

लक्षा : आनी, येनूमावशे, ही तुजी मजुरी घे....आट आने !

येनू : आता बरा वाटला.

भिक्या : पैशे बगल्यान्, की म्हातारेक् बरा वाटता !

लक्षा : जा बेगीन–ताजो आसासर पैसे काडून घे. नायतर पेरून टाकतंलो–

येनू : ( आनंदून ) मिया, बाय, नाय हात लावचंय् तेच्या पैशाक्....तेनी सांगल्याशिवाय. टकलेर फाटी दी बगू माज्या.

[ लक्षा येनूमावशीला पाटी उचलायला मदत करतो. इतक्यात येनूमावशीचा धाकटा मुलगा पाट्या धावत येतो. ]

पाट्या : आये....आये....गे, हंय काय करतंस ? बाबी तडे घराकडे वाट बगता हा तुजी. चल, बगू.

येनू : ही घे फाटी. ( पाट्याच्या डोक्यावर ती पाटी चढवते. पाट्या निघून जातो. येनूमावशीला आठवण होते. ) लक्षा, दोन पिशाये नाय, रे....?

लक्षा : तुजो, बाय, हिशेब चुकाचो नाय. हे घे आनी आठ आने. मुद्दाम नाय हां ठेवलंय्. चुकान् खले. नाय तर गावभर करशील.

येनू : जातंय्, रे....भिकल्या, जातंय्, रे. बाबी माजो माजी वाट बगीत आसात. कदी येकदा तेका बगतंय्, असा झाला हा....जातंय्.

[ येनूमावशी घाईघाईने निघून जाते. ]

अं धा र

## प्रवेश दुसरा :

[ वेळ : सकाळची.
भिक्या वस्त लक्षाच्या हाटेलसमोरच्या पिंपळाच्या पारावर विडी फुंकीत बसलेला आहे. इतक्यात सीताराम आपल्या गोतावळ्यासह प्रवेश करतो. सगळ्यांच्या हातांवर मशेरी आहे. ]

**सीताराम** : भिक्या, अरे, तू काय मानूस हायेस ? मी तुला सोदतोय् !

**भिक्या** : आनी मिया तुमका सोदतंय् !

**हरी** : हंय बसान् ! काय, मेल्या, बंडलां मारतंस. चाकारमानयांनू, तुमका ह्यो मस्क्या लावता हा.

**भिक्या** : मिया मस्क्या लावतंय् ? आनी तुयां, चाकरमान्यांका घरापासून हंय-पर्यंत काय लायत हाडलंस ?

**हरी** : भिक्या, तू आता गप रव. माजा टाळक्या सटाक...

**भिक्या** : मग माज्या मस्क्याचा....

[ दोघेही हमरीतुमरीवर येतात. ]

**सीताराम** : इस्टॉप ! तुमी आपसामध्ये खेला भांडता ? मला कोनी कायबी लावलेला नाय. तुमी लोक आजूबाजूला असला, की मला बरा वाटते. आनी तुमालाबी बरा वाटते. म्हनान् येवढी सोदासोदी.

**भिक्या** : सोदासोदी ? अहो, मिया तुमका सोदूक् तुमच्या घरात गेलंय्. जावून बगतंय्, तर काय... तुमी हतरुनार आरासारखे पडलंलास. म्हतला, चाकरमानी येवा उटाचे नाय. आपन आपलो कार्यकरम आटपून घेवंया. म्हनान् धावत न्हयवर गेलंय्. थंयसून इष्टी टॅंडवर आनी

मग हंय येवून् बसलंय्. आपलो कार्यकरम ठरलंलो आसा. थंय बदल नाय.

**सीताराम** : तुजा बरा हाय. एकट्याने तुला सगळं जमते. आपल्या बरोबर चार मानसं असल्याशिवाय कायच करायला जमत नाय. आता कसा बरा वाटतेय्! पन तू येतोस ना?

**भिक्या** : तसो माजो न्हयवरचो कार्यकरम आटपलो. पन तुमी म्हंतास, म्हनान् तुमच्या वांगडाक् येवून बसतंय्.

**सीताराम** : अरे, हा हरी सड्यावर जानार होता. हा ज्ञानदेव खादनात जानार होता.

**भिक्या** : तो खादनातलोच आसा.

**सीताराम** : मला बघितल्याबरोबर आपले कार्यकरम कॅन्सल केले यांनी.

**भिक्या** : तेचा काय आसा....गूळ आसा, थंय हे मासके हृत.

**हरी** : भिक्या ढुमाकना मारू नुको. तुयापन मासकीच....

**ज्ञानदेव** : खेच्यावरची, ता तू समाज....

**भिक्या** : (रागाने) जा दैन यॅक, सात्या, गजगजावून्...

**सीताराम** : जाऊ दे, रे.

**भिक्या** : जावू दे काय? हेच्यात तुमका तेनी वायट म्हतल्यान्....म्हनान् मी चिडलंय्.

**सीताराम** : आपन नदीवरून आल्यावर बगू या. चला, रे!

[लक्ष्मण हॉटेलातून बाहेर येतो.]

**लक्षा** : काय, चाकरमान्यांनू, गोतावळो घेवून खंय चल्लास?

**सीताराम** : (हातातील मशेरी दाखवीत) हातात काय हाय माज्या?

**लक्षा** : मशेरी.

**सीताराम** : मग मी सकाळी कुठे जानार?

**लक्षा** : ता कळ्ला. पन ता येकट्याचा काम. इतकी मानसां खेका? काय, रे, मेल्यांनू? लायनीत बसतंलास?

**भिक्या** : लायनीत नाय. चाकरमानी पानयाजवळ, आमी पुळनीत.

**लक्षा** : येळेर जाताना हातात घड्याळ कित्या?

सीताराम : वाटरपुरुप हाय.

लक्षा : ता कळला...पन खारा पानी जायत ना.

सीताराम : येडा हाय हा ! अरे, वाटरपुरुप म्हंजे जेच्या मदी पानी जात नाय. ते वाटरपुरुप !

लक्षा : म्हनून हातातून काडायचाच नाय, की काय !

सीताराम : कसा काडनार ? आटूमाटीक हाय. हातातून काडून खाली ठेवला, की बन पडनार....असा देनाऱ्यानं सांगितला हाय.

लक्षा : म्हंजे दुसऱ्याचा आसा.

सीताराम : म्हनून रातदिस बांधून राहतो.

लक्षा : मग बरोबर....बाना....बाना.... वाटरपुरुप आसान्, खारा पानी गेला, तरी हरकत नाय....हातातसून काडल्याशिवाय बन पडाचा नाय.

सीताराम : अरे, हाली मुंबैत काय काय झालाय् ! तू मुंबै बघितलीस नाय ना ? म्हनून तुला काय कळनार नाय.

लक्षा : ता बरोबर....पन ह्यो रेडवो.... ?

सीताराम : आता बाकी तुजी कमालच झाली ! अरे, हा रेडवा नाय. हेला टॅन्झीस्टर म्हंतात. हेला लायसन लागत नाय.

लक्षा : लायसन लागना नाय....पन येळेर जाताना खेका ?

सीताराम : अरे, हेच्यावर टायम कळतो.

लक्षा : पन हातात घड्याळ आसा ना ?

सीताराम : तेबी हेच्यावर लावायला मिळते.

लक्षा : मग बाकी वाजतो ठेवा. म्हंजे सगळा वाजपार करूक् बरा. मोठ्यानं लावा, म्हंजे आमकांव् आयकाक् यैत.

सीताराम : तू काय इथं बसनार हायेस ?

लक्षा : इं ! ( सर्वजण खो खो हसतात. )

सीताराम : चला, रे....येडा हाय तो. हे गावठी लोक सुदारनार नायत कदी. लोकांची टवाळी करन्यात हेनला भूशान वाटते. आता येद्या मुद्दम हानला हाय, तर वाजवायचा नाय ? येवढी बेटरी घातली आपल्या पैशाची....तर वाजवायचा नाय ? चला.

[ ट्रॅन्झीस्टरचा आवाज मोठा करून, गोतावळ्यासह सीताराम नदीच्या दिशेने जातो.
दुसऱ्या बाजूने डिच्या न्हावी प्रवेश करतो. तो आवाजाच्या दिशेने पाहतो. ]

डिच्या : लक्षुमना, ही मंडळी कोन ? न्हयच्या बाजून् जाता हा.
लक्षा : पोचवूक् गेले.
डिच्या : पोचवूक् ? आज, बॉ, कोन ?
लक्षा : चाकरमानी....
डिच्या : चाकरमानी ? खंयचो ?
लक्षा : अरे, शितलो पाटकार.
डिच्या : गनपती पाटकाराचो झील, की काय ?
लक्षा : होय.
डिच्या : इलो कदी, आनी गेलो कदी ?
लक्षा : अरे, न्हयीर गेलो.
डिच्या : अस्सा....अस्सा....माका वाटला...
लक्षा : तुका कदी चांगला वाटला हा ? तू, मेल्या, तासूच्या मागे.
डिच्या : अरे, आपलो धंदो मानसान् मन लावून् करूचो. तुया नाय, जितकी गिरायका लय, तितको तकतकतंस-वारनीस लावलंल्या गनपती-सारखो. पन, लक्षुमना, शित्याबरोबर इतकी मानसां कित्या ?
लक्षा : अरे, चाकरमानी म्हतलो, की तेच्या आजूबाजूक् मानसां होयी.
डिच्या : ता जावनेत. तू माका एक चाय दी, बगू !
सोनक्याचा : फेसल, की चालू ?
लक्षा : ह्या मेल्या सोनक्याच्याक् आजून कळना नाय. मानसासारखी तेका चाय देवूक होयी.
डिच्या : म्हंजे माका चालू म्हंतस ?
लक्षा : नाय, रे, बाबा तुका चालू कोन म्हनान् ? तू आमच्या बसकनीतलो मानूस. बस. ( डिच्या बाकडयावर बसतो. ) आज कोनाची केलंस सकाळी सकाळीच ?

डिच्या : काय

लक्षा : आता तू दुसरा काय करतलंस ? हजामत !

डिच्या : उरलंय् , तो तुज्याकडे इलंय् – बस. तुजीच करतंय् .

लक्षा : माजी, बाबा, नुको. अगदीच रिकामो आसशील, तर हयत्या पारार बस. आनी आपलीच खरड. वाडली आसा ती.

डिच्या : अरे, दाडये करून आमका आता खंय मिरवांक् जावचा आसा ?

लक्षा : ह्या सांगा नुको हां, डिच्या. निदान आमका तरी नुको. अरे, तू लोख्यार बसलंस, तरी तुजी नजार आसतंली भुतूर. खंयच्या घरात खंयचा बायलमानूस, खंयचा पाताळ न्हेसला हा, ता बिचाऱ्या त्या न्हेसनाऱ्या मावलेक् म्हायत नसता. पन तुज्या नजरेतसून चुकाचा नाय.

डिच्या : काय कुपरान घेतंस माज्यावर तू, लक्षुमना ! मिया तसल्यांतलो नाय. आता.. लक्ष जाता कोनाचो नाय जाना ? तुया काय बायलमानूस समूरसून जावक् लागला, की डोळे ढापून घेतंस ? नाय ! तसा केलंस, तर कोपात वतूची चाय बाकड्यावर नाय वत्ततलंस ? तर सांगाचा तात्पर्य....

[ सोनक्याचा चहाचा कप पुढे करतो. ]

सोनक्याचा : चाय !

लक्षा : घोट घे. मग सवकास सांग. ( डिच्या बशीत चहा ओतून पिऊ लागतो, ) कोन, रे, ता पाननीतसून जाता हा ?

[ डिच्या चहा पिता पिता वळून बघतो. सर्व चहा त्याच्या अंगावर सांडतो. ]

डिच्या : खंय्...खंय्....कोन जाता हा... ?

लक्षा : मेल्या, खासाइस होव् नुको. मी तुजी भगल केलंय्, हंयता काय, पैरन भिजली. म्हनान् तुज्याकडे हजामत करूक् भय वाटता. समूर पाताळ दिसला, तर दाडी करूची सोडून कान कापून हातात देशील.

डिच्या : तुज्या बाबतीत तसा मी कदी केलंय् ?

लक्षा : माजे दोनय् कान आजून शाबूत हत. म्हंजे नाय म्हनाक् हरकत नाय. पन तेचा कारन येगळा आसा.

डिच्या : काय हा कारन !

लक्षा : अरे, मेल्या ! माज्या घरात कोन बायलमानूस नाय. घरात मी यकटो. भायरची खोली भाडयानं दिलंय्, तो दांडेकार....मास्तर.... तेवा माज्या कानाचो प्रश्नच येना नाय. पन माज्या घरात बायल-मानूस आसता, तर बाकी हिंमत झाली नसती आपनाक् तुज्या हातात हनवटी देव्ची. मेल्या, कापून उडवलं आसतंस कान !

डिच्या : लक्षुमना...भंगली भगलीत तू माज्या अब्रूचा खोबरा करून टाकलंस आनी वर हसतंस ? हस....हस....पन माका यॅक सांग. अख्ख्या गावात कानकापी मानसां किती आसत ? बोल, दातखिळी कित्या बसली ? आता केवा मेवा कोनीतरी टकली हालवली आसात, तर वस्तरा कानावरसून फिरलो आसात. नाय, म्हननंय् नाय, पन ता कवचीत.

लक्षा : ह्या सांगा नुको. आंब्याबुडचो जिवा मेलो. तेवा तेच्या आठ झिलांका न्हयवर जेवा तू तासूक् सुरवात केलंस्, तेवा मिया थंय हजर होतंय्. पयल्याचे कॅस पानी लावून काडलंस. पन दुसऱ्या नंबरापासून आठ्या नंबरापर्योत तू जो ताशीत गेलंस....अडसारा तासतंत, तसो....ता बगून माज्यासारख्या मानसाक् देकूल झीट यौक लागली. यका यकाची चाचावलंली घुडघुडी आनी तेंच्यावर तुज्या वस्तऱ्याची फेसल खापा. मेल्या, सगळो आवाट बगून त्वाज करूक् लागलो तुज्या कलेचा.

डिच्या : लक्षा....वाटयेतला पानी आयत्या येळेक् उपडी झाला, ता तुका दिसला नाय. डिच्यानं चाचावलंली, तेंची;घुडघुडी दिसली. चल्तंय्.

लक्षा : राग इलो ?

डिच्या : शे, रे !

लक्षा : चायचे पैशे दिलंस नाय, म्हनान् इचारलंय्.

डिच्या : पैशे बुडवनंय् नाय. येताना ह्याच वाटेनं येतलंय्. चल्तंय्.

लक्षा : आता, रे, खंय ?

डिच्या : इचारलस ? तुका वायट खोड आसा–कामाक् जाताना मानसाक् इचारूची !

लक्षा : तुजी कामा म्हंजे हजामतीचीच ना ?

डिच्या : म्हंजे ? वस्तऱ्याशिवाय मी दुसरा काय हातात धरनयंच नाय ?

लक्षा : ता, बॉ, मी काय सांगा ? तू व्हया ता धरशील.

डिच्या : लक्षुमना, मी सगळी कामा करतंय्, पन ती बाजूक् रवान्. गोकळा-तल्या कृष्णासारखो....न धरी शस्त्र करी मी !

लक्षा : शस्त्र धरनंस नाय ? मग हजामत खेनी करतंस ?

डिच्या : अरे, कृष्णाच्या हातातला शस्त्र येगळा, माज्या हातातला येगळा.

लक्षा : कृष्णाच्या हातातला शस्त्र काय मिया बगूक् नाय. तुजा शस्त्र मी बगितलंय्.

डिच्या : बगितलंस ना ? बरा केलंस ... चलतंय्.

[डिच्या निघून जातो. लक्ष्मण जाकीट आणि टोपी घालतो. हातात पिशवी घेतो. ]

लक्षा : सोनक्याच्या....

सोनक्याचा : काय म्हंतंस, मामा... ?

लक्षा : मी मालवनातसून जाऊन् येतंय्. सामायन सरला हा. तू लक्ष ठेव, नायतर हटेल उघडा ठेवून गावभर हिंडशील.

सोनक्याचा : नाय.

लक्षा : काय हाडूचा आसा, या यादयेत नाय लिवलेला ?

सोनक्याचा : पाना आनी बेडे घेवून् येवा.

लक्षा : हाडतंय्. खंय जाव नुको.

[ लक्ष्मण निघून जातो. सीताराम, भिक्या, हरी, ग्यानदेव आणि दोन गावकरी नदीवरून परत येतात. ]

सीताराम : भिक्या ...

भिक्या : काय म्हंतास ?

सीताराम : आजकाल रापनी लागत नायत काय, रे ?

भिक्या : लागतंत, तर !
सीताराम : गाबतांच्या होड्या दिसल्या नायत, बॉ.
भिक्या : आता येतील.
हरी : अहो, गाबतिनींका काय तोटो आसा ?
भिक्या : नाय, हरग्या. आता गाबता मालवनाक् जावक् सवाकली. गावातल्या मानसाकडे पैसो खंय आसा ?
हरी : ह्या सांगा नुको. हयत्या लक्षाकडे पैसो कुसता हा.
भिक्या : पैसो कुसलो, तरी लक्षो भायर काडूचो नाय.
सीताराम : अरे, हितली मानसां अशीच. जिबेला काटा मारून पैसा वाचवतील. तो बुडकुल्यात घालून माडाच्या अळ्यात पुरून ठेवतील. जिवाला खानार नायत. अंगावर वापरनार नायत. त्या नोटांना शेवटी वाळी लागनार. अरे, आपल्याला देवाने जीव कशाकरता दिला हाय ? खायला, प्यायला, मजा करायला ! हे कोनाच्या लक्षातच यैत नाय. आपलं खानंपिनं ताट असते. सवाशिवाय आपला घास जानार नाय. सांजे–सकाळ म्हावरं पायजे. अरे, काल गंमतच झाली. आईने डाळीचं पचकवनी पानी उकड्या भातावर वाडलं. नरड्याखाली घास उतरेचना. तसाच उटलो. आई इचारते, बाबी, जेवलास नाय खेला ? आता काय सांगनार तिला ?...आमी मुंबैत काय खातो, ते.
भिक्या : तिका बिचारीक् काय म्हायत, तुमी मुंबैत काय खातास, ता– तिने, आपन खाता, ता तुमच्या फुढ्यात ठेवल्यान्.
सीताराम : अरे, पन माशाशिवाय माझा घास खाली जायल कसा ?

[ इतक्यात सखू गाबतिणीची आरोळी : ' मासे घितास, गे ? ' ]

भिक्या : ही बगा, सखू गाबतीन इली.
सीताराम : मार हाक तिला.
भिक्या : ( ओरडून ) गो, सकल्या गाबतिनी !
सखू : ( आतून ) ओऽऽ.
भिक्या : गो, मेल्या, हडे ये. ( सीतारामाला ) हेच्याकडे मासे चांगले आसतंत, हां.

सीताराम : अरे, ती पन चांगली अशेल.

भिक्या : ता, बुवांनू, आपनाक् काय म्हायत नाय! ( सखू प्रवेश करते. ) तडे खंय जाय होतंस, गो ? चाकरमानी हडे!

सखू : मिया बगूक् नाय.

भिक्या : गो, येद्या मोठ्या चाकरमान्यांका तू बगूक् नाय ? आमी करो दिसतलंव् तुका ?

सीताराम : भिक्या, तिला हँड टच्च कर....

भिक्या : आं ?

सीताराम : अरे, हात लाव....अरे, म्हंजे फाटी उतरायला मदत कर.

भिक्या : करतंय्.

[ भिक्या सखूच्या डोकीवरची फाटी उतरायला मदत करतो. ]

सीताराम : कशी दिलीस पापलेटं ?

सखू : ती म्हाग हत.

सीताराम : म्हाग ?

हरी : गो, कोना वांगडाक् वार्ता करतंस तू ?

सीताराम : हरी, गप. सकल्या, तुला काय वाटला ? मी म्हाग म्हावरा खात नाय ?

सखू : तसा न्हय.

भिक्या : गो, तुजी अख्खी फाटी खरेदी करतील ते.

हरी : तुका देकूल.

सखू : ( उसळते ) काय म्हतलंस, हरग्या ?

सीताराम : गो, तू माज्या बरोबर बोल. त्याने म्हतला, म्हनून मी तुला खरेदी केलंय् का ?

सखू : घेवूचा आसा मा तुमका ?

भिक्या : गो, चाकरमानी तुजी अख्खी रापन खरेदी करतील. आसंस खंय ?

सखू : मिया हंयच आसंय्.

हरी : बोल फाटयेची किंमत!

सखू : दोन रुपये.

सीताराम : आनी पापलेटाची किंमत ?

सखू : एका नगाक् पाच रुपये.

भिक्या : तुजा गनीत कच्चा आसा काय, गो ?

सखू : माजा सगळा पक्क्या आसा. म्हनान् धंदो करतंय्. तुमका नुसती फाटी घेवंची आसा, की माशासकट ? नुसती फाटी घेवची आसा, तर म्हारवड्यात जावा. भरलंली घेवची आसा, तर उचलनाऱ्यान फुडे येवा.

हरी : इतकी जड आसा तुजी फाटी ?

सखू : तुमका जडच आसा. चाकरमान्यांनू, तुमी बगा, बगू. पाच रुपयाक् यॅक पापलेट.

हरी : इतकी म्हाग ?

सीताराम : असू दे, रे. मुंबैत हेच्या परास म्हाग असतात. आमाला हितल्या किमतीचं काय वाटत नाय.

भिक्या : पन, चाकनमान्यांनू, दोन रूप... ( सखू रागाने भिक्याकडे पाहते. )

सीताराम : अरे, गरिबाला आपन जास्त घासघीस करू नये. कैंडून मागू नये. सखू , पाच काढ चांगली ताजी. भिक्या, तुला पायजे ना पापलेट ?

भिक्या : मिया घेवन् काय करतलंय् ?

सीताराम : अरे, बायल हाय ना तुजी ? ती तरी बिचारी कदी खानार पापलेट ? सखू , हेच्यांतला एक फडफडीत भिक्याला दे. एक या हरीला दे. आनी ऱ्हायलेली तीन....

सखू : कोनाच्या घरात टाकू ?

सीताराम : म्हंजे ? अग, माज्या घरी नेऊन दे. आनी हे बघ, हिते माज्या जवळ पैसे नाय हायत. तू आमच्या घरी जा. मम्मीला सांग....

सखू : मामी...

सीताराम : अग, मम्मी म्हंजे आई. तिला सांग, माजी हेअर विंडीयाची बॅग खुंटीला टांगून ठेवलेली हाय. तिच्यामध्ये पैशाचा कोचा हाय. त्यातले पैशे द्यायला सांगितलेले हायत. देनार ती. जा. हात लाव, रे, तिला. ( पुन्हा भिक्या चमकून बघतो. ) अरे, फाटी उचलायला मदत कर.

[भिक्या सखूची पाटी तिच्या डोकीवर उचलून देतो. सीताराम निघून जातो.]

सखू : तुमचा पापलेट खंय देव ?
भिक्या : खंय म्हंजे ? अनुसयेजवळ.

[भिक्या घाईघाईने सीतारामच्या मागे निघून जातो. सखू पाटी डोकीवर घेऊन जाऊ लागते. इतक्यात भिक्याची बायको अनसूया सखूला दिसते.]

सखू : बरा झाला, तू गावलंस, ती. ह्यां पापलेट घे, बगू.
अनसूया : सखू, पैसे आसते, तर तुजीशप्पथ घेतलं आसतंय्. हाली रस्त्याचा काम देकूल बन झाला.
सखू : गे, पैशे देवूक् नुको तुका.
अनसूया : म्हंजे ? माजो घोव काय रापनीक् गेल्लंलो तुमच्या ?
सखू : रापनीशिवाय तेंका मोटो मासो गावलो हा.
अनसूया : म्हंजे ?
सखू : गे, ह्यां पापलेट चाकरमान्यांनी धाडल्यानी हा तुका.
अनसूया : शितारामान् ?
सखू : होय. पैशे ते देतंले. तुज्या घोवान् माका ह्या तुज्याजवळ देवूक् सांगल्यान्—
अनसूया : माका लोकांच्या जिवावर जगाचा नाय आसा, सखू.
सखू : गे, तुज्या घोवान् धाडल्यान् हा.
अनसूया : होय. पन त्या चाकरमान्यांच्या पैशांचा. घोव् माजो खंय कमावूक् गेल्लंलो ? माका नुको.
सखू : ह्या, गे, बाय, काय तुजा ? घोव तुजो इल्लंल्या परतेक चाकरमान्याच्या घरात पापलेटा सुटी करता.
अयसूना : घोव् करता, म्हनान् मी तसा करूचंय् नाय. मी मेलंय्, तरी कोनाच्या फुकट खावचंय् नाय. आनी बापया मानसाचा तर नायच नाय. मी खातंय् माज्या कष्टाचा. मी सोलाच्या पानया वांगडाक् भात गिळान्.

माका सव नुको.

[ अनसूया तरातरा निघून जाते.
सखू तिच्याकडे काही काळ आश्चर्याने बघत राहते. ]

सखू : काय, गे, बाय, एकाएकाची तऱ्हा. जेचा करूचा बरा, ता म्हंता, माजाच खरा.

[ ' माशे घितास, गे...' म्हणत सखू निघून जाते. ]

अं धा र

## प्रवेश तिसरा

[ लक्ष्मणच्या हॉटेलात सोनक्याचा बरण्या नीट करतोय्. इतक्यात दुरून येणारा पाऱ्या त्याला दिसतो. त्याची गंमत करण्यासाठी तो लपून बसतो. पाऱ्या हॉटेलजवळून जाऊ लागतो. ]

सोनक्याचा : ऊऽऽहूऽऽ!

[ पाऱ्या थांबतो. इकडे तिकडे पाहतो. पुन्हा जाऊ लागतो. सोनक्याचा पुन्हा तसंच करतो. पाऱ्या पुन्हा थांबतो. त्याला सोनक्याचा दिसत नाही. शेवटी सोनक्याचा उभा राहतो. ]

सोनक्याचा : काय, पाऱ्या....सकाळी सकाळी खंय ?
पाऱ्या : (रागाने) तुज्या बापाशीच्या लग्नाक्.
सोनक्याचा : मग लेट कसो झालंस ? आता तुका समशानात जावचा लागात.
पाऱ्या : माका सकाळी सकाळीच, साल्या, समशानात धाडतंस ?

सोनक्याचा : आता माज्या बापाशीच्या लग्नाक् जातंस, तर तुजी वाट तीच! समशान त्या बाजूक् रवला. हडे भलतीकडेच खंय चल्लंस?....असा माका इचारूचा होता. तुया, मेल्या, चिडलंस.

पाट्या : सोनक्याच्या, तुका सांगान ठेवतंय्, माजी भगल करीत जाव नुको. मी वायट मानूस हय.

सोनक्याचा : होय. पन चिडलंस, तर.

पाट्या : आता चिडलंय्.

सोनक्याचा : वाटना नाय, वॉ.

पाट्या : कानपाटात दिल्यार वाटात?

सोनक्याचा : मग माजे हात काय नाचन्याची आंबील खावूक् गेले हत?

पाट्या : कळात. बोंबी फिरवून् मारीन, तेवा!

सोनक्याचा : आवशीक् इचारून ये.

पाट्या : इलंय्. (जवळ जातो.) आता बोल!

सोनक्याचा : हात लावून् बग!....

पाट्या : खंय?

सोनक्याचा : खंय म्हंजे? माज्या आंगाक् नुसतो हात लाव. उचलून टाकतंय्, की नाय, तो बग....आमच्या नवर्‍यान् कांबळ्याच्या बैलाक् उचलून टाकल्यान्, तसो!

पाट्या : लक्षाच्या हटलातला चोरून खावून माजलंसंच तसो!

सोनक्याचा : माका बैल म्हंतंस?

पाट्या : अरे, बैलच काय, रेडो, पाडो, वसू....सगळा म्हनान्! माका बगूचा आसा, तू माजा काय करतंस, ता! माका पन बरेच दिवस झूज घेवूक् गावला नाय हा. खुमखुमी जिरवून घेतंय्, की नाय, ती बग तुज्या वांगडा!

सोनक्याचा : असा?

पाट्या : होय, असाच!

सोनक्याचा : मग हात लावूनच बग!

पाट्या : ह्यो बग हात लावलंय्.

[ पाट्या त्याला हात लावतो. ]



म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.

सोनक्याचा : अरे, नुसतो हात कोनव् लावता ? ढकलून बग...
पाट्या : ह्यो बग ढकललंय्.

[पाट्या त्याला ढकलतो.]

सोनक्याचा : हळू कोनव् ढकलता ? जोरात ढकलून बग....
पाट्या : ह्यो बग.

[जोरात ढकलतो. सोनक्याचा लटपटतो.]

सोनक्याचा : पडलंय् तरी ! सालो, यडझंयो !....कळ पन काड्रूक् येना नाय. कळ कशी काड्रूक् होयी....
पाट्या : (सोनक्याच्याच्या कानफाटीत मारून) अशी !
सोनक्याचा : (जमिनीवर पडतो. तिथूनच तो बोलू लागतो.) आता पुना मारून बग.

[पाट्या पुन्हा एक पेटवतो.]

सोनक्याचा : आता मारून बग. (तो रडकुंडीला आलेला आहे.) उचलून टाकून देतंय्, की नाय, तो....
पाट्या : अरे, साल्या, कदी उचलून टाकतंलंस ? तवसर पडलंस खाली.
सोनक्याचा : खाली पडलंय्, म्हनान् हुशारी करतंस ! (रडवेला आवाज) उबो आसतंय्, तर दाखवला आसतंय्.
पाट्या : थांब, उबो करतंय् !

[सोनक्याचा रडतो आहे. पाट्या त्याला जबरदस्तीने उभा करतो आहे. इतक्यात डिच्या तिथे येतो.]

डिच्या : अरे...थांबा....थांबा....मेल्यांनू, मळ्यात बैल झुजतंत, तसे झुजतास काय ? काय झाला, रे, पाट्या ?
पाट्या : हेका इचार...

[पाट्या रागारागाने निघून जातो.]

डिच्या : हेका इचार !....काय झाला, रे !

सोनक्याचा : गेलो ? ( अंग झाडीत उठतो. )
डिच्या : कोन ?
सोनक्याचा : पाटो.
डिच्या : तुज्या समूरसूनच गेलो, नाय तो ?
सोनक्याचा : म्हनान् सुटलो. नाय तर लोळवना होतंय.
डिच्या : तेका ?
सोनक्याचा : मग ?
डिच्या : आदी तू लोळलंस, तो झाडून टाक. आनी बस. तुजी हजामत करू या.

[ पिंपळाच्या पारावर बसून डिच्या सोनक्याच्या झिलाची दाढी करू लागतो.
त्याची एका बाजूची दाढी झाल्यावर दादा भट हातात तीर्थाचा तांब्या, धोतर नेसलेला, कपाळाला गंध, अंगात काही नाही. डोक्यावर टोपी....तोंडाने भजनातली गौळण म्हणत चाललेला आहे. ]

दादा : ठुमकत मुरडत गौळणी....आल्या पाहा या मथुरे सहा जणी....
डिच्या : काय, दादा ?...भटजीच्या तोंडात गौळण ?
दादा : मग ? भटजीच्या तोंडांत काय असतें ?
डिच्या : ता....आपला....ह्या....
दादा : ह्यां म्हणजे काय, तें स्पष्ट बोल. नाहींतर समोरच्याची हजामत तरी कर !
डिच्या : ही कसली हजामत ? असले दाडये मी चलताना उडवतंय्. जा, रे, झाली तुजी हजामत....तुमी बोला.
सोनक्याचा : झाली खंय ? पैशे घेवून् असा अर्धवट काम करतंस ? ह्या बाजूची कोन करतंलो ?
डिच्या : चार आन्यांत एका बाजूचीच दाडी करतंय् मी !
सोनक्याचा : पयला नाय कित्या सांगलंस ?
डिच्या : सांगाक् काय होया ? डिच्याचो रेट फिक्स आसा. अख्ख्या गावाक् म्हायत आसा. तू नयीन इलंस ? बोला तुमी, दादा. हेच्या वांगडाक्

काय लागलास ? जसे पैशे, तसा काम. जा, रे.

सोनक्याचा : पन साब्रन दोनंय् बाजूक् लावलंस.

डिच्या : साबन लावचे पैशे घेनंय् नाय मी. पैशे घेतंय् दाडी करूचे...बोला तुमी.

दादा : मी नाहीं. तूं सांगणार आहेस, भटजीच्या तोंडांत काय असतें, तें !

डिच्या : हां....भटजीच्या तोंडात....

सोनक्याचा : ह्या बाजूची खरडाव्न् टाक वेगीन !

डिच्या : वगी रव, बगू. भटजीच्या तोंडात....

सोनक्याचा : ह्या बाजूची दाढी....

डिच्या : वगी रव, म्हनान् सांगलंय्, तरी मदी मदी बोल्ता. आता वगी....

सोनक्याचा : वगी कसो रवान् ? माका आता बाजारात जाव्चा आसा.

डिच्या : मग जा. कोनी थांबवल्यान् हा तुका ?

सोनक्याचा : असोच जाव ? भेटात, तो इचारतंलो.... खंयच्या हजामानं दाडी बनवल्यान् ?

डिच्या : तेका सांग, डिच्यानं ! माका सगळो बाजार वळाकता. कोन हसाचो नाय तुका. तर, दादा भटांनू, भटजीच्या तोंडात संस्कृतातले शिल्लोक होये. मुरडत चाल्नारे गौळणी नुको.

दादा : पण गौळणींशीं तुझं वाकडं कां ?

डिच्या : माजा कित्या वाकडा आसतंला ? माजा सरळ आसा.

सीताराम : ( प्रवेश करून ) काय, रे, कोनाचं वाकडं हाय आनी कोनाचं सरळ हाय ?

डिच्या : यवा....यवा, चाकरमानयांनू ! आताच आठव काडलंव्. म्हतला, आजून कशे नाय इयाले ?

सीताराम : इयाले ? म्हनजे व्याले ? अरे, व्यायला मी काय गाय-म्हैस हाय ?

डिच्या : माका म्हनाचा होता, इले. मिया सुद्ध भाषेत ‘ इयाले ’ म्हतलंय्.

सीताराम : येडा हायस. येत नाय, तर बोलायचा नाय.

डिच्या : तुमच्या बांगडाक् बोलान् बोलान् शिकतंलंय्. पन ता जावनेत. दाडीबिडी करूची आसा मा ?

सीताराम : मी हातानं करतो.

डिच्या : तुमचा आपला बरा. तुमी सगला हातानं करतास. तेवडोच हाताक् यायम.

सीताराम : म्हणजे काय ?

डिच्या : भगल, हो.

सीताराम : तू माजी भगल करतोस ? कोनाची भगल करायची, कोनाची नाय, हे अजून समजत नाय तुला ? मला वळकतोस तू ? अरे, गावात सगळे मला चाकरमानी....चाकरमानी म्हनून मान देतात. माज्या पाटसून लोंबतात. आनी तू माज्याशी अशी वार्ता करतोस ?

डिच्या : चूक झाली.

सीताराम : चूक ? मिष्टेक करतोस आनी वर चूक झाली, म्हनून सांगतोस ?

दादा : काय म्हणतां, सीतारामसाहेब ?

सीताराम : हा बग. गावात न्हावून देखील किती सुधारला तो ! तुमी नाय सुधारनार. तुमी दाढ्याच करा जल्मभर. अरे, या गावाच्या भायेर जावून् बगा, जग किती सुधारलाय्, ते ! माणूस माणसाला कसा रीटेक देतो, ते !

दादा : रीटेक नाहीं, सीतारामसाहेब....रिस्पेक्ट !

सीताराम : तेच....तेच.... सांग याला. तेचा अर्थ काय हाय, ते सांग याला. सोनारानं टोचल्याशिवाय ह्यांना कळनार नाय.

डिच्या : माका समाजला.

सीताराम : इंग्लीस हाय, ते तुला काय डोंबलं समजणार ?

डिच्या : तुमचा इंग्लीस माका नाय समाजतला ? बसा तरी.

सीताराम : बसा काय ? मी एक्सॅट झालो हाय. आता तू म्हनतोस, म्हनून बसतो. ( सोनक्याच्याकडे पाहतो. सोनक्याचा टॉवेल आपल्या डोकीवरून घेतलेला आहे. ) अरे, हे काय ! हा बोकारा घेऊन कशाला बसला ? याचं घुडघुडं केलंस, की काय ? कदी झालं ? आमाला, बॉ, म्हायतच नाय. नायतर मी आलो असतो. आपन लग्नाला जात नाय. पन मरतीकाला अद्रूम जातो. ( डिच्याची आणि दादाची चुळबूळ.)

सोनक्याचा : आवस आजून माजी जिती असा. बापूस न्हानपनीच मेलो.

सीताराम : मग बाकी सोरी !

सोनक्याचा : (आश्चर्याने) सोरी कसली ? ठँकू म्हना. नाय तर कोन तरी इसात. मिया मालवनात आयकलंय्. भंडारी हायस्कूल सुटला, तेवा सगळे-जान एकमेकांका ठँकू... ठँकू म्हनत.

सीताराम : म्हायत हायस, रे, मोठा विंग्लीसचा पापड हायस, तो. आजून मुंबैचं तोंड बघितलंस नाय आनी विंग्लीस मला शिकवतोस ? डिच्या, हजामत करून टाक.

डिच्या : कोनाची ?

सीताराम : ह्या ठँकूवाल्याची !

डिच्या : चार आन्यांत यवडीच.

सीताराम : मग हे आनकीन पैशे घे. आनी पुरी करून टाक.

[डिच्याच्या हाती पाचची नोट देतो.]

डिच्या : इतके कित्या ?

सीताराम : खलेले तुला ठेव... टिप् !

डिच्या : टिप् ?

सीताराम : अरे, मुंबैत तशी पद्धत हाय. याला टिप् म्हनतात.

डिच्या : ठँकू !

[सीताराम चमकून पाहतो. डिच्या सोनक्याची दाढी करू लागतो.]

सीताराम : मग काय, दादा ? तू सद्या काय करतोस ?

डिच्या : हाली सगळा सोडून गवळणीच्या पाटी लागले हत.

सीताराम : काय म्हनतोस ?

डिच्या : आयच्यान् ! ध्यानी, मनी, सपनी गौळण.... एकच नाय... स स.

सीताराम : वेडा हायेस तू. त्याच्या हातात तांब्याचा तांब्या हाय.

डिच्या : हातात तांबयो. तोंडात गवळण.

सीताराम : गौळण ? हा....हा.... आता आला ध्यानात. भजनातली गौळण.

डिच्या : तुमका काय वाटला ? दूधवाली ?

सीताराम : तू काम कर आपलं. मग काय, दादा, भजनातली गौळण म्हणतोस ?

दादा : तसा मी गावांत भजनं करतों. कीर्तनं करतों. सत्यनारायणाची पूजा

सांगतों. होम-हवन करतों. श्राद्ध करतो. दिवस—कार्ये करतों.

डिच्या : पन सगळ्यांका मंत्र एकच. येगयेगळ्या सुरांत. कदी तोंडातल्या तोंडात. कदी मोठ्यानं. कार्यां सगळी. खंयच्या गोष्टीत अडाक् नुको. जोतिष देकूल बगतंत.

दादा : मोसमांत आंब्याचीं झाडं घेतों.

डिच्या : चाकरमानयांनू, तुमचे आंबे दाखवा. मोवरावर घेतले.

सीताराम : तू आता चूप रवशील का ? दोन शिकलेली मानसं बोलत असताना अडान्यानं मध्ये तोंड खुपसू नये. थोबाड लाल होते. मग, दादा.... तुमची गौळण.

डिच्या : ठुमकत मुरडत गौळणी. अहो, चाकरमान्यांनू, आमच्या दादांनी त्वांड उघडल्यानी, की भल्या भल्या गवयांची दातखिळी बसता. किती जनांच्या तोंडाक् आमी पानी लावलंव्.

सीताराम : अरे, कर्नाला बघितला नाय होता, तोवर अर्जुनाच्या निस्कारन वल्गना होत्या. पुरान ऱ्हायत हाय काय ? मी पन मुंबैत भजनं करतो. हजामती नाय करत. दिवसाला दोन दोन पोग्राम करतो. पन अभंग-कवालीवर आमचा जास्त भर असतो.

डिच्या : मग हंयच्च होवून् जावनेत !

सीताराम : अरे, तुमी लोक गावठी. तुमी कसली भजनं करनार ? मुंबैचा पब्लीक बघितला, तर तुमचे पंजे पिवळे होतील. तिथे डेरींग् पायजे. टॅंडरचं गानं पायजे. गाताना अंगावर चिळ्या पडतात. वगीच, मोर नाचतो, म्हनान् तुडतुड्यानं नाचू न्हये.

दादा : असं म्हणतां, सीतारामसाहेब ? बघूं या तरी तुमची तयारी आणि डेअरिंग.

सीताराम : मला चेलेंज करतोस ? अरे, लालबागेत किती बुवा लोक टाळ—पेट्या ठेवून पळाले.

दादा : डिच्या, संध्याकाळीं पेडणेकरांची पेटी घेऊन ये. चाकरमानी किती खोलांत आहेत, तें पाहतों. माफ करा, मला प्रतिस्पर्ध्यांची खोली मोजायची संवय आहे.

सीताराम : तेला मुंबैला जावं लागेल. आमची झिलग्यांची खोली हाय.

दादा : *झिलग्यांची नाहीं–तुमची!* मीही आजूबाजूंच्या बुवांना ठेवलेले नाहींत. पळाले आहेत. पण टाळ–पेट्या घेऊन. आपण दुसऱ्यांच्या सामानावर नजर ठेवीत नाहीं.

डिच्या : ते सवताचा सामायन सांभाळतंले.

दादा : तेंही जड होतें आजकाल.

सोनक्याचा : माजी दाडी एका बाजूची........

डिच्या : चूप. सांजे भजन आयूक्. दुसऱ्या बाजूची देकूल दाडी शाप होतंली. वस्तऱ्याशिवाय.

सीताराम : मग, दादा, आज संध्याकाळच्या येळेला आमच्या खळ्यात होवन् जावनेत.

दादा : होऊन जाऊं देत.

सीताराम : तुजी गावठी गौळण आनी माजी मुंबैफॅसन कव्वाली! चायची आनी काळ्या वाटान्याच्या उसळींची सोय मी करतो. ठरलं?

दादा : ठरलं!

[ दोघे दोन दिशांना निघून जातात. हळूहळू अंधार होतो. ]

प ड दा

# अंक दुसरा

## प्रवेश : पहिला

[ स्थळ : सीताराम पाटकराचं घर.
सीतारामची आई येनूमावशी खळ्यातल्या दांडीवर कपडे वाळत घालते आहे. गडग्यावर तिचं फाटकं पातळ वाळतं आहे. दांडीवर तिच्या मुलाची टेरेलिनची पँट वाळते आहे. डिच्योंची हाक ऐकू येते. ]

**डिच्या** : गे, येनूमावशे....
**येनू** : काय, रे....?
**डिच्या** : कशी हस ?
**येनू** : कसा दिसतंय् ?
**डिच्या** : बरी दिसतंस, बाय. चाकरमानी खंय् ?
**येनू** : पाटल्या दारा न्हाता हा.
**डिच्या** : आनी दुसरो चिरंजीव....?
**येनू** : पागूकं घेलो हा.

[ वाळत असलेल्या कपड्याकडे डिच्या बघत राहतो. ]

**डिच्या** : ह्यां, गे, काय ? ( डिच्याचं बोलणं येनू मावशीच्या लक्षात येतं. )
**येनू** : तुजी नजार हाली कमी झाली, की काय ? मेल्या, माका दिसला नाय, तर लॉक म्हंतील, हिची साटी उलाटली. तुका ह्याच वयात दिसाचा बन झाला....?
**डिच्या** : गे, दिसला, म्हनान् इचारलंय्, कोनची धुनी सुकतंत ही ?

येनू : (मुलाच्या कपड्याकडे पाहून) ह्यो तुज्या बापाशीचा! (आपल्या पातळाकडे बघत) आनी ह्या तुज्या आवशीचा.

डिच्या : गे, चिडतंस कित्या? दोघांत फरक दिसलो, म्हंजे कोनव् इचारता. तुज्या पातळातसून अख्लो गडगो दिसता हा. आनी तुज्या झिलाच्या कपड्यावर मुंबै झळाकता हा. आता झिलाक् सांग, मालवनातसून नयीन पातळां हाड, म्हनाचा. असली बोंद्रां आता न्हेसा नुको. लॉक हसतील.

येनू : माका कोन हसाचो नाय. मी गावात नयीन नाय. मी काय हंतरतंय्, काय पांघरतंय् आनी काय न्हेसतंय्, ता सगळ्या गावाक् म्हायत आसा. अरे, मी हमतामी आसंय्. बसान् खानंय् नाय.

डिच्या : गे, आता तुजा वय बसान् खाव्चा आसा.

येनू : बसतंय्. तू वाल्शील माका?

डिच्या : मी कित्या? तुजो एक झील चाकरमानी, दुसरो....

येनू : माका असला टुमाकना मारू नुको हां. झील आसात चाकरमानी, तो तुमच्यासाठी. माज्यासाठी तो पूर्वीचो शिताराम!

[येनूमावशी एक पिळा पिळू लागते. इतक्यात ज्ञानदेव धावत येतो.]

ज्ञानदेव : पैक...पैक...मिया धरतंय् एका बाजूक्. (धावत जाऊन पिळयाचं एक टोक दोन्ही हातांनी धरतो.) हं. आता पिळवट.

सीताराम : (प्रवेश करतो.) अरे, तुमी लोक कदी आलात? (सीताराम टॉवेलनं आपले केस पुसत असतो.)

ज्ञानदेव : हेका (डिच्याला) बरोच येळ झालो आसात. मिया आताच इलंय्. म्हतला, येनूमावशी एकटीच काम करता हा, आपन मदत करूची. म्हातारी हा ना?

येनू : काय, रे, मेल्या, घेनग्या? इतके दिवस मी म्हातारा नाय होतंय्? झील माजो मुंबैसून इल्याबरोबर मी येकदम म्हातारा झालंय्? शितारामा, अरे, नळे परतूक् हेंका बोलवलंय्, तर एकाच्या पोटात नळ भरलो. दुसऱ्याची ढेंगा कापाक् लागली. (आखाड्यातून आत

येणारा हरी तिथेच थांबतो... ) तिसरो म्हनाक् लागलो, तुमच्या घराचे काटये कोरम झाले हत. ( ज्ञानदेवाला उद्देशून ) खाली कोसळाक् होयत. कोन ह्या बाजूक् फिराकलो नाय. माज्या येकट्या बाबल्यान् अख्ख्या घर परतल्यान्. अरे, वसदाक् होये, तर गावनत नाय हे. आता उगावले. हे खुटावरचे कावळे हत. गुळाक् डसनारे मुंगळे हत.

सीताराम : आये, घरी आलेल्या मानसांचा इन्साट करू नये.

येनू : इन्साट ? हेका इन्साट आसा ?

सीताराम : आता गप रव. आत जा. डिच्या, अरे, तुमी लोक तिच्या बोलन्या-कडे लक्ष देऊ नका.

डिच्या : छे, हो! लक्ष कोन देता ? म्हाताऱ्या मानसांका सवय असता पिरपिर करूची.

सीताराम : आये, फनी कुठे ठेवलीस ?

डिच्या : माजी देव ?

सीताराम : नुको, आमची हाय.

येनू : माजी उवाची फनी भुतूरच्या दारूस्तेर आसा.

सीताराम : तुज्या उवांच्या फनीनं मी केस इन्चरू ? मला उवा नाय होनार ?

येनू : मग तुजी मुंबैसून हाडलेली फनी फडताळात आसा.

सीताराम : तू कुठं ठेवशील, पत्त्या लागनार नाय.

येनू : अरे, मग फनी काय मी कनवटीक् लाव ?

हरी : मिया हाडतंय्.

सीताराम : नको, तू बस. आई, भावबंद आलेत. चाय बनव.

येनू : आता गुळाची ढेप हाडून ठेव. ( येनूमावशी आत निघून जाते. )

सीताराम : अगे, आये, आरसा कुठं हाय ?

डिच्या : माजो देव ?

सीताराम : नुको, बाबा... मी हानलाय् मुंबैसून.

[ येनूमावशी बाहेर येऊन मुलाला आरसा देते. सीताराम केस विंचरू लागतो. ]

ज्ञानदेव : च्याकरमान्यांनू, मी धरतंय् हारसो.

डिच्या : तू खेका ? मी धरतंयू. माका सवय आसा.

हरी : तू हारसो धरतंलंस, की वस्तारो च्यालवतंलंस. दी हडे. (हरी आरसा दाखवू लागतो.)

सीताराम : अरे, नुको.

हरी : नुको कित्या ? धरतंय्. (तो सीतारामच्या हातातला आरसा घेतो. सीताराम समोर धरतो.)

सीताराम : आये, पावडर कुठं टेवलीस ?

डिच्या : माज्याकडची देतंयू. (डिच्या आपल्या धोकटीतला पावडरचा डबा सीतारामच्या पुढे धरतो.)

सीताराम : नको, डिच्या... ही खोगनातली राख मी तोंडाला लावनार ? अरे, आमचा डबा हाय आनलेला.

हरी : डबो ! (धावत जाऊन खिडकीवर ठेवलेला टूथ–पावडरचा डबा आणतो. तो सीतारामसमोर धरतो.)

सीताराम : हरी, ही दाताला लावायची पावडर हाय. जा, ठेव.

ज्ञानदेव : हरग्या, वाय्च ह्यो हारसो धर. मी बगतंय्. जेनूं काम तेनूं. (हरीच्या हाती आरसा देऊन ज्ञानदेव घरात धाव मारतो. पावडरचा डबा घेऊन येतो. सीतारामासमोर धरतो.) हीच ना ?

सीताराम : हो...हो हीच. तुला कशी गावली ? तुला विंग्लीस वाचता येतं ?

ज्ञानदेव : नाय, येनूमावशेन् दिल्यान्.

सीताराम : आये आमची येकदा दगल्यान्, की बरोबर लक्षात ठेवते.

ज्ञानदेव : च्याकरमानयांनू, ही तोंडाक् लावतंत ना ?

सीताराम : त्याच्यावर तसं लिवलेलं नाही. कुठं पन लावतात. लावनाऱ्याची मर्जी. काहीजन तोंडाला लावतात. काही खाकेत मारतात. काही छाती– पोटावर मारतात.

डिच्या : म्हंजे आंगभर खंयत्रू ?

सीताराम : हुशार हायस. तुला शॉटमध्ये कळते.

डिच्या : वास बाकी मस्त येता. जानारा बायलमानूस फिरान् बगतंला.

सीताराम : अरे, बापये देकूल फिरतात मारक्या बैलासारखे. आनी हुंगत

बसतात तुज्यासारखे.

डिच्या : हुंगतील, बाबांनू. वासच तसो!

सीताराम : मुंबैला गेलो, की तुला धाडून दैन–पावडरचा डबा आनी वासाचा साबन.

डिच्या : इसरा नुको हां. नायतर सगळे चाकरमानी मुंबैक् जाताना सांगतंले, तुका अमक्या धाडीन. तुका तमक्या धाडीन. मुंबैत पाय पडलो, की सगळा इसारले. तर सुवासिक पावडरचो डबो....

ज्ञानदेव : हंय मिळना नाय..

सीताराम : अरे, हंय सगळा मिळते. पन मुंबैच्या पावडरचा, साबनाचा वास येगळा. हितल्या पावडरचा, सावनाचा वास येगळा. बगीच कोनी म्हतली हाय ती मुंबै? तुमी आजून बगीतली नाय ना मुंबै? तुमाला कल्पना येनार नाय. फुडच्या येळेला तुमाला मुंबैला घेवुन् जाईन.

[ इतक्यात सीतारामचा धाकटा भाऊ पाट्या येतो. डिच्याला धक्की मारून घराच्या पडवीच्या रोखाने जाऊ लागतो. ]

डिच्या : हेका जाताना मुंबैक् घेवुन् जावा. म्हंजे तो भोटमामा तरी सुदरात.

पाट्या : अरे, होय, रे! म्हायत आसंस, मोटो सुदरान् न्हाल पडलंस, तो. तुका काय मी वळाकनंय् नाय?

डिच्या : वळाकतंस, ता बरा. खंयत्र् भेटलंस, तर हाक तरी मारशील....

पाट्या : रे, डिच्या न्हावया, हजामत यवस्तीत कर!

डिच्या : पाट्या!

सीताराम : बाबल्या, हंयसून जा बगू. टारगट! मोठा भावस इथे उभा हाय, त्याचं काय नाय! चल, जा! (पाट्या आत निघून जातो.) डिच्या तेचं काय मनात धरू नको. तो विडीयट हाय. आपन पोरांकडे आनी म्हाताऱ्या मानसांकडे लक्ष देऊ नये.

हरी : खरा असा. डिच्याचो लक्ष पोरांकडे नसता आनी म्हाताऱ्यांकडेव् नसता. तेचो लक्ष दोघांच्या मदी.

डिच्या : हरग्या, त्वोंड समाळून बोल. नायतर दात तोडीन!

हरी : माजे? अरे, फूक मारलंय्, तर पास्टाक् चिकाटशील.

डिच्या : (रागाने) मार फूक, रे!.... मार....! बगतंयू मी. हाली वायूच ठकलंयू, म्हनान्, हुशारी करू नुको. असल्याच जिवान् मारीन.

हरी : अस्सा?....मार बगू.... (हरी मारामारी करण्याच्या उद्देशाने उठतो.)

सीताराम : हरी, इस्टाप! जंयच्या थंय थांब. तुमाला काय माजं घर म्हंजे मळा वाटला? मेनरलेस्! सायलेंटमध्ये बसून घ्या. चांगल्या ठिकाणी कसं वागावं, हेचं ज्ञान नाय तुमाला? सायलेंट!

[सर्वजण गप्प होतात. आपापल्या जागी बसतात. येनूमावशी चहाचे कप घेऊन येते. सर्वांना निमूटपणे बसलेले पाहून हसते.]

येनू : वा! वा!! भराडेच्या देवळातल्या सभेसारखी मंडळी बसली हा!

ज्ञानदेव : थांब.... थांब, येनूमावशे. कप पडतील.

[ज्ञानदेव आणि डिच्या येनूमावशीच्या रोखाने वाईने पुढे येतात.]

येनू : काय माजी देकूल शेवा चल्ली हा. अरे, मेल्यांनू, इतके दिवस होतास खंयू? ढापो झाल्लंलास, की काय?

हरी : कामा आसतंत ना.

येनू : म्हंजे? माजो झील मुंबैसून इल्याबरोबर तुमची दुसरीकडची कामा सरली? मेल्यांनू, ह्या माज्या शितारामाक् सांगा. माका नुको. मिया तुमच्यांतलाच. मिया तुमका बरोबर वळाकतंयू. तुमी कोनाच्या कातरल्या आंगठेर मुताचास नाय. पैशे बगलास, की धावलास!

सीताराम : आये, किती येळ सांगितला तुला? घरी आलेल्या मानसांचा इन्साट करू नको, म्हनून. तरी तू इन्साटावर इन्साट करते हायस. अगे, चुका कुनाच्या होयत नायत? देवाचा देव चुकतो.

येनू : अरे, देव चुकलो, तर तो सुधरात. हे सुधारनारे नाय. तुका कळात, माज्या वासरा. तू हेका वळाकनंस नाय. (आत जाते.)

डिच्या : चाकरमानयांनू, मिया चलतंयू.

सीताराम : कशाला?

डिच्या : तुमच्या आवशीनं आमची बिनपानयान् केल्यान्.

सीताराम : अरे, तुमा लोकांना सांगितला ना मी? तिच्याकडे लक्ष देऊ नका.

डिच्या : अहो, ती भायेर इली, की लक्ष जाता.

हरी : गेलो नाय, तर वडून घेता.

[ येनूमावशी बाहेर येते. कप घेते. ]

येनू : काय, रे ? काय वडून घेतलंय् मी तुमचा ?

सीताराम : आये, तुला सांगितला ना मी ? तू आमच्यांत बोलू नको. येऊ नको.

येनू : अरे, तुमच्यांत खंय बोलतंय् ? आता येन्याचा म्हनशील, तर घरात मी भायेर भुतूर नाचतंलंय्. ताजू वन करतंस, की काय, हेंच्यासाठी ? शितारामा, तुका सांगान् ठेवतंय्. हे दोन दिवसांचे. मी कायमचा ! पोटचो जाळ आसंस तू माज्या. माका दिलंस घेतलंस नाय, म्हनान मी फिरायचंय् नाय तुज्यार.

हरी : चाकरमानयांनू, मिया पन चलतंय्.

सीताराम : थांब, रे....जाशील.

येनू : नाय....तुमी बसा. कप दिवा... (ती उचलते. थांबते.) गो, अनुसये !

अनसूया : (दरवाजा उघडून बाहेर येत) काय, गे, येनूमावशे ?

येनू : गो, घोवू नाय तो तुजो या सभेक् ?

अनसूया : निजले हत.

येनू : आजून ? गो, रातची आता जागराना बन करा, मेल्यांनू. घोवाक् उटव आनी सभेक् धाडून दी. आनी तू ये, गो. पाटल्या दारा बसान् गजाली मारू या.

[ अनसूया दरवाजा बंद करून सीतारामच्या समोरून मागीलदारी जाते. सीताराम तिच्याकडे पाहत राहतो. ]

ज्ञानदेव : बरां, चाकरमानयांनू, मिया पन चलतंय्.

सीताराम : आता सगळेच निघा. नंतर भेटू या लक्षाच्या हाटेलात.

[ सीतारामचं लक्ष अनसूया गेलेल्या दिशेकडे आहे. हरी सीतारामचं निरीक्षण करतो. ]

ज्ञानदेव : चल, हरग्या, बगीत काय रवलंस ?

हरी : जमलासा वाटता.

ज्ञानदेव : जमानाय्. तुका आनी माका काय करूचा आसा ?
हरी : या गडबडीत माजा काम झाला नाय.
ज्ञानदेव : म्हंजे ? तू कामासाठी इल्लंलंस ?
हरी : मगे ?
ज्ञानदेव : माका वाटला, मीच इलंय्. सांग चाकरमानयांका !
हरी : चाकरमानयांनू, आमी कामासाठी इल्लंलंव्.
सीताराम : आता मला जरा काम हाय. तुमचं काम नंतर करू.
हरी : चल, डिच्या...
सीताराम : तेला न्हाव दे. तेच्याकडे माजं काम हाय.

[ हरी आणि ज्ञानदेव निघून जातात. सीताराम डिच्याजवळ येतो. तो त्याच्या कानात काही तरी पुटपुटतो.
हळूहळू अंधार होऊ लागतो. ]

## प्रवेश दुसरा

[ स्थळ : भिक्या वस्ताचं घर.
सखू गाबतीण 'माशे घितास, गे ?' अशी आरोळी मारीत सीतारामच्या घराच्या पांदणीतून येते. ]

सखू : गे, येनूमावशे.
येनू : ( बाहेर येत ) काय, गो, सखू ?
सखू : माशे घेतंस ?
येनू : नुको, बाय, माका तुजे म्हाग माशे ! माजो झील माल्वनाक् गेलो हा. येताना माशे हाडतंलो.
सखू : तुमका माल्वनातले बर्फातले माशे चलतंत. हयले ताजे नुको !

येनू : होय, गो, बापाऱ्या. लय बोललंस. ( आत जाते. )

सखू : ह्या म्हानारेच्या तोंडात बगूचे तेवा गाळी.

[ सखू भिक्याच्या घराजवळ जाते. अनसूयेला हाक मारते. तिच्या ओट्यावर दारात बसते. दादा भट तीर्थाचा तांब्या हातात घेऊन भिक्याच्या घराच्या रोखाने येतो. पाहतो, तर दरवाज्यात सखू बसलेली आहे. ]

दादा : शिंचे, दूर हो...दूर हो !

सखू : मिया काय केलंय् तुका ?

दादा : तूं काय करणार मला ? दूर हो आधीं. मला शिवशील !

सखू : शिवशील ? इतको सोवळो कदीपासून झालंस ?

दादा : ए....तोंड सांभाळून बोल. सोवळा म्हणजे ? जातीचा भट आहें मी. मला विचारतेस ? मी सोवळाच असणार. हें जानवं पाहिलंस ? हा तीर्थाचा तांब्या पाहिलास ? हें कपाळावरचं गंध पाहिलंस ? हें....

सखू : पुरे पुरे....आनखीन काय पन दाखव नुको. मी सगळां बगलंय्.

दादा : काय पाहिलंय्स, ग ?

सखू : तुजा वागना,....तुज्या बापाशीचा वागना.

दादा : सकल्या, बाप काढूं नकोस माझा ! थोबाड रंगवीन !

सखू : तुया माजा थोबाड रंगवतंलंस ? तुका हिंमत आसा ?

[ सखू दादाच्या अंगावर जाते. ]

दादा : दूर हो....दूर हो. मला भ्रष्ट करूं नकोस !

सखू : भ्रष्ट ? दादाभटा, तुज्या बापाशीन् माज्या आवशीक् घाट्येर धरल्यान्, तेवा तुजो बापूस भ्रष्ट झालो नाय ?

दादा : अग, नुसता हात धरला होता. तोही तुझ्या आईनं रागानं माझ्या तीर्थरूपांच्या तांब्याला हात घातला, म्हणून ! अशी वदंता आहे. झालं गेलं, गंगेला मिळालं !

सखू : गंगेला नाय. आमच्या न्हयीत मिळना होता सगळा. अख्खो गावीत–वाडो फलटे घेवून् इलेलो. व्होवरेत तुजो बापूस दडान्

खलो. म्हनान् सुटलो. असो तुजो बापूस आनी तेचो तू झील ! आता तुका माजी आपड होता ? सुद्ध भाषेत माका बाजूक् रवाक् सांगतंस ? मी हंय् उब्यँ रवतंलय्....तुया होयी, तर बाजू बदलून जा.

दादा : बरं...बरं....पाहून घेईन. मी दादा भट आहें.

सखू : अस्सा ? आताच काय ता बगून घे. डोळे धड आसत ना तुजे ? नाक कित्या धरतंस ? माज्या आंगाक् माशाची घान येता ? माज्या आयेपावट तुज्या बापाशीक् सर्दी झाल्ली काय, रे ?

दादा : त्या वेळीं मी नव्हतों. नाहीं तर विचारलं असतं. तुला एकदां सांगितलं ना, झालं गेलं, गंगेला मिळालं. पुन्हां पुन्हां तोच विषय कशाला ? माझे वडील दिवंगत झाले. तुजी आई मेली. त्यांच्याबरोबर तो विषय संपला. आतां तीं प्रेतं कशाला उकरून काढतेस ? त्यांत कांहीं सुख आहे कां ?

सखू : म्हंजे तू आता सुखाच्या पाटीमागे धावतंस ?

दादा : मी कुणाच्याही मागून धांवेन. तुझ्यामागून धांवत नाहीं ना ?

सखू : धावशील काय ? माजा वशेद सगळ्या गावाक् म्हायत आसा. माजी आये सादी होती, म्हनान् मी सादा नाय.

दादा : अग, तुला साधी कोण म्हणेल ? तूं पक्की आहेस.... पक्की ! पण हा दादाभट देखील कच्चा नाहीं.

सखू : पक्को आसलंस, तर आडी घालीन मी तुजी !

दादा : माझी आढी घालणार ? मला काय तूं आंबा समजतेस ?

सखू : अस्सा ? (सखू फाटीत हात घालते.)

दादा : दूर हो...दूर हो. पाटींत हात घालूं नकोस. अंगावर वाण पाणी उडेल. तांब्यांत उडेल. सगळा वाडा भ्रष्ट होईल. अनसूये....गे, अनसूये !

अनसूया : (आतून) कोन ?

दादा : मी दादा भट. पटकन् बाहेर ये. मी संकटांत आहें.

अनसूया : (आतून) इलंय्....इलंय् .... (बाहेर येते) ह्यां, गे, बाय, काय ! दादा भट आनी सखू गावतीन येकठंय् ? गो, मेल्या, बाजूक् रव. कसो झालो, तरी भट आसा तो. आज काय, हो ?

दादा : अगे, त्या जयराम वस्ताच्या बायकोला मुलगा झाला. (अनसूया मुलाच्या कल्पनेनं क्षणभर हरवून जाते.) त्याच्या सुयेराचं पाणी घ्यायला आलों.

अनसूया : अहो, पन आज घा दीस ना ?

दादा : हो. पण उद्या मी बिझी आहें.

अनसूया : म्हंजे ?

दादा : अगे, कामं आहेत– सकाळपासून संध्याकाळपर्यंत. म्हणून म्हटलं, आजच उरकून घ्यावं.

अनसूया : असा ... असा ... दिवा. गो, बाजूक् हो. वाटेर काय ?

सखू : मिया काय तेका धरून रवलंय् ?

दादा : मला काय धरणार तूं ? मोठमोठ्यांचे टाके ढिले होतात. तिथं तुझी काय कथा !

सखू : तुया पेल्वानच तसो !

दादा : पेहेलवान नाहीं. पण अंगांत आलं माझ्या, की दहा दहा ... पंधरा पंधरा माणसांना ऐकत नाहीं मी. हनुमंताचं कडक वारं माझ्या अंगांत येतं ...

सखू : तेवाच बायल मानसांका बगून घेनंस नाय.

दादा : तुला सोडून सगळ्यांना मी बघून घेतों. ही अनसूया ... हिला कधीं दूर केलंय् का, सांगावं हिनं !

अनसूया : नाय ... नाय ... दादा भट तसो नाय.

दादा : तसा नाहींच मी.

अनसूया : सगळ्या मानसांबरोबर अगदी प्रेमान् रवतंले.

दादा : सांग हिला. मी पुरुषांशीं जसा प्रेमानं वागतों ... तसा बायकांशींही.

सखू : पुरे ... पुरे ... फुडचा बोलाच नुको. बापाशीन् अगदी टकलेर हात ठेवल्यान् हा तुज्या.

दादा : अनसूये ... पाणी घे, बघूं. या भ्रष्टाकारांत मला क्षणभर देखील उभं राहण्याची इच्छा नाही.

[ लगबगीने अनसूयेच्या हातावर पाणी ओततो. जाताना सखूच्या पाटीत वाकून पाहतो. ]

अनसूया : काय बगतास ?

दादा : ह्या माशांचे डोळे आणि हिचे डोळे एकच आहेत! (निघून जातो.)

सखू : ह्यो मेलो दादा भट सगळ्या गुनांनी भरलेलो आसा! अख्खो कासव खाल्ल्यान् हा. आमच्या गावचो भट, बग. अगे, निर्मळ. तो रस्त्यावरसून जावक् लागलो, तर आमी फुडे जावचंव् नाय. हसतंलो आनी फुडे जातंलो. नायतर ह्यो...

अनसूया : जावनेत, गो...पन तू माज्या घराकडे कसा ? माझी परिस्तिती नाय, बाय, माशे घेवूची.

सखू : गे, तुका बगूक् इलंय् . खरा सांगा ?

अनसूया : काय, गो ?

सखू : तुज्याकडे बगलंय् , की माका बरा वाटता.

अनसूया : कित्या, गो ?

सखू : गे, तुजो घोव...पैशाची कमाय नाय तेची. अख्खो संसार तू चालवतंस. पन कदी तुजा त्वांड वायट नाय. सदा हसतमुख !

अनसूया : सखू , अगो, दुख काळजात,....तोंडार कित्या ? आता हेंका काय मी थोडा सांगतंय् ? पन आयकंनंत नाय. काय करनार ? माका काय हौस आसा वनावना करूची ? माका लय वाटता,... तेनी कामधंदो करूचो. मी घर समाळूचा. पोरांका....पन तेका नशीब लागता.

सखू : तुका मी सांगतंय् बग, अनुसये, तुका झील होतंलो !

अनसूया : तुज्या तोंडात साकार पडानेत.

सखू : गे, मायार तुजा इतक्या सदन, पन घोवासाठी आनी आपल्या आवशी–बापाशीच्या नावासाठी तू आपल्या घराक् झरतंहस. आपल्या अब्रूक् जपतंहस. त्या देवाक् डोळे आसत. तो अख्खो दगडाचो आसलो, तरी तेचे डोळे आनी काळीज दगडाचा नाय. तुजा सगळा चांगला होतंला !

अनसूया : तुजे बोल त्या देवान् खरे करूचे.

सखू : खरेच करतंलो. घरातसून भायर पडलंय्, की तुया माज्या डोळ्यां-

समूर येतंस. माजा लगीन कदीव् होवनेत. पन माजो पाय घसराचो नाय हां.

अनसूया : माज्या बाय, असाच निर्मळ रव.

सखू : चलतंय्...

अनसूया : ये. ( अनसूया घरात निघून जाते. डिच्याची हाक ऐकू येते. )

डिच्या : रे, भिक्या....भिक्या....! कोन, गो, सखू ? काय हाडलंस ?

सखू : तुमका जमाचा नाय. हात लावा.

डिच्या : खंय ?

सखू : फाटयेक् ! ( डिच्या सखूला पाटी उचलायला मदत करतो. )

डिच्या : काय, गो, माका जमाचा नाय, म्हंजे मी तुज्याकडचे मासे कदी खानंय नाय ?

सखू : खातास. पन पैशे ?

डिच्या : गो, माजी गावात उधारी आसा. वसूल झाली, की एकदम देतंलंय् !

सखू : तवसर कावळे पोरां काडतील. ( सखू तरातरा निघून जाते. )

डिच्या : कावळे पोरां काडतील !...पोरां. ( हाक मारतो. ) अनुसये, गे अनुसये...

अनसूया : ( बाहेर येत ) कोन ? डिचवलकार !

डिच्या : होय. तुका भेटाक् इलंय् .

अनसूया : माका ? घर नाय ना इसारलास ?

डिच्या : म्हंजे ?

अनसूया : अहो, माका दाडी नाय. दाडी–मिशयेवाले भायर गेले हत.

डिच्या : म्हनान्च इलंय् .

अनसूया : ( चमकून ) काय म्हंतास ? पुन्ना बोला.

डिच्या : तुज्याकडे अगदी नाजूक काम होता.

अनसूया : ( धारदार शब्दांत ) डिचवलकारांनू , माज्या लग्नाक् आता पाच वर्सां होयत इली. आजून पावत गावातल्या खंयच्या पन बापयाचा माज्याकडे नाजूक काम निघाला नाय. निघाली, ती घसघशीत शिंग्राला धोंड्यांची कामा. आनी तुमचा एकाएकी कसा उपाटला नाजूक काम ?

डिच्या : ह्या बग, अनुसये, काम तुज्या फायद्याचा आसा.

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.

अनसूया : माका फायदो नुको. असो फायदो करून घेतला आसतंय् , तर माजा घर भरान् दार वतला आसता. मी म्हेनत करून पॉट भरतंय्. माजा आनी माज्या घोवाचा देकूल. माका कोनाच्या उपकाराची गरज नाय. तुमी आपल्या कामाक् जावा. लोकांचे दाडये खले आसतील.

डिच्या : ता रोजचाच आसा. पन तुजा....

अनसूया : तुमी हंयसून चला. माजो घोव घरात नाय आसा.

डिच्या : गे, घोव कित्या होयो ?

अनसूया : ( रागाने ) काय म्हतलास ?

डिच्या : आयकान् वे. माका सांगाचा होता, तुज्या लग्नाक् इतकी वर्सां झाली. आजून तुज्या घरात पाळना नाय.

अनसूया : डिचवलकारांनू , हाली हजामती सोडून पाळनी बनवूक् लागलास ?

डिच्या : गे, तसा न्हय– तुज्या पदराक् पॉर....

अनसूया : ता माज्या नशिबात नाय, असाच समाजतंय् मी.

डिच्या : गे, नशिबात सगला आसता, आपन खटपट करूक् होयी. असेल हरी, तर देईल खाटल्यावरी, असा नाय. आपुन हातपाय हालवूक् होये.

अनसूया : अहो, सगळे खटपटी झाले.

डिच्या : आनखीन वायच लटपटी कर...पन तुज्या खळ्यात....

अनसूया : हयसून जातास, की नाय आदी ?

डिच्या : गे, तुका काय वाटला, डिचा लाळघोटेपना करूक् इलो हा ? आमी मानूस बगूनच आमचो वस्तारो चालवतंव्. मानूस बगूनच साबन लावतंव्. असो, वायलमानसांच्या तोंडाक् साबन लावला आसतंव् , तर आमच्या वस्तऱ्याचो दरारो खला असतो ? गे, टकली तासूक् मानूस माज्या समूर बसल्याबरोबर आपल्या आवशी–बापाशीच्या मरनाचा दूक इसारता, ता वगीच ? तसला काय मनात हाडू नुको. भिक्याच्या वंशाचो दिवो लागाचो माज्या हातान्...म्हनान् ही खटपट. भिक्याक् हेतला काय जमाचा नाय. तू वगी रव, मी सगळा करतंय्... असा कडकडावन् गाऱ्हाना घालूक् सांगतंय् मामा घाड्याक्. काय खोटा नाटा आसात तुज्यार, भिक्यार....ता दूर होवूकूच होया. आनी मग बग बाळकृष्णा खेळता, की नाय, तो तुज्या मांडयेर ! या डिच्या

न्हावयाची जबान कदी खोटी होव्‌ची नाय. मी सांजच्या येळेक् यैन. तयारीत रव. येतंयू.

अनसूया : चाय तरी खावा.

डिच्या : आता चाय नुको.... काम झाल्यावर सगळा....सांजे तयारीत रव.... येतंयू.

[ डिच्या जायला वळतो. समोरच त्याला भिक्या दिसतो. भिक्या रागाने त्याच्याकडे पाहतो. डिच्या निघून जातो. ]

भिक्या : अनुसये, डिचो खेका इल्लंलो हंय ?

अनसूया : असोच !

भिक्या : असोच ? तेचा असाच येना वायट आसा. काय सांगा होतो ?

अनसूया : ता मग सांगतंय्. आदी माका सांगा—

भिक्या : काय ?

अनसूया : आमच्या या खळ्यात पॉर खेळाचा, असा वाटना नाय तुमका ?

भिक्या : अगो, जाल्लंयाचो पोर हंय खेळता. तुळस देकूल मोडल्यानी तेनी. म्हनान् आकाडो आनी तुळस नयीन करून घेतलंय्. पोरांका काय तोटो आसा आवाटात ? कोनाचा कोन, ता वळकाक् येना नाय. इतकी पिलावळ वाडली हा. उपलट नुसती !

अनसूया : तसा न्हय.

भिक्या : मग कसा ?

अनसूया : आता कसा सांगा मी तुमका ? माका, बाय, लाज वाटता !

भिक्या : आदी लाजान् घे मग सांग.

अनसूया : आता सांगतंय्च. केदूळ दडौन् ठेव्‌ ? माका....माका....

भिक्या : बो....बोल...वगी रवा नुको.

अनसूया : माका झील होयो.

भिक्या : झील ? तो, गो, खंयसून आननार ? तो काय दुकानार मिळता ? की लक्षाच्या हाटलातल्या खटखट्या लाडवांसारखो बरनेत हात घातलो, की गावता ? गो, पोरा होव्‌क् नशीब लागता !

अनसूया : नुसता नशीब नाय. तेच्यासाठी काय माय करूचा लागता. डिचवलकार सांगा होतो.

भिक्या : डिचवलकर सांगो होतो ? म्हंजे तुका तो ह्या सांगाक् हंय इल्लंलो ?

अनसूया : होय. आनी सांगा होतो.... तुमचां नाव घेव्न्...तुमच्या वंशाचो दिवो आपल्या हातान् लागाचो, म्हनान् तेची खटपट चल्ली हा. सगळा आपन करतलंव्, असा म्हना होतो. माका वगी रवाक् सांगल्यान् हा.

भिक्या : (उसळून) अस्सा ? तेची मारी टोपी त्या डिच्या न्हावयाची ! माज्या वंशाचो दिवो आपल्या हातान् लावची खटपट करता हा ? तो सगळा करतंलो. तुया वगी रवाक् होयंस ? गावातली इतकी बायल मानसां सोडून तेका माजी बायल गावली ?

अनसूया : अहो, असा काय बोल्तास ? तो आपल्या वायटासाठी नाय करतंलो. आपलो येलइस्तार वाडाक् होयो, म्हनान् तो खटपट करतंलो....

भिक्या : अगो, पन मी आसताना तेका काय गरज तेची ?

अनसूया : तुमी खेका ! तोंडान् बोलाक् ? तुमीव् काय करूचास नाय. आनी तेकाव् काय करूक् देवचास नाय.

भिक्या : तू गप रव. बोला नुको.

अनसूया : मग तुमी तरी करा.

भिक्या : काय ?

अनसूया : जावा त्या मामा घाड्याकडे. आनी बोलाव्न् घेव्न् येवा तेका.

भीक्या : मॅट मामाक् ? तेका कित्या ?

अनसूया : अहो, असो काय करतास ? तुळशीजवळ गाराना करूक् होया.

[ भिक्याच्या लक्षात खरा प्रकार येतो. तो स्वतःशीच हसतो. ]

भिक्या : हां...हां....म्हंजे असा आसा. माका वाटला....

अनसूया : तुमका काय वाटला ?

भिक्या : माका....आपला....म्हंजे....तसा काय नाय वाटला. म्हंजे तो हाडतंलो बोलावुन् मामा घाड्याक् !

**अनसूया** : होय. तेच्याकडेच गेले हत.

**भिक्या** : झील होवक् इतक्या करूचा लागता, अनुसये! (सीताराम बाहेरून येतो.)

**सीताराम** : काय, रे ? झील व्हायला कितंक करावं लागतं ? (अनसूया घरात पळते.)

**भिक्या** : ता तुमका खेका होया ? तुमचा आजून लगीन नाय, फगीन नाय.

**सीताराम** : अरे, लगीन नाय झाला, तरी मांडवाबुडसून गेलो हाय मी.

**भिक्या** : तशे बऱ्याच मांडवाबुडसून गेला आसशाल तुमी.

**सीताराम** : माजं जाऊ दे. तुमचा घोव–बायलांचा कसला इषय चल्ला होता ? झिलाचा ?

**भिक्या** : आनखीन कसलो चलतंलो ?

**सीताराम** : मिशेस् तुजी पळाली कशाला ?

**भिक्या** : मिशेस् खंय पळाली ?

**सीताराम** : अरे, आता पळाली, ती काय तुजी वाइफ ?

**भिक्या** : कसली वाइफ ? आनी खंय पळाली ती ?

**सीताराम** : भिक्या, आजून तू येडा कसा, रे ? अरे, विंग्लीसमध्ये मिशेस् म्हंजे वाइफ. म्हंजेच तुमच्या गावठी भाषेत बायल किंवा मागारीन.

**भिक्या** : हां....हां....आता तुमी एकदम विंग्लीस बोलक् लागलास, तर पयल्या फटक्याबरोबर कळतंला कसा ? होय....ती पळाली. म्हंजे वायच लाजली. ह्यो इषय जरा नाजूक... म्हंजे घोव–बायलांचो. परक्या मानसासमूर बायलमानूस वायच लाजता.

**सीताराम** : अरे, हेच. जिथे तिथे तुमी लोक लाजत राहता. म्हनून असं होते. आमच्या मुंबैत बगा. कोनाला कोन लाजत नाय. नवरा आपल्या मिशेस्च्या हातात आनी मिशेस् आपल्या घोवाच्या हातात....

**भिक्या** : काय देता ?

**सीताराम** : देनार काय ? हात घालून रस्त्यावरून फिरतात. कोनाला लाजत नायत. आनी तुमी मला लाजता ? घराला घर लागलेलं हाय आपलं. परकेपना कसलो बाळगता ? भिक्या, तुज्या खळ्यात मूल खेळ्लाच पायजे !

**भिक्या** : तेचीच तयारी चल्लंली.

सीताराम : लोट्यावर ?

भिक्या : होय.

सीताराम : येडा हायस का तू ? असल्या गोष्टी लोट्यावर...

भिक्या : बोला होत्तव.

सीताराम : हे कधी सांगणार ?

भिक्या : ताच सांगा होतंयू. तेच्यासाठी मामा घाडयाक् बोलावून हाडूचो आसा...

सीताराम : हां....?

भिक्या : गाराना घालूक्.

सीताराम : अस्सा ! हे बग, भिक्या, तुला मूल होन्यासाठी आपन कांय बी करायला तयार हाय. गाऱ्हान्याला लागनाऱ्या सामानाचे पैशे आपन देऊ. खरा म्हंजे मीच सांगनार होतो, गाऱ्हानं करायला. पन म्हतला, मी सांगला, तर लोक काय म्हनतील ? येदा मोठा मुंबैचा चाकरमानी असल्या देवदेवस्कीवर इस्वास टेवतो ! म्हनून डिच्याला फुडे केला. कोनाच्याबी कोंब्याने उजवाडू दे. अरे, अनुसयेच्या तोंडाकडे बघितला, की आपल्याला तिची दया येते.

अनसूया : ( बाहेर येत ) चाकरमानयांनू, आवशीच्या तोंडाकडे कदी बगूक् नाय तुमी ?

सीताराम : हं...

अनसूया : खरां म्हंजे तिची तुमका दया येवूक् होयी. बिचारी या वयात देकूल लोकांची कामा करून जगता. दोन हमतामी झील आसान्. कोनाचा दळान आन, कोनाचा कांडून दी. कोनाचा रासन आन. अहो, माज्या वांगडा भारे इकूक् मालवनात जाताना, सकलातल्या पुळनीत पाय भाजतंत, म्हनान् ती म्हातारी कुंबयाचे द्वार काडून पायांकू धामनीची पाना बांधता. इतके पैशे उडवतास, आवशीक् यॅक पायतान घेवा ! ( तिरमिरीने आत निघून जाते. )

सीताराम : साला, हे बरा हाय. मला तुज्या मिशेसूची दया आली, तर तिने मलाच एरंडेलचा ढोस दिला. उलटा न्याय ! साला, बरा करता बरमहत्या, असा म्हनायची पाळी आली. भिक्या, तुज्या बाईफला

पना हाय. त्या दिवशी धाडलेला पापलेट देकूल तिने रीफंड करून टाकला. गरिबालाच जास्त मिजास असते!

भिक्या : राग मानू नुको, चाकरमानयांनू. तेचा बोलना वायच साळढाळ आसा. पन तुमच्या आवशीची काळजी आपल्या आवशीपरास जास्त घेतंला. आनी येनूमावशी देकूल तशीच हां ..हेचा वायच कपाळ जरी उसाळला, तरी घारीसारखी धावत येतंली. पन, चाकरमानयांनू, तुमी कायत्र म्हना, तुमच्या आवशीच्या तोंडाकू गाळी. आमच्या अनुचो म्हनान् काय. गाळींनी खुटारो करून टाकता.

सीताराम : अरे, म्हातारी मानसं प्रेमानं गाळी घालतात.

[ अनसूया चहाचे दोन कप घेऊन बाहेर येते. ]

अनसूया : ही चाय घेवा.

भिक्या : चाकरमानयांका ?

अनसूया : होय.

[ भिक्या एक कप सीतारामला देतो. एक स्वतः घेतो. ]

सीताराम : अरे, केली कदी, हानली कदी ?

अनसूया : हेंका हाटलातली सवय आसा ना....पावलाकू चाय खात्रूची. पन फुटी आसा हां....हसा नुको. गोड मानून घेवा.

सीताराम : म्हंजे गोड घातलंस नाय ?

अनसूया : तसा न्हय, हो. बोलाची पद्धत.

सीताराम : म्हंजे तू गावठी इनोद केलास. ( स्वतः खो खो हसतो. ) अनुसये, तुज्या हातची चाय साखरेशिवाय गोड लागनार.

[ भिक्या खो खो हसतो.
अनसूया आत निघून जाते.
सीताराम भिक्याकडे आश्चर्याने पाहतो. ]

सीताराम : काय झालं ?

भिक्या : ह्यो मुंबैचो जोक ना ?

येनू : ( आतून ) शितारामा !

सीताराम : काय, गे ?

येनू : अरे, तुका चाय होयी ना ?

सीताराम : गे, हंय खाल्ली मी. भिक्या, आज संध्याकाळी कोंबा मारू या. तू हायस ना ?

भिक्या : ह्या काय इचारना झाला ? चाकरमानयांनी सांगाचा, आमी आयकाचा !

सीताराम : सांजच्याला तयारीत राहा.

भिक्या : बरा.

[ भिक्या चहाचे कप घेऊन आपल्या घरात जातो. ]

येनू : रे, तडे मी कोपात चाय वतलंय्....तू खंयसून खातंल ?

सीताराम : अगे, भिक्याने....

येनू : त्या मेल्या भिकल्या वांगडा काय लागलंस ? माका वाटानघाटान करून रातच्या कोंबडयाची तयारी करुची आसा. चल, बगू, चाय खा.

सीताराम : अगे, अनुसयेने दिली चाय. आनी, आये, ते लोक आज गाऱ्हाना करनार हायत.

येनू : खेका ?

सीताराम : अनुसयेला मूल होयत नाय ना....म्हनून !

येनू : बाबा माज्या, मग तुया हंय रवा नुको. जाफसाल आस्तंलो... कोनाचो जाफसाल कोनावरव् बसात !

सीताराम : आये, तुमचे ओल्ड इचार हायत. तुमच्यांत जरा देकूल पोग्रेशीवपना नाय. त्यांचा जाफसाल मला कसा कॉन्टॅक्ट होनार !

येनू : ता माका म्हायत नाय. तू घरात रवा नुको. भायर जा.

सीताराम : बरं. मी एस्टी स्टँडवरून जाऊन येतो. मला लेट झाला, तरी तू

भिक्याला सोडू नुकोस. येतो मी. ओ. के? आये, बाय् बाय्....! सी यू!! (जातो.)

येनू : बाबी माजो मुंबयसून इल्यापासून फाडफाड विंग्लीस बोलता.

[ येनूमाग्रशी सीताराम गेलेल्या दिशेकडे एक वेळ पाहते. आपल्या घराचं दार लावून घेते. आपल्या घराच्या पडवीच्या रोखाने निघून जाते. ]

**का ळो ख**

**प्र का श**

[ डिच्या, मामा घाडी आणि दोघे-तिघे गावकरी येतात. इथे प्रकाशाने संध्याकाळ झाल्याचं दाखवावं. ]

डिच्या : मामा, तुजा गाऱ्हाना एकदम लागू पडाक् होया हा. ह्या नाजूक गाऱ्हाना आसा. नायतर काल रवळनाथाच्या देवळात गाऱ्हाना घातलंस, तेवा देवळाचे खांब देकूल हालले. हंय समाळून....

घाडीमामा : तुया काळजी करू नुको. मिया यवस्तीत करतंय्. मार हाक....

डिच्या : पाच पूर्वज बारा....

घाडीमामा : अरे, ती माजी हाक. तू घरवालनीक् हाक मार...

डिच्या : बरा. अनुसये....गे अनुसये...

अनसूया : (आतून) कोन?

डिच्या : गे, भायर ये. भुतूरसून काय?

अनसूया : (दरवाजा उघडून बाहेर येते.) कोन...तुमी! यवा....यवा....

डिच्या : भिको खंय?

अनसूया : पडले हत.

डिच्या : पडलो? सांजे खंय गेल्लो चडाक्, तो पडलो?

अनसूया : अहो, पडले, म्हंजे माच्यार वायच आडये झाले हत.

डिच्या : भिक्याची पन कमालच आसा. होयो, तेवा निजना नाय, आनी अशा कातरयेळेक् निजता, म्हंजे काय ? उटव बगू तेका.

अनसूया : उटवतंय्. ( आत जाते. आतून आवाज ) अहो, उटा–डोळो लागलो, की काय ? वगा तरी, भायर कोन इले हत, ते !

भिक्या : ( आतून ) कोन, गो ?

अनसूया : बगा तरी भायर येवून् !

भिक्या : कोन इलो ?

[ डोळे चोळीत भिक्या बाहेर येतो. ]

डिच्या : अरे, उडाली नाय अजून डोळ्यांवरची झोप ?

भिक्या : झोपाक् नाय. वायच डोळ्यांर झापड इली.

डिच्या : आमी इलंव् घाडीमामाक् घेवून्.

भिक्या : घाडीमामाक् ?....मेल्यांनू , आजूबाजूक् पाटो आसात, तर बगा. नायतर वांदो होयत. हंयच म्हारुतीचा वारा यैत.

घाडीमामा : ( डिच्याकडे रोखून पाहत ) कोनाक् म्हंता, रे, ह्यो ?

डिच्या : मामा, तो कोनाक् म्हनान् बोलना नाय. तो झोपेत आसा. बडबडता हा.

घाडीमामा : म्हंजे ? ह्यो झोपेत डोळे उघडे ठेवून बोलता ? आनी चलता देकूल ?

डिच्या : अरे, मामा, तो झोपेत अनेक गोष्टी करता. तेच्या बायलेक् इचार. ( हळू आवाजात अनसूयेला ) होय म्हन, गे. नायतर हेचा नरसा चाळवात आनी तू अडान् पडशील.

अनसूया : होय....होय....तेंका काय कळना नाय....झोपेत ! मनाक् यैत, ता बोलतंत. मनाक् यैत, ता करतंत. उटवून् पानी लावचा लागता डोळ्याक्. थांबा हां, पानी हाडतंय् .

डिच्या : गे, एक नाल देकूल हाड.

अनसूया : हाडतंय्.

[ अनसूया आत जाते. भिक्या डुलकी काढीत लोड्यावर वसतो. ]

डिच्या : मामा, येळ नुको. ही पाना घे. ठेव आडयी, आनी मार हाक वगू तुज्या देवाक्!

घाडीमामा : पाच पूर्वज, बारा आकार, म्हारगिन्यापासून गावडे देवापर्यंत धोंडो-गुंडो म्हाराज्या...

डिच्या : अरे, पैक, मामा. हाक मार, म्हनान् सांगल्याबरोबर हाक मारलं. घरधनी उठो आसा गान्हान्याक् ? तेचे डोळे पेंगतंत.

घाडीमामा : मिया वगूकूच नाय.

[ अनसूया नारळ आणि तांब्याभर पाणी आणते. ]

अनसूया : ह्या घेवा पानी....आनी ह्यो नारळ.

डिच्या : मामा, ह्यो नारळ घे....आनी ह्या पानी.

घाडीमामा : तूच लाव तेच्या डोळ्याक्.

डिच्या : कोनाच्या ?

घाडीमामा : आत्ता कोनाच्या डोळ्याक् पानी लावतंस ? अरे, घरधनयाच्या.

डिज्या : धर, गे, पानी, आनी लाव डोळ्याक्....

अनसूया : कोनाच्या ?

डिच्या : तुज्या घोवाच्या !

[ अनसूया भिक्याच्या डोळ्यांवर पाणी मारते. त्याला धरून तुळशी-जवळ आणते. ]

घाडीमामा : कडकडावून् गान्हाना घातल्याबरोबर हेच्या आंगात संचारतंला.

अनसूया : म्हंजे हेंच्यार वारा येतंला ?

डिच्या : वारा नाय, गो. तेज येतंला....तेज !

घाडीमामा : रे, डिच्या, न्हावया, बडाबडा काय करीत रवलंस ? आनी तुजा काय, गो ? झील होयो ना तुका ?

अनसूया : होय.

घाडीमामा : मग सरळ उबॅं रव. घोवाक् पण घे बाजूक्.

अनसूया : (भिक्याला) बाजूक येवा हो.

घाडीमामा : हात जोडा. आनी मी गान्हाना घालताना तोंडानं 'व्हय, म्हाराज्या!' म्हना. ही मोन्यान् करूची गोष्ट नाय.

डिच्या : इतके दिवस मोन्यानी केलास...गान्हाना....काय झाला नाय.

घाडीमामा : रे, डिच्या, आता बडबड बन कर बगू तुजी. हात जोडा....तयार रवा.

[ सगळे जण हात जोडून तयार राहतात. मामा गान्हाण्याला सुरुवात करतो. ]

घाडीमामा : पाच पूर्वज, बारा आकार, म्हारगिन्यापासून गावडे देवापर्यंत धोंडो- गुंडो म्हाराज्या!...

सर्वजण : होय, म्हाराज्या!

घाडीमामा : आज तू वडील देव, न्हाईतलो गिरोबा, चौन्याऐंशी खेड्यांचो अधिकारी, म्हाराज्या!

सर्वजण : होय, म्हाराज्या!

घाडीमामा : आज तू घळणीतलो बिरामन, पाननीतलो म्हापरूस, दांडयेवरचो देवचार, आठ शिमेचो समर्थ अधिकारी, कासारटाक्याचो चाळो. आज तुका ह्यो मामा घाडी हाक मारता हा. तेच्या हाकेक् वो दी. पावळ्याचा पानी पास्टाक् लाव. वडाची साल पिंपळाक् लावून उलटाच्या सुलटा कर!

सर्वजण : होय, म्हाराज्या!

घाडीमामा : कोनाची करनी, मानता, चेटूक, जाफसाल–जा काय आसात, ता तुज्या पायाखाली दाबून ठेव!

सर्वजण : होय, म्हाराज्या!

घाडीमामा : ह्या भिक्या वस्ताचो वंश कोनी रांडे मेल्यान् दाबून ठेवल्यान् आसा, तेच्या काऱ्यार बस. आनी आपल्या हातान् ह्या भिक्याच्या वंशाचो दिवो लाव, म्हाराज्या!

सर्वजण : होय, म्हाराज्या!

घाडीमामा : ह्यां. पॉर तेची बायल....आज झीलासाटी इकळापता. तेचो घोव रातदीस जमनीर नाक घासता हा. पण आजूनपर्यंत तेच्या मनासारख्या झाला नाय. तेका तू राजीखुशी कर. म्हंजे तोव तुका राजीखुशी करीत. घास, रे भिक्या, आता देवासमूर नाक. आनी तूव्, गो....घास देवासमूर नाक.

[ पाट्या कुठे तरी दडून बसलेला आहे. तो दिसत नाही. फक्त त्याचा आवाज ऐकू येतो. ]

पाट्या : भोटमामा....तूव् घास जननीवर.

घाडीमामा : ( उसळून ) कोन, रे, मायझयो तो ! कोन सांगता हा माका घासाक् ? ( भिक्याला ) तू बोल्लंस ?

भिक्या : मी ' होय, म्हाराज्या ! ' शिवाय दुसरा काय पन बोलाक् नाय.

घाडीमामा : मग कोन बोल्लो ?

पाट्या : ( आतून ) मी न्हय दंड्यावरचो देवचार बोलतंय् !

घाडीमामा : देवचार ? तुजो काडतंय् रेच ! समूर ये. भागुबायसारखो दडान् खेका ! ह्यो मामा घाडी तुका हाक मारता हा....समूर ये.

पाट्या : ( आतून ) ह्यो बग, हंय उबो हंय. तुज्यासमूर !

घाडीमामा : माका दिसनंस नाय कसो ?

पाट्या : तू भोट पन आसंस आनी आंधळो पन !

घाडीमामा : थांब....तुजे डोळे फोडतंय्. खऱ्या बापाशीचो आसशील, तर थंयच थांबशील.

पाट्या : ह्यो बग, थांबलंय्. आता तू खरो भोटमामा आसशील, तर येशील.

घाडीमामा : अरे, मी खरोच आसंय्. ह्यो बग, इलंय्. ( मामा आत धाव मारतो. )

भिक्या : आता काय सांगाचा ह्या मामाक् ? अशानी ह्यो खरोखरच मॅट होयत !

अनसूया : पन माजा काम होयत ना ?

डिच्या : अगे, तू भिया नुको. तुजा काम झाला. भिक्या, तू अनुसयेक् घेवून्

भुतूर जा.

भिक्या : जाव ?

डिच्या : बेशक्क जा. तू भुतूरचा काम बघ,—आमी भायरचा काम बगतंव्.

भिक्या : जाव भुतूर ?

डिच्या : अरे, जा. आमची परवानगी आसा. देवाची परवानगी आसा.

[ भिक्या आणि अनसूया घरात जातात. डिच्या गाऱ्हाण्याचं सामान उचलीत असतो. इतक्यात सीताराम येतो. ]

सीताराम : डिच्या, काय करतोयूस ?

डिच्या : गाऱ्हान्याचा सामायन येकठंय् करतंय्.

सीताराम : गाऱ्हानं यवस्तीत झालं ना ?

डिच्या : होय. चलतंयू....ह्या पोचवून येतंय्.

[ डिच्या जायला वळतो. ]

सीताराम : भिक्या ! रे, भिक्या....

डिच्या : चाकरमानयांनू, आता भिक्याक् हाक मारू नुको.

सीताराम : का ?

डिच्या : तो कामात आसा. भायर येवुचो नाय.

सीताराम : म्हंजे ?

डिच्या : तो आनी अनुसया घरात हत. दार बन करून घेतल्यानी हा.

सीताराम : अरे ! सांजच्या पाराला दार बन ? येडा हाय का तो ? लक्सूमी कशी येनार घरात ?

डिच्या : तेका लक्सूमी नुको हा या येळेक्....अनुसया व्हयी हा. आनी ती घरातच आसा....तेच्या वांगडा. तेवा तेंका ह्या येळेक् तरास देव नुको.

सीताराम : बरं....तू जा आपल्या कामाला. आनी जाताना मागे वळून बघू नुकोस.

[ डिच्या निघून जातो. ]

सीताराम : आये....गे, आये ! ( येनूमावशी बाहेरून येते. ) तू कुठे गेली होतीस ?

येनू : हंयच होतंय्.

सीताराम : लक्षाचं दळण आणायला गेली असशील !

येनू : नाय, रे ...

सीताराम : तू बोलू नकोस. तुजी सवय सुटायची नाय. हजारदा सांगितलं तुला, लोकांची कामं करत जाऊ नकोस. माज्या हा प्रेस्टीजचा इसू हाय ! तू आयकायची नाहीस. घरात कोंबा मारायचा आनी तू लोकांची कामं करीत गावभर हिंड. मारला कोंबा भिक्यानं ? ( कोंबड्याचा आवाज. )

येनू : तो काय आराडता हा !

सीताराम : म्हंजे कोंब्याला आजून हानखून झाला नाय.

येनू : अरे, तो भिकलो आसा खंय ?

सीताराम : अगे, तू घरात असशील, तर तो घरात येनार.

येनू : मी घरातच होतंय्. पन तेंचा गान्हाना होता ना, म्हनान् वायूच जरा बाजूच्या घरात जावन् बसलंय्.

सीताराम : बरं केलंस ! तुमच्या लोकांची कामं म्हंजे... होतेयू....जातेयू.... चल्तेयू असला असते. चलाखी नाय.

येनू : होय, रे ! मोठो चलाक आसंस, तो म्हायत आसंस. माज्यात चलाकी नाय ? अरे, या वयात देकूल तयार फुरमुले नाचतंत, तसा नाच्तंयू मी.

सीताराम : अगे, मी त्या अर्थाने नाय बोललो. मुंबैतली आमची बोलायची शिष्टीम हाय ती. तू जा बगू आत. मी भिक्याला बगतो. आनी तुजा तो बाबल्या, लाडका....कुठे गेला ?

येनू : आसात न्हयवर.

सीताराम : तेला तू चडवून ठेवला हायस. येदा घोडा झाला....

येनू : तेका घोडो म्हना नुको, सितारामा. तुया तेका पोसनंस नाय. मिया

सवता कष्ट करतंय्.

सीताराम : ते म्हायत हाय. पन, साला, काडीच्या कामाचा नाय.

येनू : तो कोंब्याकू हात लावचो नाय.

सीताराम : मग खेला हात लावनार ? गाव ओकाळतो खाली फुकट ! सगळा आवाट तेला खोटा म्हनतो.

येनू : काय खोटेपना केल्यान्, रे, तेनी ?

सीताराम : अगे, तो भोटमामा हाय ना ? त्याची नुसती पाट घेतो. कदीतरी तो हेच्यावर जाप उठवंन् घालनार ! तेवा तुजे डोळे उघडनार !

येनू : उगडानेत. पोराकू माज्या हानखून झाला, तर त्या मेल्या भोट-मामाचा काळीज खायन् ! तो मेलो चिडाचो नाय, तर कोन चिडयंत तेका ?

सीताराम : तुमाला गावठी लोकांना पटनार नाय. तुमी आपल्याच पोराची बाजू घेनार. आपला तो बाब्ल्या, लोकांचा तो कारटा. जा तू....मी बघतो भिक्याला.

[ येनूमावशी घरात निघून जाते. सीताराम भिक्याच्या घरासमोर येतो. ]

सीताराम : भिक्या !...ए...भिक्या !!

भिक्या : ( आतून ) काय ?

सीताराम : भायर ये, बगू....( भिक्या लगबगीने बाहेर येतो. ) तू काय मानूस हायस ?

भिक्या : मिया तुमच्याकडेच येनार होतंय्.

सीताराम : राती बारा वाजता येनार होतास ? तुज्या जिवावर मी कोंब्याचा कार्य-करम ठेवला....चल, बगू....

भिक्या : चला....

[ सीतारामच्या मागून भिक्या सीतारामच्या घरात जातो. ]

अं धा र

## प्रवेश तिसरा

[ स्थळ : भिक्या वस्ताचं घर. डिच्या न्हावी भिक्याच्या घरासमोरून जात आहे. तो थांबतो. पुढे येऊन अनसूयेला हाक मारतो. ]

डिच्या : अनुसये....गे...अनुसये!

अनसूया : ( आतून ) कोन ?

डिच्या : मी. ( अनसूया दरवाजा उघडून बाहेर येते. ) अगे, दिवसा ढवळ्या दार बन करून घेतास ?

अनसूया : कोंबडी–कुतरी येतंत ना, म्हनान् आड करून घेतलंय्.

डिच्या : भिक्या भुतूर आसा ?

अनसूया : नाय. भायर गेले हत.

डिच्या : अस्सा....अस्सा! माका वाटला, गाऱ्हाना घातल्यापासून दिवसाचा देकूल दार बन करून घेतास, की काय! ता कायंव् आसला, तरी तुजो मार्ग आता मोकळो झालो........तुका झील झालोच म्हनान् समज.

अनसूया : कसो होतंलो ? गाऱ्हाना सगळा इस्काटान् गेला.

डिच्या : अगे, नाय इस्काटान् गेला. सगळा यवस्तीत झाल्यावर मामानं गोंधळ घातल्यान्. तुजा काम झाला. तुका झील होतंलो.

अनसूया : तुमच्या तोंडात साखार पडानेत.

डिच्या : ती चायत घालून घेवून् ये.

अनसूया : थांबा हां, हाडतंय्.

डिच्या : गे, चाय कित्या आता ? मिया तुजी वायच भगल केलंय्. सवय आसा माका बायलमानसांची भगल करूची.

अनसूया : आता म्हतलास कोन्या येळेन्....थांबा हां. हेंच्यासाठी करून ठेवलंय्.

डिच्या : तुजो शब्द तरी कसो मोडू ?...हाड....बसतंय्.

अनसूया : ह्याडतंय् !

[ अनसूया आत निघून जाते. वाटेवरून जाणारा हरी डिच्याला पाहून पुढे येतो. ]

हरी : काय, डिच्या ? हाली ह्या घर धरलंस ?
डिच्या : तुज्या पोटात कित्या चावता ?
हरी : माज्या कित्या चावताला ? चावनाऱ्याच्या आपोआप चावतंला.
डिच्या : हरग्या, त्वांड समाळून बोल, नाय तर व्हानेन् मारीन.
हरी : ती आसा काय, बग, पायांत ?
डिच्या : आसा. गाव हिंडान् झरली हा. थपाथपा बसतंली. चिखल थापल्या-सारख्या त्वांड सुजतंला.
हरी : कोनाचा ?
डिच्या : तुजा.
हरी : हिंमत आसा ?
डिच्या : ता कळात.
हरी : कळातच, डिच्या. कितीव् कर, पानयात हगलंला, दडना नाय.

[ हरी डिच्याला डिवचून निघून जातो. त्याच्या नजरेने डिच्या बेचैन होतो. इतक्यात अनसूया चहा घेऊन बाहेर येते. जाणाऱ्या हरीला ती पाहते. ]

अनसूया : कित्या इल्लो तो हरगो ?
डिच्या : त्या भडयाक् कायक् कामा आसंत ?....
अनसूया : चाय घेवा तुमी.
डिच्या : नको, अनुसये... माका चाय नुको.
अनसूया : असा काय करतास ? आता हाइक् सांगलास.
डिच्या : तसा न्हय. या गावातली मानसा लय वायट आसत. ( डिच्याच्या बोलण्याचा अर्थ अनसूयेच्या लक्षात येतो. ) काऱ्याचो नायटो करतील.

अनसूया : अहो, पन जंय काटोच नाय, थंय नायटो होतंलो कसो ?

डिच्या : असा तुका वाटता ना ?

अनसूया : मी खंबीर आसंय्. कसल्याव् नायट्यावर माज्याजवळ वशेद् आसा.

डिच्या : असा बायलमानूस होया ! नायतर आमचा बायलमानूस ! कोनी हात धरल्यान्, तर रडत तरी रवात, नायतर तेच्या पाटसून तरी जायत.

अनसूया : असा, हो, काय बोलतास ? कोनच्या पाटसून गेला ?

डिच्या : अगे, तो नारू आब्राचो धोंडी. हेका बगल्यान्, रे, बगल्यान्, की डोळे मिचकाय्. एक दिवस सानीवर झखलंला कोंजूळभर चंदन केळीच्या पानावर घेव्न् ह्या गेला तेच्या डोळ्यांत घाल्क्‌.... तेचो डोळो धुकता, म्हनान्. तेका वाटला मसालो. तो जो धूम पळत सुटलो... काय इचारू नुको. तो फुडे, ह्या पाटी. केळीचा पान मदी. ( अनसूया हसते. ) अगे, हसतंस काय ? असला आमचा बायल-मानूस. हळकुंडाच्या पदराक् शेळकुंड !

अनसूया : जावनेत, हो. आसतंत सादी मानसा.

डिच्या : सादी ? ( जोरजोराने हसतो. )

अनसूया : काय झाला ? हसतास कित्या ?

डिच्या : माज्या बायलेचो एक परसंग आटावलो. माज्या लग्नाच्या येळेची गोष्ट ! माजी बायल तू बगलंस ना ? तुज्यासारखीच दिसाक् होती. तेवा.... मस्त ! इनीबिनी माळल्यान्, की अगदी खुटून घैसारखी वाटा. आजून बगशील, तर शेरवडीच्या पानासारखी असा. मग त्या येळेक् कशी दिसा आसात, ती बग. आता तूच इचार कर. असा बायलमानूस बगल्यावर खंयच्या झिलग्याक् थार होयत ?

अनसूया : ( नाखुशीने ) तुमी आता चला, डिचवलकारांनू. लोका वाट बगीत आसतील तुमची. माका देकूल कामा हत.

डिच्या : अगे, कामा मग कर. आनी माजी कोन नाय वाट बगना हा.

अनसूया : डिचवलकारांनू, असले गोष्टी बायलमानसांका सांगाचे नसतंत.

डिच्या : गे, तू खंबीर आसंस ना ?

अनसूया : परसंग इल्यावर !

डिच्या : आता देकूल तुज्यार परसंग इलो हा, असा समजान् आयक्.

अनसूया : बरा सांगा.

डिच्या : गे, आमच्या लग्नाची गोष्ट. माजा घर तुमच्या घरापरास न्हान आसा. आनी लग्नाच्या येळेक् ही ऽ मानसा घरात शिरविरत. पाय ठेवूक् जागो नाय. रात झाली, बाय.... जेवना-खावना झाली. झोपाची येळ इली. आमची भैन इल्लंली....हाली माजा त्यांड बगना नाय.... पन तेवा इल्लंली. तिनं माका सांगल्यान्, दादा... व्हायनावरची खोली तुजी. वयनीक् तडे धाडतंय्. झाला, बाय. पोराटोरां निजल्यावर भयनीन् माका काळोखात खोलयेच्या दाराजवळ न्हेल्यान्.... आनी शिदो ढकलून दिल्यान् भुतूर... मी धडबडत आत गेलंय् आनी पटकन् दाराक् अडनी घातलंय्. आता म्हतला, व्हायन खंय आसा, ता बगू या.... पायबीय मुरगाळात! तर, बाय, समूर बगतंयू, तर कोपऱ्यात मुसाळ उब्यँ! म्हतला, खोली हीच. हातान् रापाक् लागलंय्, तर काय, भिंवले.... खोलयेत सामसूम. चिटपाखरू नाय!

अनसूया : बायल जाग्रूकच नाय भुतूर?

डिच्या : गे, आयक् तरी. मनातल्या मनात गाळीनी खुटारो केलंय्.... भयनीचो आनी बायलेचो देकूल. आनी भायर यै होतंय्. इतक्यात कोपऱ्यातला इरला हालाक् लागला. माका वाटला, कोंबडाबिंबडा, की काय! चुकान् भुतूर अडकान् रवला.... ता धडबडता. म्हनान् मी इरला उचल्लंय्, तर ह्या आपला बसला हा भुतूर.... घुडात कोंबडी बसतंत, तसा. मी इचारलंय् (हळू आवाजात) गो, हंय किल्या बसलंस?.... तर हूं नाय, की चूं नाय! बरा, माका मोठ्यान् बोलाची चोरी. घरभर मानसा... हळूच इचारलंय् ........

अनसूया : अहो, थंय हळू बोललास, पन हंय मोठ्यान् सांगा. माका आयकाक् यैत कसा?

डिच्या : होय.... होय.... (मोठ्याने) मी तेका इचारलंय्, गो, हंय किल्या बसलंस इरल्याबुडी? तुका माचो नाय? तेवा उटान् उब्यँ रवला. आनी थरथर कापाक् लागला. आता खरी गम्मत सुरू झाली.

अनसूया : डिचवलकरांनू, फुडची गम्मत माका म्हायत आसा.

डिच्या : गे, तुमच्या येळेची गम्मत निराळी आसात. भियाक् तू समाळून

घेतलं आसशील. भिकोच खोरनात दडान् रवलो आसात.

अनसूया : ( खुद्कन हसून ) तुमका कसा कळला ?

डिच्या : गे, भिक्याक् मी न्हानपनापासून वळाकतंय्. माज्यासारखो धीट नाय तो.

अनसूया : तुमी धीट आसास ?

डिच्या : मगे ? कसलात् बायलमानूस माज्याफुडे नरामतंला.

अनसूया : असा कोनी सांगल्यान् तुमका ?

डिच्या : सगळे लॉक म्हंतंत. ता जावनेत.... माजी फुडची गोष्ट आयक्....

अनसूया : बेगीन सांगा, बगू...

डिच्या : तर माजी बायल.... मियां तिचो हात धरलंय्. तर झटकावून् पळाक् लागली. आता येदीशी खोली. पळान् खंय पळतंली ? कदी हाता-बुडसून पळा, तर कदी ढेंगाबुडसून पळा. शेवटी धरलंय्, बाय. तेवा माजी बॉडी रेड्यासारखी होती.

अनसूया : हरी आचरेकराच्या रेड्यासारखी ?

डिच्या : भगल करू नुको.... तर लागला रडाक्.

अनसूया : कोन ?

डिच्या : आता गोष्ट कोनाची सांगतंय् मी ?

अनसूया : तुमच्या बायलेची.

डिच्या : होय ना ?

अनसूया : पन रडाक् कित्या लागली ?

डिच्या : आत्ता....लग्नाच्या पयल्या रात्री घोवान् हात धरल्यावर बायल केवा रडता ?

अनसूया : माका म्हायत नाय.

डिच्या : तुया रडाक् नाय ?

अनसूया : माका कदीच् रडाची सवय नाय.

डिच्या : मग भिको रडलो आसात....तर माका सोडा....माका सोडा....

अनसूया : कोनी धरल्यान् हा तुमका ?

डिच्या : अगे, मी बायलेक् धरलंय्, तेवा ता म्हनाक् लागला.

अनसूया : डिच्चवलकरांनू....

डिच्या : वायच खला, इदलासा....सरत इला....मी आपुक् जावुन सांगान्....

अनसुया : आपू ?

डिच्या : तेचो बापूस. मिया सांगलंय्.... तू आपुक् जावन् सांग, नायतर माज्या बापूक्. मिया अयसावरचो वाघ झालंय्. तुया माच्यार झोप...तुया माच्यार झोप !

[ अनसूया हसत घरात पळते. तिच्यामागून आपली गोष्ट सांगत डिच्या दरवाज्यापर्यंत जातो, इतक्यात ज्ञानदेवला घेऊन हरी तिथे येतो. ]

हरी : डिच्या, थंयच थांब. पुढे जाशील, तर डोकले तोडीन ! कोनाक् माच्यार झोपवतंस ? हजामतीबरोबर हे पन धंदे सुरू केलंस ?

डिच्या : हरग्या....

हरी : बगलंस, ज्ञानदेवा, मिको घरात नसलो, की हंय असा चलता !

डिच्या : हरग्या....( केविलवाणा चेहरा करून ) काय बोलतंस ह्या ?

हरी : चल, ज्ञानदेवा, बगू या हेचा.

[ ज्ञानदेव आणि हरी निघून जातात. डिच्या भकास मुद्रेने त्यांच्याकडे पाहत राहतो. ]

**अं धा र**

[ अंधारात आवाज ऐकू येऊ लागतात :
" अरे मेल्यांनू, डिच्चो दिसता, तसो नाय हा ! अनुसयेबरोबर तेनी जमवल्यान्....मी बगलंयू माज्या डोळ्यांनी ..कानांनी आयकलंयू....
तो अनुसयेक् सांगा होतो माच्यार झोप..."
अनेक मुखांतून हे आवाज उमटतात.
हरी आणि ज्ञानदेव अनसूयेची आणि डिच्याची बदनामी करतात.... ]

## प्रवेश चौथा

[ स्थळ : भिक्या वस्ताच्या घराचं अंगण.
भिजलेल्या अनसूयेला घेऊन येनूमावशी येते. अनसूया रडते आहे. ]

येनू : जा आता घरात. असा पुन्हा करू नको. मी आपला थंय होतंयू, म्हनान् बरा. नाय तर ? अगो, तुका इचार नाय कसो ? जीव कसल्या आवशीच्या घोवाचो देवूक् जाय होतंस ! जा घरात...

[ अनसूया घरात निघून जाते. बाहेर गेलेला सीताराम घरी येतो. अंगणातच त्याची आई त्याला दिसते. ]

सीताराम : कुठे गेली होतीस ? तुजा पाय घरात थारायचा नाही. नुसती फिरत राहा.

येनू : अरे, फिराक् नाय गेल्लंयू.

सीताराम : मग कुठे गेली होतीस ? आणि तुजं पातळ भिजलं कसं ?

येनू : न्हयीर गेल्लंयू !

सीताराम : ह्या वयात तुया पेवायला जातेस ?

येनू : तोंडाक् हाड आसा, रे, तुज्या ? पेवाक् नाय जावक्. अनुसयेक् ढोपार-भर पानयातसून वढून हाडलंयू. ता जीव देवक् गेल्लंला.

सीताराम : अनसूया जीव द्यायला गेली होती ?

येनू : अरे, अब्रूसाठी !

सीताराम : मला वाटलंच. असं काय तरी होनार. तो भिक्या कुठे गेला ?

येनू : आसात घरात....

सीताराम : बग, आये, कशी मानसं हायत ! या भिक्याच्या बायकोची अब्रू गाव-

भर झाली. आनी हा हालमेंखुशाल! झोपला असेल. अरे, त्य हरग्याचं टाळकं सटकवून टाकलं पायजे. ( हाक मारतो. ) भिक्या!

**भिक्या** : ( बाहेर येत ) काय म्हंतास ?

**सीताराम** : अरे, तुजी बायल अनुसया ह्या साल्या लोकांमुळे जीव द्यायला गेली होती.

**भिक्या** : अनुसया जीव देवूक् गेलंला ?

**सीताराम** : होय.

**भिक्या** : माका म्हायतच नाय.

**सीताराम** : तुला राग यैत नाय!

**भिक्या** : येता तर... !

**सीताराम** : येतो ना! मग घे दांडा आनी...चल माज्याबरोबर.

**भिक्या** : चला. ( तो आत जातो. )

**येनू** : शितारामा, माज्या सोन्या, असा काय करू नुको. वगी रव!

**सीताराम** : मी आता वगी ऱ्हानार नाय!

[ भिक्या दांडा घेऊन बाहेर येतो. ]

**भिक्या** : ( बाहेर येत ) चला. बगू या त्या हरग्याचा!

**येनू** : शितारामा, तेंच्या वाटेंक् जाव नुको. ते वायट आसंत.

**सीताराम** : अगे, ते वायट! मी चांगला हाय काय? वायटाला मी देकूल वायटच हाय. चल, भिक्या!

**भिक्या** : चला.

**येनू** : माजी शप्पथ असा, शितारामा.... पुढे जाव नुको.

**सीताराम** : आये!

[ सीताराम आणि भिक्या जागीच खिळतात. ]

**प ड दा**

# अंक तिसरा

## प्रवेश पहिला

[स्थळ : लक्षाचं हॉटेल.
सोनक्याच्याने अंगात पैरण घातलेली आहे. डोक्यावर टोपी. लक्षा हॉटेलच्या काऊंटरवर बसलेला आहे.]

सोनक्याचा : (लक्षाच्या जवळ जाऊन) मावशेकडे जातंय्. उद्या यैन.

लक्षा : आनी आज हंय तुजो बापूस काम करीत ?

सोनक्याचा : मामा, जाल्ल्याक् माजो बापूस कित्या काडतंस ? तो काय तुज्या हटलात काम करी होतो ? तो गेलो, म्हनानूच माका काम करूचा लागला ना तुज्या हटलात ? (सोनक्याचा रडू लागतो.)

लक्षा : सोनक्याच्या...अरे, असा काय करतंस ! वगी रव...अरे, मी मायेन् तुका दम देतंय्. तुजो मामा नाय मी ?... जा तू मावशेकडे.

सोनक्याचा : माका आता खंयव् जावचा नाय....

लक्षा : अरे, तो बग, चाकरमानी जाता हा....हाक मार...

सोनक्याचा : तूच मार....

[सोनक्याचा आत निघून जातो. सीताराम तळहातावर मशेरी घेऊन बोटाने ती दाताला लावीत नदीच्या दिशेने चाललेला असतो. तो एकटाच आहे.]

लक्षा : काय, चाकरमानयांनू....खंय ?

सीताराम : हातात काय हाय माज्या ?

लक्षा : ता बगलंय्. पन आज गोतावळो नाय....रेडवो नाय....

सीताराम : रेडवा नाय, रे, बाबा....ट्रँझीस्टर !

लक्षा : तोच....तोच नाय, म्हनान् वाचाकलंय्. बॅटरी सरली, की काय ?

सीताराम : लक्ष्मुमन, तू माजी भगल करतोस ?

लक्षा : भगल नाय, हो. मुंबैसून इल्यावर लय दिवस झाले, म्हनान् इचारलंय्.

सीताराम : म्हंजे माजी फकी झालीयू, असा तुला म्हनायचा हाय, की काय ? म्हन....म्हन. लाजू नुकोस. अरे, मानसाने तोंडावर बोलावं. मागसून कुचेष्टा करू न्हये... या मताचा हाय मी. आपल्याला तुजा सभाव आवडतो. तोंडार इचारलंस, बॅटरी सरली, की काय, म्हनून. शाबास ! चाकरमान्याला तोंडावर इचारायची डेरिंग तुज्यात हाय. मीच् तोंडावर सांगतो...बॅटरी सरली हाय ! आता मालवनला इतक्या अर्जंट कोन जानार ? म्हनून बॅगेत ठेवून दिला.

लक्षा : व्हेअर विंडीयाच्या ?

सीताराम : ( चमकून ) नाय ! हॅंडबॅगेमध्ये.

लक्षा : आनी घड्याळ नाय ता मनगटात ?

[ लक्षा सीतारामाचा हात फिरवतो. मशेरी जमिनीवर सांडते. ]

सीताराम : अरे, मशेरी पडली माजी. तुजा लक्ष बारीक असतो हा. ते बन पडला हाय.

लक्षा : म्हंजे हातातसून काढून ठेवलास, की काय ?

सीताराम : माजा अंदाज हाय, त्याच्यामध्ये खारा पानी गेला. आता बगू या. मुंबैला गेल्यावर रिपेर केला पायजे.

लक्षा : हंय मालवनाक् नाय करनंत ?

सीताराम : अरे, फोरेनचा हाय ते. इथे काय रिपेर होनार ? ह्यांना खोलायला येनार नाय. आनी जबरदस्तीने खोल्लाच, तर....पुन्हा बन करता येनार नाय. रिपेरिंग करायची वार्ताच करू नुकोस. त्याने देते येळेलाच सांगला होता, पन मी इसारलो. आनी फटका खाल्ला. अरे,

चांगल्या वस्तू इथे हानायलाच नुको. वाट लागते. टॅझीस्टरची देकूल बटनं हालायला लागली हायत.

लक्षा : हालतील नाय, तर काय ? जेच्या हातात मिळात, तो फिरवता. लावची एकाकू देकूल म्हायती नाय. अहो, बटनाच काय, आतला सामायून देकूल ढिला झाला आसात.

सीताराम : असेल. बटन फिरवला, की शेळवनी घालतो. त्या दिवशी निसूता कोकटायला लागला. आये धावत आली आनी तिने काय तरी केला. आनी एकदम बन....टूर नाय, की फूर नाय! आतापर्यंत बन हाय.

लक्षा : आपटल्यान् आसात....रागान्.

सीताराम : पुन्ना गावठी जोक केलास. त्या भिक्यासारखी तुला पन वायट खोड हाय. तो एक शाना. सवता जोक करील आनी सवताच हसत बसेल.

लक्षा : त्या दिवसापासून तेचा हसना बन झाला हा!

सीताराम : अरे, तेला काय नाय त्याचं. तो हालमेंखुशाल हाय. बिचारी अनुसया...ती लाजेनं भायर पडत नाय...म्हनून काम बन. त्या दिवशी नुसती पेज खात होती. आमच्या आईनं जाऊन समजूत केली. तेवापासून घराभायर पडायला लागली. अरे, अब्रू कसली जानार ? आपन काय केलंच नाय, तर ? धुतलेल्या तांदळासारखी हाय ती बाई! तिची अब्रू कोन घेनार ? हरग्याचा वरून खाली उतरला पायरी. लक्षुमन, माझं ऐकून ठेव...एक दिवस त्या हरग्याला मी डुरक्यात फेकून देनार! आनी त्या घेनग्याच्या कानात बोटाऐवजी तीन इंच खिळा ठोकनार. त्यांना वाटतं, सिताराम मुंबैला गेल्यावर शेळपट झाला!

लक्षा : पन मी म्हनतंय्, त्या डिच्या न्हावयान् अनुसयेच्या घरात जावून् बसाच्या खेका ? तिचो घोव घरात नसताना ?

सीताराम : अरे, हे काय बोलनं झालं तुजं ! बसला, म्हनून वायट झाला ! तुज्या घरात मी बसनार नाय ? माज्या घरात तू बसनार नायस ? गाव हाय हे. हितेच आपला जल्म झाला. हितेच आपन न्हानाचे

मोटे झालो. एकमेकांकडे जानार नाय ? काय वार्ता करतोस ? असं झालं, तर आपल्याला लगीनच करायला नुको. आपन असनार मुंदैला, ती असनार ह्रिते. कोन गावातला मानूस घरात जावून् बसला, की बोंबाबोंब. ती बिचारी अब्रूस्तव न्हयीर जावून् जीव देनार आनी आपन फापलनार. नाय, लक्षुमन, हरग्याने आनी शानदेवाने असा नाय करायला पायजे. त्यांनी इचारायला पायजे होता.

लक्षा : आमी बोंबाबोंब करूची, म्हनान् ?

सीताराम : म्हंजे तू त्यांच्या बाजूने बोलतो हायस ?

लक्षा : मी तेंच्या बाजून् नाय बोलनंय्. अहो, परतेकान् आपली मर्यादा राकाक् होयी. नुसता चांगला आसान् भागना नाय. चांगला वागाक् होया. माडाच्या मुळात बसान् तुमी पानी खाल्लास, तरी लॉक म्हनतले, तुमी माडी खाल्लास. माजा बोलना आसा डिच्याच्या बाबतीत. अनुसया बिचारी निर्मळ आसा.

सीताराम : आनी डिच्या निर्मळ नाय ?

डिक्र्या : तोव् तसो निर्मळच आसा, पन तेचा वागना वायट. बायल मानसांका बगल्यान् , रे, बगल्यान् , की भुजाता. नुसतो बोलाक्. आनखीन् काय नाय. तेच्या असल्या वागन्यान् अनुसयेक् सगळा भोगूचा लागला. आता सगळा निवाळला, ता बरा झाला.

सीताराम : त्यासाठी डिच्याला देवाची घाट धरावी लागली. आनी याला कारन तुजा भिक्या.

लक्षा : माजो ? आनी तुमचो न्हय ?

सीताराम : अरे, दोगान्चा. त्यानेच मोटमोठ्याने ओरडून सांगितला, डिच्याने देवाची घाट धरली पायजे.

लक्षा : ता बरोबर ! खरा खोटा तेच्या फुड्यातच ठरता !

सीताराम : तू कायव् म्हन, लक्षुमन ! पन आजून गावातल्या मानसांचा देवावर इस्वास हाय हा. हा बघ भिक्या, नाव काढल्याबरोबर हजर.

[ भिक्या येताना दिसतो. ]

लक्षा : तेका आजून म्हायत नाय आसा, तुमच्या ट्रॅन्झीस्टरची बॅटरी सरली, ती!

सीताराम : तू आता गावठी इनोद करू नको.

[ भिक्या येतो. ]

भिक्या : चाकरमानयांनू, येळ कसो झालो? मिया आपलो तडे उंडलीखाली बसान् तुमची वाट बगतंय्.

सीताराम : अरे, लक्षुमनबरोबर बोलत ऱ्हायलो, तो ऱ्हायलो. इषय डिच्याचा होता.

भिक्या : ता आता झाला ना?

सीताराम : अरे, पन तुज्यामुळे प्रकरन वाडला.

भिक्या : माज्यामुळे? कायत्र् वगीच काय बोलतास?...अहो, मी समजूतदार होतंय्, म्हनान् सगळा ऱ्हीवाला. तुमच्या त्या डिच्या ऱ्हावयाक् चांगलो घडो मिळालो. आता कोनाच्या घरासमोर खळये खनाचो नाय. आनी आवाटातल्या मानसांची देकूल तोंडा अगदी उत्रडी पडली. हरग्याच्या तोंडाचा तर अगदी खापार झाला. धेनग्याचा कानातला बोट नाकात जावक् लागला. पन, चाकरमानयांनू, हरग्याचो तुमच्यावर राग आसा. तुमचा भाषान चललेला...देवळात.... 'अनु निर्दोस आसा...' असा आरडान् सांगा होतास...तेवा हरगो अश्शे डोळे करून तुमच्याकडे बगी होतो. म्हतला, आंगावर उडी मारता, की काय, तुमच्या...

सीताराम : अरे, मारली असती, तर देवळाच्या खांबाला चिरडून टाकला असता. (पोटात कळ येते.) चल....माज्याने आता उबं ऱ्हावत नाय. लय बोल्लोय्.

भिक्या : लक्षा, यतंय्, रे....

सीताराम : (अचानक आठवून) अरे, हो...लक्षा, तुला सांगायचा होता, ते सांगितलाच नाय. निस्कारन इकडचं तिकडचं बोलत ऱ्हायलो.

लक्षा : काय सांगनार होतास?

सीताराम : भिक्या, तू चल पुढे. मी आलो. (भिक्या जातो.) बाबल्या येनार हाय तुज्या जवळ.

लक्षा : पाट्यो ?

सीताराम : होय.

लक्षा : खेका ?

सीताराम : तो सांगेल तुला. माज्याअगोदर निघाला हाय. कुठे तरी सुरमला. पन येनार हाय.

[ सीताराम नदीच्या दिशेने निघून जातो. पाट्या इकडे तिकडे पाहत येतो. ]

पाट्या : लक्षुमनमामा, बाबीचो निरोप आसा.

लक्षा : सांगान् टाक. ताकाक् जाऊन कुंडला कित्या दडवतंस ? सांग.

पाट्या : कान हडे करा.

लक्षा : माज्या कानात मळ नाय झालो. माका लांबचा आयकाक् येता. बोल.

पाट्या : पन....

लक्षा : अरे, बोल तू. तुझ्याजवळ कसलो निरोप आसा चाकरमानयांचो, ता ठावूक् आसा माका. आकडो सांग.

[ तेवढ्यात ज्ञानदेव येतो. ]

ज्ञानदेव : आकडो ! कसलो आकडो ? हाली विर्टींग घेतंस, की काय, लक्षुमन-मामा ? बरा केलंस, पन माल्वनाक् जावन् कापतंलंस ?

पाट्या : नाय हंयच कापतंलो. मान फुडे कर, आनी किती वाटे घाल्क होये, ते सांग. नायतर मेल्यावर भांडत रवशील. माजे वाटे कमी पडले, म्हनान्.

ज्ञानदेव : भांडाचा काम तूच कर. आनी मेल्यावर तर मी भांडाचंयूच नाय तुज्यासारखो.

पाट्या : मायझंया....मेल्यावर मी खंय भांडतंय् ?

लक्षा : अरे, पन तुमी आता जितेपनी कित्या भांडताहास ?

ज्ञानदेव : मिया खंय भांडतंय् ? मिया हेका आकड्याचा इचारी होतंय्. पाट्या, खब्रर खंयसून हाडलंस ?

पाट्या : तुज्या आवशीच्या घोवाकडसून.

ज्ञानदेव : ते खंय खेळतंत ? पन, मेल्या, आकडो सांग ना !

लक्षा : ज्ञानदेवा, तो तुका नाय सांगाचो. माका सांगतलो.

ज्ञानदेव : पाट्या, असली फारशालिटी बरी नाय.

लक्षा : वगी रव, रे, तू....पाट्या, सांग आकडो.

पाट्या : हेच्या फुड्यात ? ह्यो, सालो, गावभर करीत.

ज्ञानदेव : अरे, नाय करूचंय्. आवशीच्यान् कोनाक् सांगाचंय् नाय.

लक्षा : सांग, रे, पाट्या...

पाट्या : शंभर !

ज्ञानदेव : म्हंजे एक्क्यार मेंडी ? एक मेंडी एक्क्याबरोबर रवात...दुसऱ्या मेंडयेचा काय करू ?

पाट्या : तुज्या बापाशीक् न्हेवून् दी.

ज्ञानदेव : आकड्यावरसून बापूस काढू नुको हां माजो !

पाट्या : घेनग्या, आता जातंस निवांत ?

लक्षा : तेच्यार कित्या चिडतंस ? ( लक्ष्मण काऊंटरच्या खणातून नोटा बाहेर काढीत. ) हे शंभर....

ज्ञानदेव : म्हंजे. बिराकीट लागला ? कदी लावलंल्यान् ?

लक्षा : हेनी नाय, हेच्या भावाशीन्.

ज्ञानदेव : चाकरमानी देकूल खेळतंत ?

लक्षा : अरे, खेळना नाय. तेका गरज पडली पैशांची. म्हनान् मागाक् पाठवल्यान्.

ज्ञानदेव : तू उसने देतंस तेंका ? चारमानयांका....म्हंजे तेंचा पाकीट खाली झाला.

[ ज्ञानदेव निघून जातो. ]

सीताराम : भिक्या, तू चल पुढे. मी आलो. (भिक्या जातो.) बावल्या येनार हाय तुज्या जवळ.

लक्षा : पाटो ?

सीताराम : होय.

लक्षा : खेका ?

सीताराम : तो सांगेल तुला. माज्याअगोदर निघाला हाय. कुठे तरी सुरमला. पन येनार हाय.

[ सीताराम नदीच्या दिशेने निघून जातो. पाट्या इकडे तिकडे पाहत येतो. ]

पाट्या : लक्षुमनमामा, बावीचो निरोप आसा.

लक्षा : सांगान् टाक. ताकाक् जाऊन कुंडला किल्या दडवतंस ? सांग.

पाट्या : कान हडे करा.

लक्षा : माज्या कानात मळ नाय झालो. माका लांबचा आयकाक् येता. बोल.

पाट्या : पन....

लक्षा : अरे, बोल तू. तुझ्याजवळ कसलो निरोप आसा चाकरमानयांचो, ता ठावूक् आसा माका. आकडो सांग.

[ तेवढ्यात ज्ञानदेव येतो. ]

ज्ञानदेव : आकडो ! कसलो आकडो ? हाली विर्टींग घेतंस, की काय, लक्षुमन-मामा ? बरा केलंस, पन मालवनाक् जावून् कापतंलंस ?

पाट्या : नाय हंयच कापतंलो. मान फुडे कर, आनी किती वाटे घालूक होये, ते सांग. नायतर मेल्यावर भांडत रवशील. माजे वाटे कमी पडले, म्हनान्.

ज्ञानदेव : भांडाचा काम तूच कर. आनी मेल्यावर तर मी भांडाचंयूच नाय तुज्यासारखो.

पाश्या : मायझंया....मेल्यावर मी खंय भांडतंयू ?
लक्षा : अरे, पन तुमी आता जितेपनी कित्या भांडताहास ?
ज्ञानदेव : मिया खंय भांडतंयू ? मिया हेका आकड्याचा इचारी होतंयू. पाश्या, खबर खंयसून हाडलंस ?
पाश्या : तुज्या आवशीच्या घोवाकडसून.
ज्ञानदेव : ते खंय खेळतंत ? पन, मेल्या, आकडो सांग ना !
लक्षा : ज्ञानदेवा, तो तुका नाय सांगाचो. माका सांगतंलो.
ज्ञानदेव : पाश्या, असली फारशालिटी बरी नाय.
लक्षा : वगी रव, रे, तू....पाश्या, सांग आकडो.
पाश्या : हेच्या फुड्यात ? ह्यो, सालो, गावभर करीत.
ज्ञानदेव : अरे, नाय करूचंयू. आवशीच्यान् कोनाकू सांगाचंयू नाय.
लक्षा : सांग, रे, पाश्या...
पाश्या : शंभर !
ज्ञानदेव : म्हंजे एक्क्यार मेंडी ? एक मेंडी एक्क्याबरोबर खात...दुसऱ्या मेंडयेचा काय करू ?
पाश्या : तुज्या बापाशीकू न्हेवून् दी.
ज्ञानदेव : आकड्यावरसून बापूस काडू नुको हां माजो !
पाश्या : घेनग्या, आता जातंस निवांत ?
लक्षा : तेच्यार कित्या चिडतंस ? ( लक्ष्मण काऊंटरच्या खणातून नोटा बाहेर काढीत. ) हे शंभर....
ज्ञानदेव : म्हंजे. विराकीट लागला ? कदी लावलंल्यान् ?
लक्षा : हेनी नाय, हेच्या भावाशीन्.
ज्ञानदेव : चाकरमानी देकूल खेळतंत ?
लक्षा : अरे, खेळना नाय. तेका गरज पडली पैशांची. म्हनान् मागाकू पाठवल्यान्.
ज्ञानदेव : तू उसने देतंस तेंका ? चारमानयांका....म्हंजे तेंचा पाकीट खाली झाला.

[ ज्ञानदेव निघून जातो. ]

पाड्या : लक्षामामा, तू पव्लीकशिटी कित्या करतंस ? देताना देतंलंस, आनी गावभर करतंलंस.

लक्षा : गावभर खंय केलंय् ?

पाड्या : तू नाय. ह्यो धेनगो.... ही चुळकचिटी.... आता गावभर चुळकत जायत. चाकरमानी उलागलो....चाकरमानी उलागलो !

लक्षा : जावनेत, पाड्या ! आपुन वायट वाटान् घेता कामा नये. मोठमोठे आंबे, फनस, काजू, कलमा उलागतंत. तुजो भावस उलागलो, तर तेच्यात इषेश काय झाला ?

पाड्या : ता जावनेत. तुमी देतास ना ?

लक्षा : देतंलंय्. पन चाकरमानयांनी तुका उघड्या हातान् पाठवल्यान् ?

पाट्या : नाय. पाटल्यादारा ठेवलंय्.

लक्षा : जा, रे, सोनक्याच्या ! नजार मार.

सोनक्याचा : आसा. मी अगोदरच बगलंय्.

लक्षा : (पाट्याला पैसे देत) हे घे. आनी समाळून न्हेउन् दी. वाटेत मारामारी करू नुको.

पाट्या : नाय....जातंय्.

[पाट्या धावत जात असताना समोरून येणाऱ्या दादा भटाची आणि त्याची टक्कर होते. दादाच्या हातातला तांब्या जमिनीवर पडतो. पाणी सांडते. पाट्या दादाची पर्वा न करता निघून जातो. ]

दादा : शिंचा...नुसता सांड ! पुढें बघत नाहीं. मागें बघत नाहीं. ढुशी मारून जातो. तांब्या उपडी केला माझा !

[लक्षा आणि सोनक्याचा खो खो हसतात.)

दादा : तुम्ही कशाला हंसतां ? नाटक-तमाशा झाला ?

लक्षा : अरे, दादा, तांब्यो उपडी वायल मानसांचो होता. भटाचो कसो ?

दादा : (हंसतो) असं होय ? . तुम्हीं 'तो' अर्थ घेतलात ? घ्या...घ्या...

पण आतां याचं काय करूं ?

लक्षा : खेचां ?

दादा : तीर्थाचं ! तीर्थ कुठून आणूं ? ... घरीं जावं लागेल.

लक्षा : खेका ? हंयथंय डुरको आसा...

दादा : हा पोर, साला, वात्रट आहे. तो पाट्या आणि हा सोनक्याचा. दोघेही एकापेक्षां एक वरचढ. तो उर्मट, हा मिस्किल ! जात एकच !

लक्षा : जावनेत, दादा. पोर वय आसा तेंचा. करतंलेच तसा.

दादा : तसं म्हणजे कसं ? मी डुरक्यांतलं पाणी तीर्थासाठीं वापरूं ? शिंच्याला कांहीं डोकं आहे, कीं नाहीं ?

लक्षा : तेचा जावनेत. आता घरा जावची तसदी खेका घेतंस ? माज्या हटलातलाच पानी भर तुज्या तांबयात.

दादा : हॉटेलांतलं पाणी भटजीच्या तांब्यांत ?

लक्षा : माज्या हटलातली चाय खानंस नाय ?

दादा : अरे, पण ती मी स्वतः पितों. हे दुसऱ्यांना द्यायचंय्.

लक्षा : जेंका ह्यां पानी देतंलंस, ते देकूल माज्या हटलातली चाय खातंत. तेवा ह्या पानयाक् बाट नाय. तू बेशह्नक दी... सगळ्यांका.

दादा : असं म्हणतोस ?

लक्षा : तुळशीचा पान आसा मा तांबयाक् चिकाटलंला ?

दादा : हो, आहे.

लक्षा : बस तर मग. सोनक्याच्या, दी तेंका तांबयोभर पानी.

[ सोनक्याचा दादाच्या तांब्यात पाणी ओततो. ]

दादा : काय, रे, सोनक्या, तुझा दोस्तदार पाट्या पळाला कां ? काय झालं त्याचं ?

सोनक्याचा : तेच्या खिशात शंभर रुपये होते.

दादा : चोरले, की काय ?

सोनक्याचा : कोनच्यावरही कसलोव् आळ घेवू नुको हां, दादा.

दादा : हां...आतां आलं माझ्या लक्षांत. त्याचा भाऊ चाकरमानी आहे.

आत्तासे दिवसाला चार नोटा शंभरच्या मोडीत असेल तुमच्या दुकानांत. शेवटीं कनवटीला ढब्बू पैसा लावून फिरावं लागणार.

लक्षा : आजचो सोदता आसात ढबू पैसो ? जळ्ळो ! आता काय मिळता हा तो ?

सोनक्याचा : आता बाटलीची बुचा.

लक्षा : यॅक बूच तुज्या तोंडाक् मार. आनी काम कर. फडको कोन तुजो... नाय.... आता नाय बापूस काढ्चंय् तुजो !

दादा : चलतों, लक्ष्मण. पाणी द्यायचं आहे. लोक खोळंबून राहिले असतील.

लक्षा : तांबयातला पानी सरला, तर खलंल्या लोकांका माज्या हटलात धाडून दी. रे, सोनक्याच्या, ह्यती तुळशीची एक फांदी हाडून टाक त्या मडक्यात. पानी सुद्द होवून् जावनेत.

दादा : करा....करा. तुम्ही पाणी शुद्ध करा. मी माणसांना शुद्ध करायला जातों.

[ दादा भट निघून जातो. ]

अं धा र

## प्रवेश : दुसरा

[ स्थळ : लक्षाचं हॉटेल. सोनक्याचा हॉटेलात एकटाच आहे. तो चोरून काही तरी खातोय्. इतक्यात सीताराम आणि लक्षा बोलत बोलत हॉटेलच्या रोखाने येत असलेले त्याला दिसतात. तो बरणीचं झाकण लावून टाकतो. ]

सीताराम : काय, लक्षुमन ? होळीची तयारी कशी काय चाललीय् ?

लक्षा : जोरात. पन चावरमानयांनू, तुमच्या पाल्याक् समाळा हां....

सीताराम : कोनला ? आमच्या बावल्याला ? अरे, तेला मी सकाळीच आजोळी पाठवून दिला.

लक्षा : बरा केलास. या वर्साक् होळयेक् काय तरी होतंला.

सीताराम : मला पन तसाच वाटते. लोक येडे हायत. बेवडा मारनार आनी एकमेकांची उचीनिची काडनार.

[ दोघेही हॉटेलात येतात. ]

लक्षा : रे, सोनक्याच्या, चाय भर बगू....

[ सोनक्याचा आत जातो. घाडीमामा अचानक प्रवेश करतो. तो पिंपळाच्या पाराजवळ धुळीत फतकल मारतो. ]

घाडीमामा : पाच पूर्वज, बारा आकार.... म्हारगिऱ्यापासून गावडे देवापर्यंत घोंडो गुंडो म्हाराज्या....मालवणचो चाळो....आज, तुका ह्यो मामा-घाडी हाक मारता हा. तेच्या हाकेक् ओ दी. पावल्याचा पानी पाट्याक् लाव. वडाची साल पिंपळाक् लाव...उलटाच्या सुलटा कर. ( स्वतःशीच ) उलटाच्या सुलटा ? उलटाच्या सुलटाच केल्यान् तेनी. माका मॅट केल्यान्. मी मॅट हय ! तेवा बरो होतंय्. हातपाय हालंय्. तेवा माका मॅट म्हनत. भोट म्हनत. आता मी मॅट झालंय् . आता कोनव् बोलना नाय. सगळे गप. साली, मानसां आसत, की भुता ? भुताच....भुताच....!

सीताराम : लक्षुमन, हा मामा घाडी ना !

लक्षा : होय. तुमच्या भावाशीन् तेका मॅट केल्यान् !

सीताराम : अरेरे ! बरेच दिवस तेला बघितला नाय.

लक्षा : खंयव् बसान् आसता. कोनी दिल्यान्, तर खाता. नाय तर उपाशी तान्हे गारांना घालीत आसता.

[ सीताराम मामाजवळ जातो. ]

सीताराम : मामा....! घाडीमामा !

घाडीमामा : कोन तू ?

सीताराम : मी सिताराम पाटकर !

घाडीमामा : पाटो ?

सीताराम : नाय.

घाडीमामा : मग हरकत नाय...पाटयान् माका मॅट केल्यान्. आता कसो हुनतंलो तो माका मॅट ? मॅटाक् कोन मॅट म्हनना नाय. शेन्याक् हंय मॅट म्हनतंत. म्हनान् मी मॅट होवून् घेतलंय्. तुका यॅक सांगतंय्, कान हडे कर....तुका कोनी मॅट म्हतल्यान्, तर शिदो मॅट होवून् घे. बरा आसता खंयव् बसाक् गावता. ( स्वतःशीच ) रे, भोटमामा... रे, मॅटमामा ! ( ओरडून ) अरे, म्हना, साल्यांनू ....आता मी चिडाचंय् नाय. मी मॅटच हय !

सीताराम : लक्षुमन, चहा आण....आणि चार खटखटे लाडू बांधून दे. (मामाला) चल, बाकड्यावर बस.

[ सीताराम त्याला धरून बाकड्यावर आणून बसवतो. लक्षा चहाचा कप सीतारामच्या हाती देतो. खटखटे लाडूही आणून देतो. ]

सीताराम : हे खटखटे लाडू खा.

घाडीमामा : लाडू ? हे कोडू आसतंत. मी नाय खावचंय्. माका चाय पन नुको. दांडयेवरचो देवचार यैत.

सीताराम : नाय येनार देवचार. मी मारीन त्याला. मी चहा भरवली तुला, तर खाशील ?

घाडीमामा : तू भरवशील ?

सीताराम : हो. ( सीताराम चहा बशीत ओतून मामाला पाजतो. ) हे लाडू घे... खिशात ठेव.

घाडीमामा : माका खिसो नाय आसा....देवचारान् न्हेलो.

सीताराम : मग हातात घे ही पुडी. घे... (मामा पुडी हातात घेतो.) चल. तुला घरी पोचवतो.

घाडीमामा : माका घर नाय आसा....

सीताराम : माज्या घरी नेतो....चल. लक्ष्मुमन, याला पोचवून येतो.

[सीताराम घाडीमामाला घेऊन जातो. दुसऱ्या बाजूने माणसांची गडबड ऐकू येते. नदीवर गेलेला भिक्या परत येतो.]

लक्षा : भिक्या,...कोनाची गडबड, रे....?

भिक्या : वर्गनीवाले शे वाटतंत.

लक्षा : कसली, बॉ, वर्गनी....?

भिक्या : म्हायत आसान् इचारतंस ?....अरे, शिगम्याची !

[ज्ञानदेव आणि हरी येतात. हरीने डोक्यावर गांधी टोपी घातलेली आहे. तो प्यालेला आहे....पण शुद्धीवर आहे.]

ज्ञानदेव : काय, लक्ष्मुमनशेट ?

लक्षा : शेट ? कदीपासून, बॉ ? पॉटबिट देकूल मोटा नाय माजा. आनी शेट कसो झालंय् ?

ज्ञानदेव : ता जावनेत. शिगम्याची वर्गणी गोळा करूक् इलंव् .

लक्षा : करा....करा....आनंदान् करा. बॉम मारूक् वर्गनी गोळा करताहास. आनी देवळाचा काम कदी करतंलास ? अरे, परतेक पावसाक् देव भिजता, मेल्यांनू. थंडी होयत.

ज्ञानदेव : कोनाक् ? देवाक् ?

लक्षा : नाय. तुमका ! त्या जगतपालकाक् काय थंडी होतंली ? अरे, पावस तेच्या टकलेर पडलो, तर हुडहुडी तुमका भरतंली.

हरी : तेच्यासाठी देकूल वर्गनी गोळा करूची आसा.

भिक्या : गिरया ? नुसती शिंद्याला हाडून् टाकूक् ? मागच्या येळेक् नाय शिंद्याला हाडून टाकलास ? आनी चोरापोरांनी इकून खाल्यांनी... बगतंस काय ? चोरांची धन झाली !

हरी : नाव, घे, भिक्या....

भिक्या : घेव ?...तुया.

हरी : (रागाने) भिक्या!

भिक्या : मेल्यांनू, आपुन करायचा आनी त्या देवाक् निस्ताराक् लावायचा. किया ? तो बोलना नाय, म्हनान् ? पिसाळलो, तर भारी पडात.

हरी : नाय पिसळाचो. उलट, मदत करतंलो.

भिक्या : म्हंजे तू हयता अशात्मातला बोलतंस ?

हरी : मगे काय ? अरे, म्हारुतीबुवांचो हात टकलेवरसून फिरलो, की मानूस मिल्टात बदालता. अशात्म म्हंजे....

भिक्या : बोल...बोल..

हरी : हे इस्वची माजे घर! असा तुकाराम म्हाराजांनी सांगितल्यानी आसा.

लक्षा : मनाक् यैत, ता तुकारामाच्या नावावर खपंव् नुको हां, हरग्या.

हरी : अरे, कोनाच्याव् नावावर खपवलंय्, तरी मुळातलो अशात्म बदलात ? हे इस्वची माजे घर....

भिक्या : इस्वची तुजे घर....गळ्यात तंबोरो घाल, मेल्या. टकलेर टोपी किया घातलंस ?

हरी : सवताक् घातलंय्, दुसऱ्याक् नाय.

भिक्या : पन तुकां उगड्या टकलेन् रवाची सवय आसा. म्हनान् भीती. पटकन आपली टोपी दुसऱ्याक् घालशील.

हरी : म्हंजे ?

भिक्या : इतक्या तातडीन् वर्गनी गोळा करतंहस, म्हंजे...बायकोक् दिवस गेले हत, की काय ? आपली वाळतपनाची सोय! करनी नरकी, तरास नारायनको!

हरी : भिक्या!

भिक्या : चिडतंस खेका ?....लक्षा, मानसा करून करून भागली, की मग अशात्माक् लागतंत.

हरी : भिक्या....

लक्षा : मेल्या, हरी, अध्यात्म अध्यात्म म्हनान् कोकालतंस आनी परतेक वर्साक् तुज्या घरात बगूचा, तर आपला पाळना हालता!

हरी : आता घरात पाळना आसला, की ता धक्को लागलो, की हलतंलाच. इतकी पोरा समाळून देवाचा काम मी करतंयच, की नाय ?

भिक्या : करतंस तर !....जो तळा राखी, तो पानी चाकताच !

हरी : भिक्या !

भिक्या : आता कित्या झोंबला तुका !

ज्ञानदेव : आता गप रवा, बगू. हरी, आपन हंय मारामारी करूक् इलंवू, की वर्गनी गोळा करूक् ?

हरी : वर्गनी गोळा करूक्....शिगम्याची....होळी, रे, होळी.... !

ज्ञानदेव : हरी, हयता चलवलंस काय ? तुका सांगा होतंय् वरगनीतल्या पैशाची दारू खाव नुको, म्हनान्. अरे, देवाचे पैशे हत, ते डोक्यात चडतंले....तू आयकलंस नाय. ( ज्ञानदेवाला सीताराम येताना दिसतो.) सोयून बस बगू. चाकरमानी येतंत.

सीताराम : काय, बॉ, खेळ जमलाय् ?

ज्ञानदेव : चाकरमानयांनू, आमी वर्गनी गोळा करतंव्.

सीताराम : म्हंजे पुलाची आनी शाळेची वर्गणी आजून काढता तुमी ?

भिक्या : चाकरमानयांनू, ह्या काय बोलना झाला ? अहो, गाव हंय आसासर ती चालूच आसतंली. आमची आये सांगा, माज्यापावट ती गुरवार होती, तेवा साळेच्या आनी पुलाच्या वर्गनीचो पयलो हप्तो जमा केल्यानी. आता ह्या माजा लगीन होवून् पाच वर्सा झाली, तरी आजून साळेचो आनी पुलाचो पत्तो नाय. साळा नाय, म्हनान् आमी फुडे शिकाक् नाय. आनी पूल नाय, म्हनान् आजून आमी कमरेचो पंजो गळ्यात घालून पानयातसून चलत जातंव्.

सीताराम : मुंबैत देकूल चार-पाच मानसं वर्गनीचं पुस्तक घेवून् येतात. मी, बुवा, देतो तेनूला पैशे....

भिक्या : मिया सांगतंय्, ता काय कोल्याचा लगीन ? खंयच्या नाकान् हे वर्गनी मागतंत ? आमी देवचंव् नाय.

हरी : भिक्या, शाळेची आनी पुलाची वर्गनी मागाक् नाय इलंव् आमी. ही आसा शिगम्याची.

भिक्या : तीव् देवचंव् नाय्. शिगम्याची वर्गनी जायत चुलीत; आनी, साल्यांनू,

बोंत्रो खतील तुमच्या तोंडात.

हरी : तू नाय वर्गनी दिलंस, म्हनान् पूल आनी साळा काय खतंली ?

ज्ञानदेव : आनी तुज्या वर्गनीशिवाय आमी होळी पेटवन् दाखवतंव्.

हरी : अरे, आमका तुमची वर्गनी नकोच....

सीताराम : हे परतेकाला तुमी सांगायला लागलात, तर पूल आनी शाळा जल्मभर होनार नाय. येकूच्या येळेला वर्गनीशिवाय होळी पेटू शकेल. कारन चोरयेची लाकडं मिळू शकतात. पन ही मग्रूमी बरी नाय. अरे, कार्यकर्त्या मानसांनी सगळ्यांचं आयकून घेतला पायजे. चिडून चालत नाय. शिका....शिका....कार्य करायला शिका. नुसते हडेतडे भटकू नका. दारू पिऊन डुरक्यात पडू नका. लोकं फुडे गेली.... तुमी आजून माडीच्या छपरात....काय तरी भरीव कार्य करा.

हरी : अरे, जेच्याकडे ईक खावूक् पैसो उरलो नाय, तेच्या वांगडाक् भाशान करूकंच काय, पन तेच्या सावळेबुडसून देकूल जावूक् मागनंय् नाय मी.

सीताराम : अस्सं ? तेव्हा माजा बोज्या उचलायला आला होतास. आनी आता माज्या बरोबर भाशान करायला मागत नायस ?

हरी : तेवा तू भरलंलो होतंस. आता तू रिकामो झालंस. आता काय बोलतंलंय् तुज्या वांगडाक् ?

सीताराम : अरे, मुंबैकारी तरी तुझ्यासारखा गावठी, येडझया माणसाबरोबर कुठे बोलायला मागतात ?

हरी : आमी गावठीं ?.... आमी येडझये ? तू सुधरान् ल्य न्हयाल पडलंस, ता म्हायत आसा. सुद्द भाशा बोल्लंस आनी पैशे उडवलंस, काय सुधारना झाली ? अरे, तुज्यासारख्या मुंबैकाराक् गावातली मानसा गिरायक बनवून् पिळून खातंत, ह्या समजन्याची अक्काल आसा तुका ?

सीताराम : (रागाने) हरग्या !

हरी : अरे, मुंबैक् तुज्या खोलयेर हुंदीर उपाशी मरतंत. हंय आमका भापवू नुको. काल मुंबैक् गेलंस आनी आज चाकरमानी बनान् इलंस ? आमी गावठी ?....आमी येडझये ? आमच्या बरोबर शेळी चोरून दिवस गेले तुजे.

सीताराम : ते दिवस येगळे होते. चोरांच्या वांगडाला म्हावून् चोर बनलो होतो.

हरी : आमी चोर ?...

ज्ञानदेव : जावनेत, हरग्या...

हरी : जावनेत काय ? मी आयकान् वैन या बांभोटाचा ?

सीताराम : मी बांभोट ? हरग्या, दात तोडीन !...

हरी : अरे, तू काय तोडतंलंस ! तुझेच बत्तीसव् दात हातात काढून दैन ! मी हरी हय. हाली चार दिवस अशाळमाक् लागलंय्, गरंथ आयकतंय् , म्हनान् वायच शेळावलंय्. नाय तर पयल्या शब्दाबरोबर कानफाट हून केला आसतंय् तुजा. अरे, किती जनाची केलंय् . तू कोन झॅटझिंगाट, दरयामें खसखस !

सीताराम : मी दरयामें खसखस काय ? कालपर्यंत पाटसून लोंबत होतास एका चायसाठी. अरे, एक ड्डुरका मारायला तुला पाचची नोट दिली हाय !

हरी : ती मोटेपनाक्.

सीताराम : साल्या, निमकहराम ! माजं खावून् मला निनतोस ? आता उबा करनार नाय.

हरी : आता येता हा कोन ? हयतो एक भिको यैत. पन तेका जेवा कळात, की तू तेच्या घरात फेरये किल्या मारतंस....

सीताराम : साल्या, बेवड्या ! ( सीताराम हरीची मानगूट धरून त्याला जमिनीवर पाडतो. ) अनुसयेचं नाव घेतलंस, तर उठवून् ड्डुरक्यात टाकून देईन.

लक्षा : हरग्या, हंयसून जावा, बगू. माज्या हटलासमूर झेंगाट नुको.

हरी : ( उठत ) जातंव्. हंय काय खाक् नाय इलंव् ....

लक्षा : हरग्या, आता सोंडक्या ताट करून जा बगू. लय आयकान् घेतलंय्. तो मुंबैकार आसा, मी गावातलोच आसंय् . साल्या, वाट वन करून टाकीन ! चालू पड बगू हंयसून !

हरी : अरे...जातंय्.. चाय बनव हंयथंय ! चल, रे, ज्ञानदेवा.

ज्ञानदेव : चल, बगू या.

[ दोघे जायला वळतात. हरी पुन्हा फिरतो. ]

हरी : लक्षा, हयत्या तुज्या चाकरमानयाचा होळये दिवशी बगतंव्...

सीताराम : अरे....जा !

[ सीताराम आणि भिक्या दुसऱ्या बाजूने निघून जातात. ]

अं धा र

## प्रवेश तिसरा

[स्थळ : लक्षाचं हॉटेल.
हॉटेलबाहेर ठेवलेल्या बाकड्यावर सीताराम लक्षाबरोबर गप्पा मारीत बसलेला आहे.]

सीताराम : लक्षुमन, आज राती होळी पेटनार ना, रे ?

लक्षा : होय. चाकरमानंयान्, नाचवाले, शबैवाले तुमका पिडतंले. जातो येतो मानूस तुमच्या जवळ पॉस मागतंलो.

सीताराम : काय करनार ? विलाज नाय. द्यायला पायजे. दोन हजार रुपये आनले होते सोसायटीतून...फोवासारखे उडाले !

लक्षा : हात राकाक् होयो होतो.

सीताराम : अरे, आपन मुंबैवाला, म्हनून आपल्यासमूर कोनतरी हात फुडे करतो. गावातल्या मानसाकडे कोन मागनार ?

लक्षा : ता बरोबर.... पन मुंबैवाल्याकडे देवूक् पैशे होये ना ?

सीताराम : अरे, तू तर हायस....

लक्षा : मी हय. पन डुरक्यातला पानी लय येळ उसपत रवला, तर सरता.

सीताराम : तुला झरा हाय. तू सरायचास नाय.

लक्षा : सराचंयू नाय. पन साटाक् येळ लागता.

सीताराम : अरे, मुंबैत माजा पाय पडू देत. तुजे सगळे पैशे रिपीड करून टाकतो.

लक्षा : ढळशाल, तेवाची वार्ता.

सीताराम : नाय, आता जायलाच पायजे. म्हनत होतो, इथे अशेपर्यंत सुधारना करता आली गावची, तर करावी. पन नाय, लक्ष्मुमन, आपल्या पट्ट्यातली मानसं सुदारनार नायत. तेनूला टवाळी करायला सांगा. एका पायावर तयार!

लक्षा : माका वाटता, चाकरमानयांनू, आता तुमी कोनाक् सुदारन्याच्या भानगडीत पडा नुको. लॉक तुमका आयकाचे नाय. तेंका आता हळू हळू म्हायत पडता हा. तुमचो तिकिटीचो वांदो झालो हा.

सीताराम : अरे, माजे मुंबैहून पैशे येनार होते. आजून आले नायत. तिथे अडलो.

लक्षा : पाठवल्यान्च नसात कोनी. येतले खंयसून ?

सीताराम : ते बरोबर हाय.... पन नायच आले पैशे........

लक्षा : मिया, वॉ, देवचंय् नाय. आदीच सांगान् ठेवतंय्. नायतर म्हनशाल, इसवासघात केल्यान्. आता लय झाला. त्या दिवशीचे शंभर. आताचे पन्नास. दीडशे झाले. आता बस.... जाताना तिकिटाचा काय करतंलास ?

सीताराम : वगू या.

लक्षा : वस्तू माज्याकडे हाडल्याशिवाय मी पैशे देवचंय् नाय.

सीताराम : अरे, हे काय बोलनं झालं ? आजचे धरून दीडशे रुपये खेऱ्यावर दिले हायस, म्हायत हाय ना तुला ?

लक्षा : मिया सगळा लिवून ठेवतंय्. वस्तूंवर लेबला चिकटवतंय्. तसा भियाक् नुको. पन उतारासाठी काय करतंलास ?

सीताराम : बगू या. म्हातारीचे आमच्या सोन्याचे काप हायत. दैन, म्हनाली हाय.

लक्षा : ता तुमचा तुमी बगा.

[ इतक्यात डिच्या न्हावी हॉटेलच्या रोखाने येत असतो. तो सीता-

रामला बघून पुन्हा मागे जाऊ लागतो. ]

**सीताराम** : डिच्या ! ये, मेल्या, पळतोस खेका ? (डिच्या पुढे येतो.) अरे, असं होतं. चुका कोनाकडना होत नायत ?

**डिच्या** : पन माजी चूकच नाय झाल्लेली. मीव् निर्मळ आसंय् आनी अनुसयाव्. आमका कोन दोस लायंत, तेची जीब झडात.

**सीताराम** : अरे, जावनेत आता. अनुसयेच्या बाबतीत मला देकूल या मानसांनी दोस लावला.... तेवा मला कळला, तुला किती येदना झाल्या असतील ! पन, डिच्या, मानसाने इसरायला शिकला पायजे.

**डिच्या** : साळेत आसताना आमी ताच शिकलंव् !

**सीताराम** : बरं, चाय खानार ?

**डिच्या** : नुको.

**सीताराम** : अरे, गाव तिथे भांडन हायच. चूकभूल द्यावी, घ्यावी. अरे, गावाला पन आता कळलं. ती चांगली हाय. तू चांगला हायस.... मी देकूल चांगला हाय.

**डिच्या** : मग वायट कोन आसा ?

**सीताराम** : गाव ! अरे, इथे एक झाला, तर शंभर उठवतात. या गावातली मानसं म्हंजे नग हायत, नग. तो, साला, हरग्या मोठा नग ! त्यानंच पेटवली होती ही चूड. नायतर तू काय गावाचा दुस्मन हायस ? आनी अनुसया काय गावाची वैरीण हाय ?

**डिच्या** : चाकरमानयांनू, अनुसयेच्या घोवान् तुमका सोडल्यान् की काय ?

**सीताराम** : तो कसा सोडनार ? आपलं जाल्लं काम आयकनार तो. कदी तेच्या तोंडाला नायरी नाय. आंबा झेलावा, तसा माजा शब्द झेलतो.

**डिच्या** : अस्सा ? ( भिक्या येताना दिसतो. ) हयो बगा, भिको इलो. टाका शब्द आनी बगा झेलता काय ?

[ भिक्या सीतारामला पाहिल्यावर परत जाऊ लागतो. ]

**सीताराम** : भिक्या.... अरे, ये.... जातोस कुठे ?.... चाय खानार ?

भिक्या : कोनच्या पैशाची ?

सीताराम : म्हंजे ? आज असा काय इच्चित्र बोलतोस ?

भिक्या : नाय... म्हंजे.... तेचा काय आसा, चाकरमानयांनू.... ह्यो लक्सो सगळे पैशे माज्या नावार मांडून टैत.

सीताराम : का ?

भिक्या : वायट वाटान् घेवू नुको.... पन तुमच्या किरेडीट पातळ झाला....

सीताराम : माजं काय पन आजून पातळ झालं नाय. खायची हाय, तर खा चाय ! देनारा मी हाय. आनी बरा झाला, तू आलास, तो ! धावत आमच्या घरी जा. न्हानीतल्या माडाची चार अडसारं काढायची हायत, तेवढी काढून ठेव. अरे, तो खान आनी हिंदुराव हवालदार एखादे येळेला येतील. तेन्ला द्यायची हायत.

डिच्या : कोंबड्याची पन तयारी आसात....

सीताराम : अरे, हवालदारांना कोंबडी कसली ? सायब येनारा असता, तर बात येगळी होती. हेना शेळ्यावरच भागवायचा. भिक्या, जा बेगीन.

भिक्या : माजो पाय मुरगाळलो हा. पुवासारखो धुकता हा.

लक्षा : मघाशी, मेल्या, बरो उडये मारी होतंस !

भिक्या : आताच येताना मुरगाळलो...हंयथंय कोनावर . माडाच्या अळ्यात.

लक्षा : पैशाचो लेप काडल्यानी चाकरमानयांनी, तर घटकेत बरो होयत !

भिक्या : तसा नाय, लक्षा. खराच धुकता हा. चलताना मुस्कील. माडार खंय चडतंलंय् ?

सीताराम : अरे, भिक्या...

भिक्या : ( लंगडत चालू लागतो. ) आता बोला नुको. माका फुरसत नाय. खायल्या वाड्यात वायच काम आसा. थंय जावून् येतंय्. ( थोडासा पुढे गेल्यावर तो नीट चालू लागतो. )

सीताराम : ( जाणाऱ्या भिक्याकडे निरखून पाहत ) म्हंजे भिक्याचा पाय धुकत नाय, तर ! मला शेंडी लावली त्याने !

डिच्या : अहो, चाकरमानयांनू, तुमी काय पयले नाय. तेनी लय चाकरमानयांका शेंडये लावल्यान् हत. चाकरमानी उलागलो, की भिक्यान् तेका शेंडी लावल्यान्च.

सीताराम : मला म्हायत नाय होतं.

डिच्या : आजून म्हायत पडतंला..म्हाल सरलो, की परतेकाची कारना इली..

सीताराम : डिच्या, तू जाशील काय, रे ?

डिच्या : खंय ?

सीताराम : माडार चडायचं हाय.

डिच्या : मिया ? माका हाली घरच्या माडार चडाक् नाय जमना. पाय थरथरतंत.

लक्षा : चाकरमानयांनू, आता तेका दाडी करूक् सांगलास, तर हात थरथरतंले.

सीताराम : भगल नुको....जाशील, डिच्या ?

डिच्या : भिको खंय गेलो ?

सीताराम : खायल्या वाड्यात.

डिच्या : माका वायच वयल्या वाड्यात काम आसा....नाय तर मी नाय म्हटला नसतंय्.

[ डिच्या निघून जातो. सीताराम आश्चर्याने पाहत राहतो. ]

सीताराम : कमाल हाय या मानसांची ! भिक्याचं खायल्या वाड्यात काम निघालं. डिच्याचं वयल्या वाड्यात...

सखू : ( दुरून आवाज ) माशे घितास, गे ?

सीताराम : आता ही सखू गाबतीन आली. ती मधल्या वाड्यात जायल.

[ सखू सीतारामाच्या समोरुन घाईघाईने जात असते. सीताराम हाक मारतो. ]

सीताराम : गो, सखू...अगो, थांब तरी....

सखू : कित्या ?

सीताराम : फुडे ये.

सखू : ह्यां बगा, इलंय् ! काय म्हंतास ?

सीताराम : काय आनलंस ?

सखू : मोटा आसा. तुमका नाय जमाचा.

सीताराम : अग, दाखव तरी.

सखू : आता काय दाखवतंलंय् तुमका ? फुकटचो टायम पास करतंलास. घेवचा नसतंला, काय नाय.

सीताराम : कसं दिलंस ?

सखू : तुमका नाय जमाचा आता.

[ सखू निघून जाते. ]

लक्षा : चाकरमानयांनू , पैसो नकली आसा. तेका समाळून वापरूचो लागता. तेच्या वांगडा अतिशाय करता कामा न्हये. म्हंजे परस्थिती ही होता ! पैसो आसलो, की गोडाक् मुंगळे चिकाटतंत, तशी मानसां चिकाटतंली.

[ हळूहळू अंधार होतो.
सीताराम बाकड्यावर बसलेला आहे. त्याच्या चेहऱ्यावर फक्त प्रकाश येतो. त्याला वेगवेगळे आवाज ऐकू येऊ लागतात. ]

भिक्याचा आवाज : चाकरमानयांनू, तुमचा किरेडीत पातळ झालसा वाटता. आता बोला नुको. माका फुरसत नाय.

डिच्याचा आवाज : चाकरमानयांनू, माका आज काम आसा बयल्या वाड्यात. नाय तर तुमका नाय म्हतला नसतंय्.

सखूचा आवाज : तुमका नाय जमाचा. मोटा आसा. घेवचा नसतंला, काय नाय. फुकटचो टायम पास करतंलास.

हरीचा आवाज : अरे, तुज्यासारख्या मुंबैकाराक् हंयली मानसा गिरायक बनवून् पिळून खातंत, ह्या समाजन्याची अक्कल आसा तुका ?

लक्षाचा आवाज : चाकरमानयांनू, पैसो नकली आसा. तेका समाळून वापरूचो लागता. पैशे आसले, की गोडाक् मुंगळे चिकाटतंत, तशी मानसा चिकाटतंली.

**आईचा आवाज :** तू हेंका वळाकनंस नाय. हे दोन दिवसाचे, मी कायमचा. पोटचो जाळ आसंस तू माज्या. माका दिलंस वेतलंस नाय, म्हनान् मी फिराचंय् नाय तुज्यावर.

[ सीतारामच्या चेहऱ्यावरचा प्रकाश हळू हळू नाहीसा होतो. ]

अं धा र

## प्रवेश चौथा

[ स्थळ : लक्षाचं हॉटेल. होळीचा दिवस. वेळ रात्रीची. भिक्या हातात कंदील घेऊन कुणाची तरी वाट पाहतो आहे. अधून मधून तो फेऱ्या मारतो आहे. लक्षाच्या हॉटेलमधून सोनक्याचा बाहेर येतो. लक्षा आत आहे. ]

**सोनक्याचा :** मामा, मी होळयेक् जातंय् .

**लक्षा :** जा. दारूबिरू खाव नुको....

**सोनक्याचा :** नाय

**लक्षा :** मी मागसून येतंय्....

**सोनक्याचा :** ( सोनक्याचा जात असताना त्याला भिक्या दिसतो. ) कोन, रे ?... भिक्या... येतंस ?

**भिक्या :** तू चल फुडे...

[ सोनक्याचा निघून जातो. लक्षा हॉटेलला कुलूप घालून बाहेर येतो. ]

लक्षा : कोन ?...भिक्या....अरे, फानास पेटवून् काय करतंस ?

भिक्या : वाट बगतंय्....

लक्षा : कोनाची, रे ?

भिक्या : आता मी आनी कोनाची वाट बगतंलंय् ?.... चाकरमानयांची !

लक्षा : खंयच्चो, वॉ ?

भिक्या : खायल्यांचो दाजी येवचो आसा. सकाळपासून वाट बगून बगून डोळे देकूल धुकाक् लागले.... हेचो पत्तोच नाय. सांजच्या गाडयेन् येवचो, तर आजून गाडयेचो पत्तो नाय.

लक्षा : म्हंजे आजून गाडी येवची आसा ?

भिक्या : नाय तर मी हंय फेरये खेका मारला आसतंय् ? होळयेचो दिवस, मेल्या, खिशात ईक खावूक् पैसो नाय. म्हतला, इलो आसतो, तर खिसो गरम झालो आसतो.

लक्षा : मग तू होळयेक् नाय येनंस ?....

भिक्या : येतंलंय्.... तू चल फुडे.

[ इतक्यात हरी आणि ज्ञानदेव हातात दांडे घेऊन एस्. टी. स्टँडच्या दिशेने जाऊ लागतात. ]

लक्षा : हरग्या, खंय, रे ?

हरी : इष्टी टँडवरून येतंव्.

लक्षा : एस्. टी. स्टँडवर जावूक् दांडे कित्या ? आनी हयतो घेडो बरोबर आसताच ?

हरी : आज तेचो उपयोग समजात.

[ हरी आणि ज्ञानदेव निघून जातात. ]

लक्षा : भिक्या, मेल्या, दोगांवच्या हातांत दांडे हत.

भिक्या : दुसरा साल्यांका कामच काय आसा ? दारू खायची आनी दांडे घेवून् बिंबायचा.

लक्षा : आज काय तरी होतंलासा वाटता....समाळ....

भिक्या : मिया बरोबर समाळतंय्.

लक्षा : मी चलतंय् तर मग....

भिक्या : चल तू....होळी पेटासर मी येतंय्.

[ लक्षा निघून जातो. सीतारामच्या बॅटरीचा झोत भिक्यावर पडतो.]

सीताराम : कोन ?....भिक्या !

भिक्या : होय.

सीताराम : अरे, सगळे जण होळीजवळ चाललेय्त आनी तू हिते लाटान घेवन् कोनाला सोदतो हायस ?

भिक्या : कामाशिवाय मी कोनाक् सोदूचंय् नाय.

सीताराम : येतोस ना ?

भिक्या : तुमी चला फुडे....चाकरमानयांनू, हातात दांडो नाय तुमच्या ?

सीताराम : दांडा कशाला पायजे ?

भिक्या : आज वातावरण खदूळ दिसता हा. लॉक झंगटी आसत. कदी काय होयत, हेचो नेम नाय. जिवाक् समाळा हा.

सीताराम : तू चलतोस, तर चल माझ्याबरोबर.

भिक्या : मी इला आसतंय्, पन माका काम आसा.

सीताराम : मग चलतो मी.

भिक्या : जिवाक् समाळा....

[ भिक्या एस्. टी. स्टँडच्या दिशेने निघून जातो.
होळीचं दृश्य दिसू लागतं. होळीची लाकडं रचलेली आहेत. गावकरी मंडळी जमलेली आहेत. त्यात प्रामुख्याने लक्षा, दादा भट सीताराम, सोनक्याचा वगैरे दिसताहेत. ]

आवाज : अरे, चाकरमानयांच्या हातान् नारळ ठेवा.

आवाज : उलागलंल्या चाकरमानयाच्या हातान् नारळ ठेवलास, तर वर्षभर पनवती लागात. लक्षामामा, आज तू नारळ ठेव... होळी देकूल तूच

पेटव.

[ लक्ष्मण होळीसमोर नारळ ठेवतो. दादा भट पूजा करतो. लक्ष्मणच्या हातून होळी पेटवली जाते. सर्व गावकरी होऽहोऽऽहो म्हणून बोंबा मारतात. ]

**आवाज** : अरे, हुरो, रे, हुरो आनी आमच्या होळयेक् सोन्याचो तुरो, रे !

**सर्वजण** : होऽऽहोऽऽऽ. अरे, आकडी, रे आकडी, आनी दादा भटाची शेंडी झाली वाकडी, रे !

**सर्वजण** : होऽऽहोऽऽऽ.... अरे, आभाळातसून पडली किशी आनी लक्षा–मामाची जळली मिशी, रे !

**सर्वजण** : होऽऽहोऽऽऽ...

[ सीतारामला हे सगळं आवडत नाही. तो तिथून रागाने बाहेर पडतो. ]

**सीताराम** : अडाणी आहेत...बोंबा कसल्या मारतात ?

[ सीताराम तिथून बाहेर आल्यावर हरी आणि ज्ञानदेव होळीकडे जात असतात. त्यांची आणि सीतारामची गाठ पडते. हरी खुनशी नजरेने सीतारामकडे पाहतो. तो होळीकडे निघून जातो. त्याच्या-मागून ज्ञानदेव जातो. होळीजवळच्या बोंबा पुन्हा ऐकू येऊ लागतात. ]

**आवाज** : अरे, जिवाद, रे, जिवाद, आनी उलागलंलो चाकरमानी पैशे सरले म्हनान् रवलो निवात, रे !

**सर्वजण** : होऽऽहोऽऽऽ.

**हरी** : अरे, ढोलीत कवडो इयालो आनी ढिचो न्हायी भिक्याच्या बायलेक् घेवून् पळालो, रे !

सर्वजण : होऽऽहोऽऽ....

[ हरीची ही बोंब ऐकून सीताराम खवळतो. त्याचं डोकं कामातून जातं. ]

सीताराम : कोन हा हलकट ?....साल्याचे दात तोडले पायजेत !... अडाणी.... अशिक्षित साले.. बायकांची अब्रू घेतात....( तो तीरासारखा गर्दीत घुसतो. ) कोन बोलला ?...कोन बोलला ? कोनी अनुसयेची अब्रू काढली ? अक्कल हाय का तुमाला, साल्यांनू, कुठं काय बोलायचं हेची ? कोन बोला ?

हरी : मी !

सीताराम : हरग्या, साल्या, तू गावाची कीड आहेस. तुज्या तंगड्या तोडल्या पायजेत !

हरी : असा ?....

[ हरग्या हातातला दांडा सीतारामच्या कपाळावर मारतो. सीतारामचं डोकं फुटून रक्ताची धार वाहू लागते.
सीताराम गर्दीतून बाहेर पडतो. होळीपासून काही अंतरावर तो जमिनीवर पडतो. गावकऱ्यांत गोंधळ माजतो.
' सितारामाक् मारल्यानी....सितारामाक् मारल्यानी ! '
येनूमावशीच्या कानांवर ही बातमी पडते. ती घारीसारखी धावत येते. ]

येनूमावशी : कोनी मारल्यान् माज्या शितारामाक् ?....कोनी मारल्यान् ? शितारामा, अरे, खंय आसंस तू ? ( तिला धुळीत पडलेला सीताराम दिसतो. धावत जाऊन ती त्याला जवळ घेते. ) शितारामा.. शितारामा, अरे कोनी मारल्यान् तुका ? अरे, कोनाचो हात उटलो माज्या पोरार ?

सीताराम : साल्या, हरग्या....तुजं बघतो...

येनूमावशी : हरग्यान् मारल्यान् ? त्या मेल्याचा काळीज खायन् मी. तेका जितो

ठेवचंय् नाय. माज्या पोराचा रगात काडल्यानी हा. तेंच्या रक्ताचो घोट घैन मी. अरे, माज्या बाबा, तुयां कसो फसलंस, रे ? हे अक्कर-माशी हत. खावच्यापुरते तुज्या पाटसून लोंबले. तुज्याकडचा सरल्याबरोबर तुज्यार उलाटले. अरे, हे साप हत. तुया लोकांचा बरा करूक् गेलंस, आनी तुज्या कर्माक् ह्या इला. त्या भिकल्याच्या बायकोसाटी अख्ख्या आवाटाची दुस्मनी घेतलंस. तो आसा तुज्या वांगडाक् आता ? अरे, हे खुटावरचे कावळे हत.

[ कावळ्याची कावकाव ऐकू येते. चारी बाजूंना एकच आवाज 'काव काव'.... त्यातूनच गावकऱ्यांचे आवाज ऐकू येतात.... 'चाकरमानी इलो!'
भिक्या आणि इतर गावकरी नवीन चाकरमान्याला घेऊन येतात. ]

**भिक्या** : यवा....यवा, दाजींनू.. समाळून यवा. तुमचीच वाट बगी होतंव्.

[ स्टेजवर प्रकाशाची दोन वर्तुळं दिसू लागतात. एका वर्तुळात आईच्या मांडीवर डोकं ठेवून विव्हळत असलेला सीताराम आणि दुसऱ्यात गावकऱ्यांनी गराडा घातलेला नवीन चाकरमानी. ]

प ड दा

IRBK-0120597

IRBK-0120597

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
वा. क्र. २०५२० नों. दि. २।११।८७
वि. ... ना२३ क्र. ...

श्री. सुन्दर तळाशिलकर यांचे
आगामी प्रादेशिक साहित्य

## कादंबरी

मुक्या

## नाटक

चालगती ( माल्वणी )
दरी ( मराठी )
बीज ( मराठी )